

मुलजी जेठा कॉलेज • जळगाव

# अजिंठा

## नियतकालीक

# १९८०/८१

मुख्य संपादक
एम. के येवले

विद्यार्थी प्रतिनिधी
कु. वर्षा कुलकर्णी
श्री. किशोर नेमाडे
श्री. अवधूत पाटील








LIBRARY
RECEIVED
Date 13.11.81
Signature

KNOWLEDGE IS POWER

मु. जे. महाविद्यालय

नियतकालीक १९८०-८१
वर्ष ३५ अंक ३६

# अजिंठा

विद्यार्थी प्रतिनिधी
कु. वर्षा कुळकर्णी
श्री. किशोर नेमाडे
श्री. अवधूत पाटील

प्रमुख संपादक
प्रा. एम. के. येवले

# अजिंठा

१९८०-८१

**संपादक मंडळ :**

प्राचार्य चं. रा. पोतनीस
उपप्राचार्य मु. म. थत्ते
उपप्राचार्य द. स. नेमाडे
प्रा. एम. के. येवले ( प्रमुख संपादक )
प्रा. राजा महाजन
प्रा. प्र. ना. हुपरीकर
प्रा. डॉ. इफ्तिखार अहमद
प्रा. डॉ. प्र. इ. चौधरी
प्रा. सौ. प्रमिला भिरूड
प्रा. श. मु. ढापेकर
प्रा. आर. एल. राणे
प्रा. शा. न. पाटील
प्रा. एन्. डी. पाटील

**विद्यार्थी प्रतिनिधी**

कु. वर्षा कुळकर्णी
श्री. किशोर नेमाडे
श्री. अवधूत पाटील

प्रकाशक :
**प्रा.एम. के. येवले**
मु. जे. महाविद्यालय
मुद्रक :
**श्री. हरीश सिलवाणी**
**आनंद प्रिंटर्स**
जळगांव

LIBRARY
RECEIVED
Signature

## संपादकीय--

'अजिंठा' नियतकालिकाचा हा अंक आपल्या हाती देतांना व त्याद्वारे आपल्याशी थोडेसे 'हितगुज' करण्याची संधी घेतांना खूपच आनंद होत आहे. 'अजिंठा' चा हा अंक म्हणजे आमच्या महाविद्यालयाच्या कार्याचा छोटासा ओनामा आहे. या वर्षीचा अंक आपल्या हाती देत असतांना मन थोडेसे द्विधा झाले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक यांच्या विविध क्षेत्रातील यशसंपादनामुळे एक नवा उत्साह वाटत आहे व त्याबरोबरच शिक्षण क्षेत्रातील सद्य:परिस्थितीमधील समस्यांमुळे मन काहीसे उदास, नि हताश झाले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात इतर क्षेत्रांबरोबरच शिक्षण क्षेत्रातही अनेक प्रकारचे बदल झाले आहेत. शिक्षण क्षेत्रातील आजची परिस्थिती दिवसेंदिवस नवनवीन समस्या निर्माण करू पहात आहे व त्यामुळे साऱ्यांच्याच मनात शिक्षण क्षेत्राविषयी व त्यातील प्रश्नांविषयी फार मोठा संदेह निर्माण झाला आहे.

व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासाचे शिक्षण हे एक प्रभावी साधन आहे हा मुद्दा निर्विवाद आहे- सुबुद्ध सुजाण व संपन्न व्यक्तिमत्वाचा सुसंस्कृत माणूस घडविणे हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट मानण्यात आले आहे. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञानसंपादन नव्हे तर निश्चित जीवनदृष्टी,-कुटुंब, समाज-देश इ. शी बांधिलकी मानणारी व्यक्ती निर्माण करणारी ती एक प्रक्रिया आहे.

सर्वांगीण विकासासाठी 'समान संधी' यासारख्या तत्वांवर आधारित असलेली शिक्षण पद्धती स्विकारुन शासनाने प्रगतीचे आणखी एक पाऊल उचलले आहे हे सारे खरे असले तरी देखील वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करता येत नाही.

शिक्षण क्षेत्रात एक प्रकारचे अराजक निर्माण झाल्याचे दिसत असून त्यामुळे सद्सद्विवेक बुद्धीने विचार करणाऱ्या माणसाच्या मनात अस्वस्थता निर्माण झाल्याशिवाय रहात नाही. व्यवसायाभिमुख शिक्षण पद्धतीला अवास्तव प्राधान्य दिले गेल्यामुळे शिक्षण क्षेत्राचा तोल-ताल ढळलेला दृष्टोत्पत्तीस येत आहे. 'शिक्षणात काही राम राहिला नाही' असे लोक बोलतांना दिसतात. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, समाज, शासन, शिक्षण तत्ववेत्ते या सर्वांनीच प्रचलित शिक्षण पद्धतीबद्दल गंभीरपणे विचार करण्याइतकी स्थिती निश्चितच निर्माण झालेली आहे.

आम्ही सत्रात्मक शिक्षण पद्धतीचा अंगीकार केला. या शिक्षण पद्धतीचा हेतू, तात्त्विक भूमिका कितीही चांगली, आदर्शवादी दिसत असली तरी प्रत्यक्ष अनुभव मात्र विपरीत आहे असे म्हटल्यावाचून रहावत नाही. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची अभ्यास करण्याची, एखाद्या विषयाचे सखोल ज्ञान मिळविण्याची प्रवृत्ती सर्व साधारणपणे कमी होत आहे. परीक्षा पद्धतीवरील विश्वास उडत चालला आहे. परीक्षेचे गांभीर्य, महत्व विसरले वा सोयिस्करपणे टाळले जाऊ लागले आहे. प्रश्नमंजुषा आणि त्यांची बाजारात मिळणारी तयार उत्तरे यावरच विद्यार्थ्यांचा भर असलेला दिसून येतो. कॉपी करण्याचे प्रमाण शिगेला पोहोचले आहे. बऱ्या वाईट मार्गाने परीक्षा उत्तीर्ण होणे हेच उद्दिष्ट विद्यार्थ्यांसमोर उरलेले दिसते. शैक्षणिक गुणवत्तेची समाजात बूजही राहिली नाही असे खेदाने म्हणावे लागते. शिक्षणेतर बाह्य मूल्यांचा शिक्षण क्षेत्रावर कमालीचा विपरीत आणि विकृत प्रभाव पडलेला दिसत आहे. दिशाहीन विद्यार्थी, व्यवहारग्रस्त पालक, शिक्षणासारख्या जिव्हाळ्याच्या व महत्त्वाच्या विषयाकडे उपेक्षेने पाहणारे शासन, अंतर्गत वादात सापडलेल्या शिक्षणसंस्था, संभ्रमित झालेला शिक्षकवर्ग, पाश्चात्यांच्या अंधानुकरणात रममाण झालेले शिक्षण-

तर अशी केविलवाणी अवस्था आज शिक्षणक्षेत्राची झाली आहे शिकायचे काय? कशासाठी? किती? कुठे? आणि का? असे अनेक यक्षप्रश्न आज प्रत्येकाच्या डोळ्यासमोर निर्माण झालेले दिसतात. जीवनात शिक्षणाला महत्व आहे हे तर कळते पण घेतलेल्या शिक्षणाचा प्राप्त परिस्थितीत काय उपयोग आहे हे मात्र कळत नाही अशी अवस्था झालेली आहे. महाविद्यालयात वर्गात पुरेसे विद्यार्थी उपस्थित नसतात पण बाहेरील क्लासेसना मात्र भरमसाठ गर्दी असते असेही दृश्य दिसते. परीक्षेतील अपप्रकारांची कल्पनाही करवत नाही. यातच हिंसक प्रकारांचा, साधनांचा अवलंब वाढत असल्याचेही वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांवरुन दिसून येते.

हे बदलायला हवे, बदललेच पाहिजे असे प्रत्येकालाच वाटते. समाजाच्या स्थैर्यासाठी, सर्वांगीण विकासासाठी ते आवश्यक आणि अपरिहार्य आहे. आणि नाही बदलले तर? पण बदलणार कोण? यासाठी शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटकानेअंतर्मुख होऊन कठोर आत्मनिरीक्षण करावयास हवे. असे कठोर आत्मपरीक्षण करून स्वतःपासून या बदलाला आरंभ केला पाहिजे. एकमेकावर दोषारोप करुन हे चित्र बदलणार नाही. 'मी माझा बरा' अशी आत्मसंतुष्ट वृत्ती ठेवून चालणार नाही. काय झाले आहे? काय होत आहे? काय व्हावयास पाहिजे? हे तसे प्रत्येकाला कळत आहे पण 'मी त्यातला नाही' अशा भूमिकेत प्रत्येकजण स्वतःला सावरण्याचा मार्ग चाचपडत आहे. अशी ही आजची शिक्षण क्षेत्रातील किडलेली परिस्थिती बदलण्यासाठी ठोस, मूलगामी, क्रांतीकारक, डोळस परिवर्तन घडवून आणणारी भूमिका प्रत्येकाने अंगिकारली पाहिजे. वरवरची डागडुजी मुलामा काहीही फलदायी ठरणार नाही. नाहीतर— "Let the dead bury their dead"! हे बायबलमधील वचन आमच्या शिक्षण क्षेत्राचे भरतवाक्य व्हायला वेळ लागणार नाही! इत्यलम्! ★

# महाविद्यालयीन वार्ता

यंदाचे शैक्षणिक वर्ष सुरुवातीपासूनच अत्यंत धावपळीत व उत्साहात पार पडले. विविध प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमांबरोबरच कला, क्रीडा, साहित्य, इ. क्षेत्रातील विविध प्रकारच्या कार्यक्रमांची रेलचेल हे या वर्षीचे वैशिष्ठ्य म्हणावे लागेल यंदाच्या वर्षातील महाविद्यालयीन वार्तांचा परिचय करुन देतांना पुढील मुद्द्यांचा उल्लेख अपरिहार्य ठरेल

गेल्या वर्षातील विद्यापीठीय परिक्षांमधील निकालाच्या तुलनेत विज्ञान, कला व वाणिज्य या तिन्हीही शाखांतील विद्यार्थ्यांनी यंदाच्या वर्षी अधिक उत्तम दर्जाचे यश संपादन केलेले आहे. एवढेच नव्हे तर महाविद्यालयातील काही विद्यार्थी विद्यापीठात सर्वप्रथम येण्याच्या सन्मानास पात्र ठरले आहेत. श्री. मिलींद फाटक ह्याने तृतिय वर्ष वाणिज्य या परिक्षेत सर्वोच्च गुण संपादन करुन एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्याबरोबरच केवळ २० व्या वर्षी "कॉस्ट अकौन्टन्ट" ही पदवी संपादन करण्याचे कौशल्यही त्याने दाखविले आहे. महाविद्यालयाच्या दृष्टीने हे यश खरोखरच अभिमानास्पद आहे.

शैक्षणिक प्रगतीबरोबरच इतर क्षेत्रातील कार्यातही महाविद्यालयाचे विद्यार्थी मागे नाहीत. पुणे विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात आलेल्या "युवक महोत्सवात" महाविद्यालयामार्फत सादर करण्यात आलेल्या समूहगीतास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

पुणे विद्यापीठाच्या विद्यमाने दक्षिणविभाग आंतरविद्यापीठ मुलांच्या कबड्डी सामन्यांचे आयोजन महाविद्यालयामार्फत करण्यात आले. ही विशेष महत्वाची बाब म्हणावी लागेल. त्यातही अंतिम सामन्यात पुणे विद्यापीठ संघ विजेता ठरलेला असुन या संघात समाविष्ट झालेल्या आपल्या महाविद्यालयातील १) श्याम कोगटा २) अजित तडवी या दोन विद्यार्थ्यांना सुवर्णपदके मिळविण्याचा बहुमान प्राप्त झाला आहे.

विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या विकासाला सतत प्रेरणा देणाऱ्या व त्यांना समयोचित मार्गदर्शन करणाऱ्या आमच्या प्राध्यापकांनीही विविध क्षेत्रात आगेकूच केलेली आहे. वाणिज्य विभागातील एक प्राध्यापक श्री. ग. म. तल्हार यांनी सादर केलेला प्रबंध विद्यापीठाने मान्य करुन त्यांना वाणिज्य विद्याशाखांतर्गत पी. एच डी ही सन्माननीय पदवी दिलेली आहे.

महाविद्यालयातील यशस्वीविद्यार्थ्यांचा गौरव पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, विविध विषयांशी संबंधित असलेली चर्चासत्रे या निमित्ताने अनेक मान्यवर व्यक्तींना महाविद्यालयास भेट देवून आपल्या मार्गदर्शनाचा लाभ करुन दिलेला आहे. त्यातील प्रमुख व्यक्ती अशा- पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राम ताकवले, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राम जोशी, न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, श्री. सेतुमाधवराव पगडी, डॉ. सुधाकर भोसले, डॉ. भास्कर गिरिधारी, प्राचार्य डॉ. चिं. ग. वैद्य, सुप्रसिद्ध चार्टर्ड अकौंटट श्री. पी. एम्. शहा, प्राचार्य सत्यरंजन साठे, सौ. इंदुताई केळकर, सौ शांताबाई किर्लोस्कर, सौ विद्या बाळ, डॉ लुकतुके, श्री. वसंत पळशीकर, इ.

या शैक्षणिक वर्षापासुन महाविद्यालयामार्फत एम एस्सी.- गणित या विषयाचे वर्ग सुरु करण्यात आलेले आहेत. तसेच विज्ञान शाखेतील अन्य विषयांच्या पदव्युत्तर अध्यापनाची सोय करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

महाविद्यालयीन प्रशासकीय सोईच्या दृष्टीकोनातून यंदा प्राध्यापक नेमाडे यांची उप प्राचार्यपदी नियुक्ती करण्यात आली. प्रा. थत्ते हे प्रथम सत्राच्या अखेरीनंतर उपप्राचार्य पदाच्या जबाबदारीतून मुक्त झाले आहेत.

या शैक्षणिक वर्षाचे शेवटी एका आकस्मिक दुःखद घटनेस सामोरे जाण्याची वेळ आम्हा साऱ्यांवर आली. गेल्या ३०-३१ वर्षापासुन महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात अध्यापनाचे कार्य करणारे प्रा. अं. गं. चिपळूणकर यांचे दुःखद निधन ही सर्वांच्याच दृष्टीकोनातून एक धक्कादायक घटना ठरली. एक ध्येयवादी, निरलस व उत्कृष्ट अध्यापक म्हणून ते सुपरिचित होते. त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

ज्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळच्या क्षेत्रात विशेष दर्जाचे यश प्राप्त केले आहे. त्या सर्वांचे अभिनंदन.

महाविद्यालयातील विविध प्रकारचे उपक्रम, अभ्यासेतर हालचाली व वेगवेगळ्या योजनांचा व त्यांच्या वर्षभरातील कार्याचा परिचय या अंकात स्वतंत्रपणे दिलेल्या विविध अहवालावरुन सहज होउ शकेल

**श्रद्धांजली !**

या वर्षात खालील मान्यवर व्यक्तिच्या झालेल्या निधनाबद्दल त्यांच्या स्मृतीस अभिवादन करीत असतांना आम्हास अत्यंत दुःख होत आहे—

भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी, संजय गांधी, मराठीतील एक नामवंत साहित्यिक पु. भा. भावे, प्रताप कॉलेजचे प्राचार्य का. शु. लाड, भुसावल येथील कॉलेजचे प्राचार्य श्री. वि. ग. जोशी, प्राचार्य सुरु, प्राचार्य मालेगावकर, मराठी रंगभूमीवरील सुविख्यात नटसम्राज्ञी सौ. शांता जोग, सतीश दुभाषी, जयराम हर्डीकर या सर्वांस भावपुर्ण श्रद्धांजली!

**आभार !**

अजिंठा चा हा अंक तयार होण्यासाठी अनेकांचे परिश्रम सहाय्यभूत ठरले आहेत. विद्यार्थी-विद्यार्थीनींनी दिलेले स्वयंस्फूर्त लेखन सहकार्य, श्री. हरीश मिलवाणी यांनी स्वतः टिपलेले व मुखपृष्ठासाठी उपलब्ध करुन दिलेले छायाचित्र व श्री. वर्धमान यांनी सजावटीसाठी घेतलेले विशेष परिश्रम, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

या अंकाच्या छपाईची सर्वंकष जबाबदारी मे. आनंद प्रिंटर्सचे व्यवस्थापक श्री. भोळे यांनी स्वीकारुन जे सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचेही आभार !

तसेच अंक तयार करण्याच्या कामी आनंद प्रेस मधील विविध कर्मचाऱ्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

ज्या हितचिंतकांनी अंकासाठी जाहिराती देऊन आम्हास उपकृत केले त्यांचे आम्ही ऋणी आहोत.

प्रमुख संपादक

# नवीन विद्यापीठाचा आग्रह कशासाठी ?

- राज्यातील अविकसित भागात शैक्षणिक समानता प्राप्त करुन देण्यासाठी
- उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता यात वाढ करण्यासाठी
- शिक्षणाबरोबरच संशोधन कार्याला योग्य चालना देण्यासाठी
- वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे निर्माण होणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी
- विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणिवा व त्यांचा सामाजिक सहभाग यास व्यावहारिक जोड देण्यासाठी
- शिक्षण पद्धतीतील व्यापक बदलांसाठी
- कालानुरुप– शैक्षणिक कार्याची आखणी करण्यासाठी
- विद्यार्थी, प्राध्यापक, व प्रशासकीय कार्याशी संबंधित असणाऱ्या विविध व्यक्तींचे प्रश्न सोडविण्यासाठी
- सर्व ज्ञानशाखातील शिक्षण शक्य तितक्या लवकर मातृभाषेतून उपलब्ध करुन देण्यासाठी

(प्रा. स. दि. सिरसीकर यांनी भुसावळ येथे प्राध्यापकांच्या मेळाव्यासमोर सादर केलेल्या 'उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची गरज' या प्रबंधावर आधारित)

## क्रीडा–विशेष !

या वर्षी आंतरविद्यापीठ दक्षिण विभागातील मुलांच्या कबड्डी सामन्यांचे आयोजन करण्याची जबाबदारी विद्यापीठाने जळगाव विभागाकडे सोपविल्याने या सामन्यांचे आयोजन आमच्या महाविद्यालयामार्फत येथील स्टेडियम–ग्राऊंडवर करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. ताकवले यांचे शुभहस्ते झाले. या सामन्यांमुळे दक्षिण विभागातील विविध विद्यापीठातील कबड्डी खेळाडूंचे क्रीडा-नैपुण्य पहाण्याची संधी जळगावच्या क्रीडा रसिकांना लाभली. या सामन्यांचा समारोप जिल्ह्याचे लोकप्रिय जिल्हाधिकारी श्री.रामाराव याचे हस्ते झाला. विशेष अभिमानाची गोष्ट म्हणजे या सामन्यात पुणे-विद्यापीठ संघाने उत्कृष्ट दर्जाचे यश संपादन केले. या संघात आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. राधेश्याम कोगटा व अजित तडवी यांचा समावेश होता. हे दोन्हीही खेळाडू सुवर्णपदकांचे मानकरी ठरले!

卐 卐 卐

## कौतुक !

जिल्हा प्रसिद्धी कार्यालयातर्फे 'युनो दिनानिमित्त' आयोजित केलेल्या 'युनोचे कार्य' या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे यश मिळविल्याबद्दल महाराष्ट्राचे भूतपूर्व राज्यपाल माननीय सादिक अली यांचे शुभहस्ते कु. मुक्ता महाजन या विद्यार्थीनीला पारितोषिक देण्यात आले. त्याचप्रमाणे कु. मुक्ता महाजन हिने महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या वादविवाद स्पर्धेतही प्रथम पारितोषिक मिळविले आहे.

या यशाबद्दल तिचे त्रिवार अभिनंदन !

## आवाहन

चालू वर्ष हे अपंग वर्ष म्हणून साजरे होत आहे. अपंगांना त्यांच्या दुःखाचा विसर पडावा व त्यांचे जीवन सुखकर व्हावे यासाठी नागरिकांनी अपंग बंधूना सर्वतोपरी आर्थिक सहाय्य करावे ही विनंती.

**किशोर नेमाडे व**
**संपादक मंडळ**

# आजिंठा
# मराठी विभाग

"भाषा आणि वाड्.मय ह्यांना राष्ट्राच्या जीवनात अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. देशाच्या घटनेचे आणि प्रगतीचे वाड्.मय एक प्रभावशाली शस्त्र आहे. जीवनाची जी चिरंतन मूल्ये आज मानव जातीच्या प्रगतीपथावर ध्रुवताऱ्याप्रमाणे अढळ तेजाने तळपत आहेत, ती मूल्ये आणि सत्ये मानवजातीला साहित्यांनी दिलेली लेणी आहेत. आजच्या युगात मानवी जीवनाला अवश्य असणारे साहित्य हे सहावे महाभूत आहे. कोणत्याही स्वतंत्र राष्ट्राला सैन्यापेक्षा आणि आरमारापेक्षा साहित्याची आज जास्त जरूरी आहे. कारण सैन्य आणि आरमार फार झाले तर जिवंत राष्ट्राचे रक्षण करू शकेल, पण राष्ट्राला जिवंत ठेवण्याचे काम केवळ साहित्यच करु शकते. राष्ट्राच्या पौरुषाच्या आणि पराक्रमाच्या परंपरा जिवंत राखून त्याग, धैर्य आणि शौर्य हे गुण जनतेच्या अंगी येण्यास बंदूका तोफापेक्षा साहित्याचाच उपयोग जास्त होतो."

– आचार्य अत्रे

# त्वमेव माता च...

अजय सराफ
S. Y. B. Sc.

'मदर, यंदा मात्र मी दिवाळीच्या सुटीत घरीच जाणार बरं का!'

'हो का? अरे, वा! जा हं! कुठं जाणार रे? पपांकडे की ममीकडे'

'ते अजून ठरलं नाही. बघू, ज्यांचा आग्रह जास्त होईल तिकडे जाईन. खूप मजा करणार मी!'

'ओ. के., ओ. के बाबा! जा, खूप मजा कर, पण शाळा सुरु झाली की परत ये हो. आपल्या स्कुलला विसरायचं नाही आणि या गरीब मदरला पण, हो ना?'

'असं काय बोलता मदर? मी कधी तरी तुम्हाला विसरणं शक्य आहे का? तुमच्याशिवाय मला आहेच कोण? पपा, ममी काय चार दिवसांचे! खरी जोडी आपलीच; तुमची आणि माझी!'

मदरने त्याला नुसतेच थोपटले. उड्या मारीत तो समजूतदार जीव अवखळपणे निघून गेला. तो गेला त्या दिशेकडे कित्तीतरी वेळ मदर बघत राहिल्या होत्या. त्या नजरेत व्याकुळता होती. राजूसमोर त्यांचा अधिकाराचा, शिस्तीचा बुरखा गळून पडे. पांचगणीच्या इंग्लीश मिडीयम स्कूलच्या सुपरिंटेंडेंट, कठोर आणि कडक, पण राजूपुढे त्यांचे वरचे सगळे कवच गळून पडे, आणि आतला मातृत्वाचा सुप्त झरा झुळझुळू वाहू लागे, पण गुप्तपणे! आत्ताही त्यांचा जीव हेलावला. पोर किती आशेला आलंय! देव करो आणि बिचाऱ्याची एवढीशी इच्छा तरी पुरी होवो! त्यांनी आकाशाकडे पाहिले. उजव्या डाव्या हातांनी दोन्ही खांद्यांना स्पर्श करीत तो हात कपाळावर नेऊन त्यांनी क्रूसाची खूण करीत आकाशातील ख्रिस्ताला विनवणी केली, आणि आपल्या कामाला निघून गेल्या.

आज नेमकी अगदी एकाच दिवशी ममी, पपांची पत्रे आल्याने राजू खुषीत होता दोघांनी त्याला दिवाळीत बोलावले होते; पपांनी पुण्याला आणि ममीने दिल्लीला! कुणाकडे जायचे? बघू! कोण आधी येईल त्याच्याकडे जायचे. पण मग पपांकडे गेले की ममीला वाईट वाटेल. ममीकडे गेले की पपा नाराज होतील. जाऊ दे आत्ता एकाकडे, पुढल्या सुट्टीत दुसऱ्याकडे. राजू अगदी खुषीत मनोरे रचित होता. आपले पहिले पुण्याचे घर त्याला अस्पष्टच आठवत होते. आणि ज्या आठवणी होत्या त्या काही मोठ्या सुखावह नव्हत्या. पण किती झाले तरी त्या आठवणी घोळवण्यात त्याला आनंद वाटे, कारण ते त्याचे घर होते; त्याचे, ममीचे आणि पपाचे मिळून! तिघांचे एकत्र! त्याला तेव्हा ममी आणि पपा दोघेही लाभत होती. ती दोघे सारखी भांडायची खरी, पण निदान दोघांजवळ बसायला, जेवायला तर मिळत होते. दर भांडणानंतर ममी त्याला जवळ घेवून कधी रडायची, कधी पपांना शिव्या द्यायची. एक दिवस तो आपल्या मित्राकडे बर्थ डे ला गेला होता. गाडीतून उतरल्या बरोबर शोफर हात धरत होता, तरी त्याला झिडकारुन तो पळत पळत आत गेला होता. असे लोकांकडे फार आवडायचे त्याला. कसे छान हसरे, खेळीमेळीचे वाटायचे इतरांकडे. आणि त्याच्या घरी पपा सदा चिरुट ओढीत स्टडीमधे, नाहीतर काही तरी डिक्टेट करीत असलेले. ममी कुठे क्लबात,

नाहीतर महिला मंडळात नाहीतर पार्टी पिकनिकला घरी असली तर तिचे आपले निटींग पेंटिंग चालू. राजूची गाठ सतत आयाशी बांधलेली. आणि त्याला तर ती मुळीच आवडायची नाही, म्हणून त्या दिवशी समीरच्या घरी बर्थडेला जातांना त्याला फार बरे वाटले होते समीरच्या घरी किती मुले जमली होती. खूप मजा आली होती. केक कापला गेला, मेणबत्या विझल्या. पार्टी संपली. सगळी मुलं आपल्या आपल्या घरी गेली तरी त्याचा शोफर त्याला न्यायला आलाच नाही. बसला असेल विड्या फुंकत, आयाशी गप्पा छाटीत. राजू आपला तिथेच बसून राहिला होता. समीरच्या आईने त्याला प्रेमाने बसवून ठेवले होते. दोघे खेळत होती. तोवर संध्याकाळ झाली, तशी समीरच्या आईने पाट मांडला, त्याच्या भोवती रांगोळी घातली, त्यावर समीरला बसविले आणि निरांजनाने त्याला ओवाळले. त्याच्याबरोबर राजू-लाही बसवले होते, मग त्यांची दृष्टी काढली. राजू विस्फारलेल्या नजरेने हे सगळे पहात होता. त्यानंतर कित्ती तरी दिवस तो सगळा समारंभ त्याच्या डोळ्यासमोर तरळायचा. आपली ममी असले काहीच करीत नाही. आपल्या घरी कधी असे छान छान, शांत शांत नसतेच मुळी; सारखी भांडणे अन् ती सुद्धा इंग्लिशमधून. राजू मनात खंतवायचा, पण ममीशी बोलायची सोयच नसे. पपांपर्यंत तर त्याचे हात कधी पोहचलेच नाहीत. अशा कितीतरी वेदना त्याच्या हृदयात घर करुन होत्या. एखाद्या दिवशी त्यांचा फारच गलबला झाला तर मग तो टराटर कागद फाडत सुटायचा, ब्रशने कागदावर भराभर वेडेवाकडे रंगांचे फटकारे ओढीत बसायचा. अशा वेळी घरात कोणी नसले तर आयाची एखादी चापट सुद्धा बसायची. शिवाय पपा, ममी घरी आल्यावर तिखटमीठ लावून त्यांच्याकडे रिपोर्ट जाई तो वेगळाच.

त्यानंतरची गोष्ट. नुकताच राजू के. जी. त जायला लागला होता. भोवताली खेळणी पडलेली होती. मधून मधून टीचर काही तरी सांगत होत्या आणि इटुकल्या जिवांच्या पिटुकल्या गोष्टी आपापसात चालल्या होत्या, आई आणि बाबा हे त्याचे प्रचंड आधारस्तंभ. माझी ममी आणि माझे पपा या विष-यांच्याच सगळ्या गप्पा चालल्या होत्या. राजूनेही मोठ्या दिमाखाने आपल्या मित्राला सांगितले, 'माझी ममी नं, मला खूप खाऊ देते. आज तरी ती मला त्या दुकानातल्या शोकेसमधली गाडी घेऊन देणार आहे. किती ग्रेट आहे माझी ममी आणि पपा पण.' हो माहीत आहे ममी पपावाला मोठा. माझी ममीच तुझ्या ममीपेक्षा जास्त चांगली आहे. तुझी ममी तर तुला आता लांबच्या स्कूलमधे ठेवणार आहे.' किशोरने त्याला हिणवले.

'हॅट ! नाहीच मुळी !'

'नाही काय! होयच मुळी! कालच तुझी ममी माझ्या ममीला सांगत होती क्लबमधे !'

'हॅट ! खोटारडा कुठला ! तू खोटारडा तुझी ममी खोटारडी, तुम्ही सगळे खोटारडे !' बोलता बोलता राजूचा आवाज चांगलाच चढला आणि त्याने किशोरला दोन थापडा सुद्धा मारल्यात. तेवढ्यात टीचरने पाहिले आणि सोडवले म्हणून बरे. त्या दिवशी राजू धुसफुसतच घरी आला. ममीने त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण त्या लहानग्या जिवालाही कळले की त्या समजूत घाल-ण्यात जीव नाही. त्याच्या त्या भितीने खोल घर करुन ठेवले. आणि शेवटी ती भीतीच खरी ठरली. त्याला कळून चुकले की, किशोरने सांगितले होते तेच खरे होते. ममीने काढलेली समजूत खोटीच होती त्याची या पाचगणीच्या शाळेत रवानगी झाली. त्याने कित्ती वेळा ममीला विनवले, 'ममी, मी आता चांगला वागेन ग, मी काही त्रास देणार नाही, पण मला नकोना इतक्या दूर पाठवू.' पण ममीने काही ऐकले नाही. मग राजूही चिडला. घट्ट आवळून आणि न रडता ताठ मानेने मग छोटा राजू इथे दाखल झाला. फार कळायला लागले मग त्याला ममी, पपांचा राग तर त्या छोट्याश्या डोक्यात इतका ठासून भरला होता की परत कधी ममी, पपांकडे जायचेच नाही, सुटीत सुद्धा, असा त्याने निश्चय केला. पण त्याचा हा निश्चय त्याला ममी पपांपर्यंत पोहोचवायला संधीच मिळाली नाही. आपल्याला इथे का आणून ठेवले याचे स्पष्ट कारण त्या चिमुकल्या जिवालासुद्धा स्पष्ट कळून चुकले. आई-बापांपासून एकटे दूर आल्यामुळे त्याला आपो-आपच प्रौढ समज आली होती. नंतर येणाऱ्या पत्रांवरुन त्याला कळून चुकले होते की ममी, पपांनी डायव्होर्स घेतला होता. आपल्याला कटवून ममी दूर पळून गेली दिल्लीला, नव्या पपांबरोबर ! आणि पपांनी त्यांच्या सेक्रेटरीलाच नवी ममी बनविले होते. मदर त्याला हळूहळू मनावर फारसा आघात न करता सगळी परिस्थिती समजावून सांगत. पण पहिल्या एकाच आघाताने राजूचे वय एकदम दुप्पट, तिप्पट मोठे झाले होते. त्याला सगळे नाटक आपोआप उलगडत गेले होते; ममीने नवे पपा आणले आणि पपांनी नवी ममी. आणि हे करायला त्यांना मोक-ळीक मिळावी म्हणून माझी इथ पाचगणीला हकालपट्टी ! हुः ! जसे काही ममी पपा म्हणजे शोकेसमधील खेळणीच की नाही ? आवडले की दिले फेकून आणि आणले नवे ! मला काय त्या नवीन पपांशी करायचंय? बसा तुमची तुम्हीच घेऊन. आमची आपली आम्हाला ही शाळाच बरी ! एवढ्यासाठीच आमची कटकट दूर केली काय ? म्हणे, 'तू नीट वागत नाहीस, कागदं फाडतास, रंग खराब करतोस, कुणी पाहुणे आलेत की नीट बोलत नाहीस. म्हणून तुला शिस्त लावण्यासाठी होस्टेलवर ठेवायचे ! मला शिस्त लावतात ! आणि मग यांना कोण शिस्त लावणार ? आम्हाला आपले लांब कटवले. आता त्या घरातही नवी ममी आलीय. माझी चित्रे आणि माझी खेळणी नीट ठेवली आहेत. की नाही कोण जाणे ! राजूला कधी फार रडू येई, कधी फार राग येई. कधी ममी पपांच्या फारच आठवणी येत. पण सगळं कुणाजवळ बोलायचे ? भावनांच्या उर्मी मनात उमटायच्या आणि मनातच जिरायच्या. शेवटी त्या लाटाही मनावर आपटून आपटून बोथट होऊन गेल्यात. आपटायच्या थांबल्या राजूचा आणि पपांचा संबंध आता फक्त येणाऱ्या पैशांपुरताच उरला होता. पपांनी दर महिन्याला पैसे पाठवायचे आणि राजूने पैसे मिळाल्याची पावती आणि थँक्स! ममीकडून अधून मधून पत्र आणि बर्थडे प्रेझेंट बस ! शाळेच्या मदरवर मात्र त्याचा जीव जडला होता, कारण त्याच्या मनाला समजून चुकले होते की या जगात आता आपले त्यांच्याशिवाय कोणी नाही. त्याच्याबरोबर शिकणारी सगळी मुले त्याच्या सारखीच छोटी छोटी होती. तिथेच घर असणाऱ्या आणि नुसत्याच शाळेत येणाऱ्या मुलांची संध्याकाळी घरी जायची धावपळ बघून त्याला यांचा हेवा वाटे. होस्टेलवर रहाणाऱ्यांपैकी सुद्धा काही त्याच्यासारखी लांबून आलेली, पण तरी राजूची परिस्थिती काही वेगळीच होती. या होस्टेलवर रहाणाऱ्या मुलांना त्यांची घरे होती. दिवाळीच्या व मे महिन्यांच्या सुटीत त्यांचे आई वडील त्यांना न्यायला येत. सुट्टीभर त्यांच्या-वर कौतुकाचा वर्षाव होई. मोठ्या प्रेमाने निरोप दिला जाई व परत येणाऱ्या सुट्टीकडे डोळे लावुन बसत. त्यांनी आपली मुले खरोखरच शिस्त लागावी, चांगले शिक्षण व्हावे म्हणून तिथें ठेवली होती. पण राजू सुटीत कुठे जाणार ? आई, वडील दोघही आपापल्या नव्या संसारात रमले होते. त्यांना राजूकडे लक्ष द्यायला वेळच नव्हता.

पण तरी तो माघार घेणार नव्हता. त्याची समज वाढली होती. इतर मुले सुट्टीच्या, आईवडीलांच्या गोष्टी सांगायला लागली की तोहि हिरिरीने आपल्या घरचे वर्णन करी. ममी पपांच्या गोष्टी सांगे आणि खोलीत येवून मात्र रिकाम्या भितींना खरी परि-स्थिती सांगून पोटभर रडून घई. इतर मुलांचे पाहुन तो छोटा जीवहि घरी जाण्यास आसुसलेला असे. ममी पपांशी कधी न बोलण्याचा आणि घरी न जाण्याचा निश्चय कधीच बारगळला होता. पण पहिल्या वर्षी त्याला कुणीच बोलावले नाही; ममीने नाही आणि पपांनीही नाही. राजू मनातून हिरमुसला, नाही कष्टी झाला. आपल्या खोलीत जाऊन खूप रडला. पण मित्रांना मात्र त्याने सांगितले, 'माझा अभ्यास किती मागे राहिलाय. इथलं स्टँडर्ड ठेवायच म्हणजे मला चांगलाच जोरात अभ्यास करायला हवा. पपा, ममी तर सारखं बोलावून राहिलेत, पण मीच सांगितल, मला इथं खूप आवडतं. मस्त शाळा आहे. मी काही सुटीत येणार नाही. मला खूप अभ्यास करायचाय. इथल्या मदर माझा अभ्यास करुन घेणार आहेत.' मुलांना बिचाऱ्यांना वाटे काय ग्रेट मुलगा आहे. आपल्याला तर बुवा नाही रहावणार आईकडे गेल्यावाचून. सगळी मुले त्याच्याकडे मोठ्या आदराने बघत. आई-वडीलांना त्याच्याविषयी सांगत आणि मोठ्या आनंदाने किलबिलत टॅक्सीतून त्यांच्याबरोबर भुर्रदिशी निघून जात. त्या दृश्याकडे मोठ्या आसुस-लेल्या नजरेने तो डोळे भरुन पाही आणि आपले रडू लपवण्यासाठी पट्कन् खोलीत जाऊन पुस्तकात डोके खुपसे.

दुसऱ्या वर्षी पपांचे पत्र आले, ' राजू बेटा, तू आता तिथे कंटाळला असशील. या सुटीला तुला इकडे आणावे, चार दिवस तुलाही बरे वाटेल. असे ठरवले होते, पण काय करु ? नेमके याच वेळी मला टूरवर जावं लागतय. नाहीतर तुला घेऊनच आलो असतो, पण बेटा, पुढच्या वेळी तुला नक्की घेऊन येईन.' राजूने कडवटपणे हसत तो घोट गिळला. ममीनेही लिहीले होते, ' तुला खरे म्हणजे या सुटीत मी इकडे दिल्लीला आणणार होते रे. तुझे नवे पपासुद्धा सारखे म्हणत आहेत, पण काय करु ? मलाच बरे नाही. पण तू काळजी करु नको परंतु तुला सध्या आणता येणार नाही. पुढल्या सुटीत नक्की आणीन हं ! रात्री एकट्या उशीला राजूच्या गरम श्वासांनी सगळी कहाणी सांगितली. दुसऱ्या दिवशी मात्र सगळ्या मुलांच्यात त्यांने आपली घरी जाण्याची तारीख निश्चित केली; काळजीपूर्वक ! सगळी मुले गेल्या नंतरची येईल अशी काळजी घेऊन. एकट्या मदरपुढे मात्र त्याचा मुखवटा गळून पडे. आत ही त्यांच्या नजरेला नजर न देता तो खोलीत निघून गेला होता. सबंध सुट्टीभर मग त्याला मदरनेच समजुतीने सांभाळले होते.

या वर्षी मात्र राजू खुशीत होता. मम्मी, पपा दोघांचीही पत्रं आली होती. आता यंदा मात्र नक्कीच कुठेतरी जायचे. बघू ! पुणे नाही तर दिल्ली. आपल्याला काय कुणीही चालेल. चार दिवस रहायचे आणि परत यायचे. सगळ्या मित्रांप्रमाणे गावाला जायाची, आई-वडीलांना भेटायची, सुट्टीतल्या मजेची स्वप्ने तो रंगवायला लागला त्याचेकडे बघून मदरचेही मन हेलावले. बिचाऱ्याची एवढीशी तरी इच्छा पुरी होऊ दे म्हणून, त्या आकाशातल्या बापाची विनवणी करायच्या. सुटी सुरु होण्याचा दिवस जवळ येत चालला. राजूचा स्वप्ने रंगत रंगत अगदी क्लायमेक्सला पोहोचायला आली होती. ती आईबरोबर की पपांबरोबर साकारायची. येवढेच ठरवायचे होते. जे कोणी आधी येईल. त्याच्याबरोबर जायचे. अधीरता वाढत होता. एकीकडे टर्मिनलची तयारी चालली होती. टर्मिनल झाली. शवटचा पेपर संपला. फारच उतावळी असणारी मुले आपल्या घरी निघाली सुद्धा. काहींचे वडील एकदोन दिवसात आलेही. पुणे की दिल्ली ! राजूच्या मनाने दोन्ही दिशांनी लाखो वेळा उड्डाण केले. प्रत्यक्ष जाण्याची तयारी करुन ठेवली. मदर त्याची अधीरता बघत होत्या. जास्त जोरजोरात प्रार्थना पुटपुटत होत्या.

आणि पोस्टमनने राजूसाठी दोन पत्रे आणली. ममीचं आणि पपांचं पत्र ! मोठ्या अधीरतेने राजू ती घेऊन आपल्या खोलीत गेला. ' कधी येताहेत ? कोण आधी येतंय् ? ममी येते की पपा येताहेत ? आज की उद्या ? पण नक्की येणार आहेत का ? थरथरत्या हातांनी आणि धडधडत्या हृदयाने एक पत्र फोडले, वाचले, हात कापत दूर फेकून दिले. दुसरे फोडले वाचले आणि तुकडे तुकडे करुन कोपऱ्यातल्या टोपलीत फेकून दिले त्याला खरे म्हणजे गदगदून रडावेसे वाटत होते, संतापाने किंचाळावेसे वाटत होते. कोणालातरी चावावे आरबडावेसे वाटत होते, पण तो नुसताच भकास नजरेने बघत राहिला. दारावर टक्टक् आवाज ऐकून तो भानावर आला. खरे म्हणजे आता कोणी यायला नको होते, पण खट्खट् वाढतच होती, दार उघडणे भागच होते. मदरना दारात बघून तो चपापला. त्या कधीच कुणाच्या खोलीत जात नसत. राजू दिङ्मूढ झाला पण तीन वर्षे अंगात मुरलेली शिस्त. त्याने उठून मदरना विश केले. मदर त्याच्या केसावरून हात फिरवित होत्या, ' राजू ' यंदा मी आत्ता सुट्टीत खूप लांब म्हैसूर, बंगलोरला जाईन म्हणतंय. जरा चेंज! तुला यायचयं माझ्या बरोबर? ' एवढ्या मोठ्या मदर त्यांच्याबरोबर मी जायचे ? राजूच्या डोक्यात आधी अर्थच शिरेना. शिरला तेव्हा पटेना आणि पटला तेव्हा तो एकदम मोठ्यांदा वेड्यासारखा हसायला लागला; आणि तेवढ्याच जोरात त्यांच्या कुशीत शिरून मोठमोठ्याने रडू लागला. स्वतःला पूर्णपणे हरवून हुंदक्यावर हुंदके देऊ लागला. !

# सामंजस्य

सुभाषराव त्र्यंबकराव फुसे
M. A. ( Jr. )

सुधाकराचे लग्न होऊन ८-९ महिने झाले होते. त्याचा संसार अगदी सुखात चालला होता. संसारसुखात कोणतीही उणीव नव्हती. मीना व सुधाकर दोघेही एकमेकाच्या सुखासाठी धडपडत होते. आपल्यासाठी त्रास वा दुःख होणार नाही याची ते मनोमन काळजी घेत. त्यामुळे एकास त्रास झाला असता दुसऱ्यास दुःख होई. असे असतांन ही. चालता-चालता मध्येच खडा रुतून त्रास व्हावा तसे दुःख सुधाकराला होई. कधी-कधी मीना इतकी उदास होई की त्याच्या छातीत धस्स होई ! एखादे उमलेलले फूल खूप जपूनही, ते कोमेजतांना पाहून माळ्याच्या मनास जे दुःख व्हावे तेच दुःख सुधाकरास होई. एखाद्या सुग्रास जेवणात अचानक खडा लागावा, तसे त्याला एवढ्या सुखीसंसारात मीनेला उदास पाहून वाटे.

कोणतीही उणीव नसतांना, दुःखाचे सावट देखील नसतांना मीना एवढी उदास का असावी ? तिला काय दुःख असावे? काय कमी वाटत होते? माहेरची आठवण होऊन तर ती उदास होत नसवी ? काय घडत होते म्हणून ती अशी उदास होत होती ? आपल्या समारात सुखी असल्याचा भास निर्माण करून ती कुढत तर नसावी? सुधाकरने तिला काही-वेळेस विचारले सुद्धा परंतु तिने त्यास समाधानकारक उत्तर दिले नव्हते खरे सांगावयाचे तिने टाळले होते कारण आपले दुःख त्याला सांगण्यासारखे नाही असे तिला वाटत होते. तिच्या खऱ्या बोलण्याने नंदनवना-सारख्या सुखी संसारात आग लागणार होती. सारे जीव पश्चाताप, दुःखाच्या आगीत होरपळून निघणार होते. तिचा खरा शब्द या संसाराचा एकच घोट घेणारा विषाचा प्याला होता. ते विष पचवून ती स्वतः हा संसार अबाधित राखणार होती.

परंतु नियतीला ते मान्य नव्हते. नियतीचे खेळच काही निराळे असतात. मानवास एखाद्या कळसुत्री बाहुल्यांप्रमाणे ती नाचवत असते. त्याच्या मनाचे तिथे काही चालत नाही, तो चिंततो काही आणि नियती घडवते काही दुसरच! कुणाच्या सुखदुखाःची नियती म्हणजे श्रद्धा, विश्वासाची तिला कदर नसते. नियती म्हणजे एक तुफानी वादळ. जे एका क्षणात सार उलटसुलट करुन टाकते !

एके दिवशी ४-४। च्या सुमारास चंदू मीनाकडे आला. त्याला पाहून मीनाला आश्चर्य वाटले व आनंदही झाला. परंतु तिने मन घट्ट केले. मनीचे भाव मनातच दाबून टाकले व त्याच्याशी एखाद्या तिऱ्हाइताप्रमाणे ती वागली.

" कोण आहे घरी ?" चंदूने तिला विचारले.

" कुणी नाही, मी एकटी आहे."

" अरे! निदान आंत ये तर म्हणशील की नाही,?

" ये ना !

" माझ्या येण्याने तुला आनंद नाही वाटला? किती भटकलो तुझा पत्ता शोधण्यासाठी!

" कशाला उगीचच त्रास घेत बसलास ?"

" मीना हे तू बोलतेस ?"

होय म्हणणे मीनाच्या जिवावर येत होते. परंतु नाही म्हणणही तिला शक्य नव्हते. ती विवाहबद्ध होऊन एकाची पत्नी बनली होती. एकेकाळी ती ज्याच्या-साठी सर्वस्व पणाला लावायला तयार होती, ती त्याच्याशी आता मोकळेपणाने बोलूही शकत नव्हती.

कारण तो उगीचच दुःखी झाला असता, त्याला वाईट वाटले असते, त्याने तिला त्याच्याबरोबर चलण्याचा आग्रह केला असता. म्हणून तिने मन कठोर केले व म्हटले, " होय."

" मीना किती बदललीस तू? माझ्या एका शद्बासाठी वाटेल ते करायला तयार असणारी मीना कुठे गेली? तू माझ्याशी मनमोकळे पणाने सुद्धा बोलू नयेस !" त्याचा चेहरा फारच कष्टी, रडवेला होऊन गेला.
" मला समजण्याचा प्रयत्न कर चंदू मी विवाहीता आहे. पती असतांना दुसऱ्या माणसांचा विचार येणे देखील पाप आहे. मी मन मोकळे केले तर तू अजून वेडा होशील. तुझे दुःख मला पाहावणार नाही. हे बंध तोडण्याची ताकदही आता माझ्यात नाही. कुणाचा विश्वासघात करण्यासारखं मोठ पातक नाही. मी सुखी असावी अशी तुझी इच्छा आहेना ? मी इथे फारच सुखी आहे. माझा पती माझ्या प्रत्येक सुखा साठी धडपडत असतो. माझ्यावर किती विश्वास आहे त्यांचा ! अस असतांना मी विश्वासघात करून, त्यांचे मन दुखवणे किती महाभयंकर आहे? कधी-कधी तुझे विचार येऊन मी उदास होते. ते पाहुन किती दुःख होते त्यांना ? नंतर माझा मलाच पश्चाताप होतो. आपली मने आधीच तुटलेली आहेत. आपल्याबरोबर दुसऱ्यास कशाला दुःखी करावे ? थोडे दुःख सहन कर, सवय होईल व एक दिवस तुला पूर्ण विसर पडेल."

" नाही मीना, नाही ! तुला विसरणे इतक सोप कां आहे ? ज्यावेळेस या शरीररुपी सापळ्यातील काळीज कापून काढून फेकल जाईल तेव्हाच मी तुला विसरु शकेन! तरीही ते काळीज तुझ्याच नांवाचा जप करीत असेल ?"

" चंदू, विवाहबंधनाने मी बांधली गेलेली नसती तर वाटेल ते केले असते. परंतु आता मात्र मला बंधन आहे. ती वेळ टळून गेलीय आता आपण पूर्वीच सारी बंधने तोडून एकत्र यायला हवे होते. आता माझ्याकडून कोणतीही अपेक्षा ठेवू नकोस. मला विसर, मला सुखी पहायच असेल तर मला विसर! आपणाबरोबर आणखी एका जीवाचा बळी घेऊ नकोस ही तुझ्या चरणी प्रार्थना आहे."

" काही हरकत नाही मीना, तुझे सुख तेच माझे सुख, परंतु तू खरोखर सुखी बनशील का ? कधी सुखी असशील कां? खर सांग कधीच तुझ्या मानत माझा विचार येणार नाही कां ? नाहीं ! तू मनात कुढशील, कधी सुखी होणार नाही. परंतु तुझी इच्छा तीच माझे सर्वस्व. " एवढे बोलून तो फिरला त्याचा कंठ दाटलेला होता. त्याने डोळ्यांच्या पाण-वलेल्या कडा पुसल्या. आणि तो दाराबाहेर पडणार तेवढ्यात सुधाकर पुढे झाला व त्याने चंदूस म्हटले, "अरे चाललाही ? ये ना !"

सुधाकरला अचानक पाहून मीना व चंदू या दोघासही आश्चर्याचा धक्का बसला व भीतीने अंग शहारले. तरीही धीराने चंदू म्हणाला, "नाही सुधाकर मला जाऊ दे. मला फार दूर जायच आहे. उगीचच मोहपाश नको."

"अरे वेडया हे मोहपाश आणि आशा आहेत म्हणूनच माणूस खडतर जीवन जगण्यास तयार आहे. ते नसते तर माणसात आणि दगडात काही फरक राहिला नसता. त्याला काहीही दुःख झाले नसते. तो वेडा झाला नसता. दुःखात कुठेतरी भटकला नसता. तू दुःखी आहेस, खरा दुःखी आहेस, तू कुठे भटकू नये म्हणून मी तुला एक साथीदार देणार आहे. जो तूला सावरेल."

चंदू सुधाकरकडे पहातच राहिला. तो काय म्हणतोय हेच त्याला कळेना विश्वास बसत नव्हता सुधाकराच्या शद्बावर. तेव्हा सुधाकराने त्याचे त्याला विश्वासात घेण्यासाठी म्हटले. " मी सर्व काही ऐकले आहे. माझ्या-बऱ्याचदा मीनालाही मी उदास पाहिल आहे. माझ्या कडे तिला सर्व सुख आहेत. तरीही तिला मी खरे सौख्य, मनःशांती देऊ शकत नाही ही मला फार मोठी खत आहे. तिला दुःखी पहाणेही मला जमत नाहि. विशेष म्हणजे प्रेम काय आहे ? त्याच्या दुखाःच्या कळा काय असतात याची मला पूर्ण कल्पना आहे. मी सुद्धा कधी काळी प्रेम केले होते. ते विफल ठरले अशाच प्रकारच्या लाचारीने ! आज तुमचे प्रेम पाहून मला फार गहिवरून आले. मीनाच्या सामंजस्याने, विश्वासाने, निष्ठेने माझे मन इतके ओथंबले आहे की, मी तिचे सुख तिला परत केल्याशिवाय ते हलके होणार नाही." सुधाकराने तो मीनाचा हात चंदूच्या हातात दिला. तिने

झटकला व ती म्हणाली, " काय करता आहात हे तुम्ही ?"

वेडे ! विवाह म्हणजे सर्वस्व नव्हे ! मी तुला सुखीकरण्यासाठी किती धडपडत होतो ? आज आलेला हा क्षण मी दवडणार नाही. विवाहाचे बंध मी तोडणार आहे. जे बंधन सुखी करू शकत नाही, त्या बंधनांत राहून काय फायदा ? जा, तुझ्या जाण्याने मला दुःख होणार नाहीय्. मला असहाय्य माणसाला सहाय्य केल्याचे, सुखी केल्याचे समाधान लाभणार आहे. " आणि त्याने डोळ्या-तील टिपे पुसली, " ही टिपे दुःखाची नव्हती आनंदाची, समाधानाची होती.

# मी कोण ?
# तो कोण ?
# ती कोण ?
# ते कोण ?

**कु. वर्षा कुळकर्णी**
T. Y. B. Com.

१) कोणीतरी पहात आहे
कोणीतरी बोलत आहे
कुणीतरी नजर ठेवून चालत आहे
असा इशारा देणारी
आतल्या आवाजात स्फूर्ती देणारी
ती कोण ?

सदसद्विवेक बुद्धी

२) ते घडेलच्
ते होईलच
ते मिळेलच
जे नाही
ते पाहीनच
असा तर्क विसंगत विश्वास
व्यक्त करणारी
ती कोण ?

श्रद्धा

३) प्रश्न दुसऱ्याचे
कोडे दुसऱ्याचे
पण उत्तर त्याचेच
गुण देणारा तोच
कायद्याचा पदवीधर
तो कोण ?

न्यायाधीश

४) पूर्वीची ती,
आताची ही
पूर्वीची स्वप्नाळू
आताची व्यवहारी
पूर्वीची सुंदर
आताची रुक्ष
पूर्वीची प्रेयसी
आताची कोण ?

पत्नी

५) चढत्या काळात जर
चांगले वागलात
तर पडत्या काळात
तीच तुम्हाला
भेटेल
ती कोण ?

माणुसकी

# बढाया मारणे- एक कला !

सु. मु. गगडाणी
T. Y. B. Com.

सर्वसाधारणपणे मनुष्य हा स्तुतीप्रिय असल्याने ही स्तुती इतरांकडून कशी होईल याचा तो प्रयत्न करीत असतो. या प्रयत्नात जर तो अपयशी ठरला तरी सुद्धा स्वतःची स्तुती करणारेही काही लोक दिसतात. यांनाच आपण 'बढाया मारणारे' असे म्हणतो.

शरीराने दुबळ्या असलेल्या एखाद्या व्यक्तीने हिमालयावर चढून जाण्याच्या बाता मारणे किंवा महाविद्यालयीन स्पर्धेमधूनच बाद झालेल्या एखाद्या खेळाडूने राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये भाग घेण्याची फुशारकी मारणे हा चारचौघांमध्ये एक मनोरंजनाचाच विषय होवून बसतो. व अशा वेळी त्याला चारचौघांकडून गप्प बसविले गेले की मग पहावी त्याची तारेवरची कसरत! म्हणूनच बढाया मारणे ही एक कला असून ही कला ज्याला जमते त्यालाच जमते. समजायला सोपी पण करायला कठीण अशी कोणतीही गोष्ट म्हणजे कला! ही कला वाटते तितकी सोपी नाही. त्याचेसुद्धा तंत्र आहे! आणि ज्यांनी हे तंत्र अवगत केले आहे, त्यांनाच त्यात यशस्वी होता येते.

कुठलीही गोष्ट लहानाची मोठी करुन किंवा एखादी गोष्ट घडलेली नसतांना सुद्धा ती गोष्ट घडलेली आहे असे भासवून आपल्या बढाया लोकांच्या गळी उतरविण्यात काही व्यक्ती फारच तरबेज असतात. अशा वेळी मला माझ्या काही मित्रांची आठवण येते. यापैकीच एका महाशयांना प्रत्येक गोष्टीत बढाया मारण्याचा सवय ! आणि त्या लोकांना ऐकवण्यासाठी हे जणू संधीची वाटच पहात असतात. अशा वेळी यांच्या तडाख्यात एखादा महाभाग सापडला तर बिचाऱ्याला आपली सुटका करुन घेणे म्हणजे महाकठीण कर्म !

असाच काही कामानिमीत्त मी त्या मित्राच्या घरासमोरुन जात असतांना त्याची हाक माझ्या कानी पडली. मी हाक ऐकलेली असतांना सुद्धा मुद्दाम तिकडे दुर्लक्ष केले व झपाझप पावले टाकायला लागलो. तोच पुन्हा त्या मित्राची हाक माझ्या कानी पडली. तो मला बोलवण्यासाठी माझ्याच दिशेने येत आहे हे लक्षात आल्यानंतर माझा निसटण्याचा प्रयत्न निष्फळच ठरला.

थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मी त्याला विचारले 'तू मुंबईहून, केंव्हा आलास'? मध्यंतरी तो मुंबईला गेला होता असे मला माझ्या मित्राकडून कळले होते. झालं! एवढं विचारण्याचाच अवकाश ! त्याचे डोळे लगेचच मोठ्या आनंदाने चमकले आणि त्याने बढायांची पंजाब मेलच सोडली. तो म्हणाला 'अरे ! मी परवा मुंबईहून आलो, व लगेच उद्या पुन्हा मुंबईला जात आहे. त्याचं काय आहे, की माझे काका मुंबईला असतात हे तुला माहितच आहे.' त्यांचा बंगला किती मोठा आहे हे माहित आहे तुला ? माझ्या उत्तराची किंचीतही वाट न पहाता तो पुढे म्हणाला 'अरे,! माझ्या काकांचा बंगला तर शूटींगसाठी वापरला जातो. अमिताभ, धर्मेंद्रशी माझी त्यामुळे चांगलीच ओळख झालेली आहे. उद्या मी शूटींग पहाण्यासाठीच तर जात आहे. वस्तुतः त्याचे काका तेथे एक साधे कारकून आहेत हे मला माझ्या मित्राकडून अगोदरच कळलेले असतांना देखील मी त्याच्या बढायांच्या महापुराला संयमाचा बांध घालू शकलो नाही !

वरील मित्राची फिल्मी सिताऱ्यांची कौतुक करण्याची धडपड तर दुसऱ्या एका मित्राची बढाया मारण्याची आणखीनच एक अजब तऱ्हा ! याच्या बढाया नेहमीच इंपोर्टेड वस्तूंशी संबंधित असतात. त्याचे असे आहे की एखाद्या वस्तूबद्दल या महाशयांना विचारायचाच अवकाश की यांचे आपले 'इंपोर्टेड' पुराण सुरु याबद्दल आता सांगायचेच झाले की मला आठवते, एकदा त्याच्या घरी गेलो असतांना मला समोरच एक नवीन टी. व्ही. सेट दिसला. सहज म्हणून मी विचारले, 'का रे टी. व्ही. सेट नवीन दिसत आहे, कुठल्या कंपनीचा आहे?' तो लगेच उत्तरला 'अरे, हा काही इंडीया मेड नव्हे ! चांगला इंपोर्टेड आहे.' कारण इंडीया मेड वस्तू अशाऽऽच असतात हे यांचे प्रामाणिक मत असल्याने यांच्याकडे सर्व वस्तू इंपोर्टेडच असतात. हा मित्र रहातो भारतात पण कौतुक मात्र विदेशी वस्तूंचे! भारतात रहाण्यापेक्षा बाबारे तू तेथेच जावून का रहात नाहीस? असा प्रेमळ सल्ला त्याला द्यावासा वाटतो. पण हे सांगावयास मित्रप्रेमामुळे मन धजत मात्र नाही.

अशावेळी तेथून आपला पाय काढलेलाच बरा असतो अतिरेकी पुत्रप्रेमामुळे कोणी आपल्या मुलाच्या बढाया मारतो तर एखादा आत्मप्रौढीने आपल्याशिवाय फॅक्टरीच चालू शकणार नाही असे वाटत असल्याने सतत त्याबाबतच कौतुक करतो. काहींची आपण दिवसभर किती बिझी असतो हे दुसऱ्यांना पटविण्यासाठी धडपड चालू असते. अशा रितीने या बढाया मारणाऱ्या व्यक्तींची विविध प्रकारे बढाया मारण्याची अहमअहमिका दिसून येते. फक्त ऐकण्याची सहनशीलता आपल्याजवळ असली म्हणजे पुरे !

कुठलीही साधी गोष्ट तिखटमीठ लावून सांगीतली की ती जास्त चवदार होते, असा गोड गैरसमज हो बढाया मारणारी मंडळी करुन घेतात. पण ऐकणाऱ्याचे तोंड मात्र एरंडेल घेतल्यासारखे होते हे त्यांच्या ध्यानीमनीही नसते. ही मंडळी कशाबद्दल आणि किती बढाया मारतील हे जेथे परमेश्वराला सुद्धा सांगता येणार नाही; तेथे आपल्यासारख्यांची काय गोष्ट घेवून बसलात.'

## आम्ही

सतीश मदाने
T. Y. B. A.

वाळूचे मनोरे आम्ही कधी रचलेच नाही
पत्त्यांचे बंगले सुद्धा उभारले नाही
मृगजळामागे धावणे तर
आयुष्यात कधी जमलेच नाही
दिवा स्वप्नात कधी रंगलोच नाही
अशक्यांचा हव्यास कधी धरलाच नाही
कारण.........
जगाचे व्यवहार " वास्तव " असतात
हे आम्ही कधी विसरलोच नाही.

## वादळ

जयंत दीक्षित
S. Y. B. A.

मनःसागरात उठलं आहे वादळ !
स्वप्नांच्या उठताय् लाटा
हादऱ्यांनी डोलतोय् मनाचा तारू
भीती आहे फुटण्याची
सागर भरतीस नाही अंत
वर उठल्याय् भावनांच्या लाटा
मग जर का फुटल तारू ?
होईल महा प्रलय !!
पण बांधले आहेत बंधारे
लाजेचे की भीतीचे
पण आता भरती चढलीय्
वेळ आहे थोडा
तुटेल बंधारा
आणि मग !

# महात्मा गांधीच्या दृष्टीने समग्र ग्राम विकास

कु. अंजली वसंत कुळकर्णी
S. Y. B Com

भारत हा एक विशाल देश आहे. जगातील सर्व प्रकारचे हवामान, भूप्रदेशांचे सर्व प्रकार, छोटया मोठ्या नद्या व पर्वत, नाना तऱ्हेची खनिजे असलेला निसर्गसौंदर्याने समृद्ध असा हा देश आहे. तथापि निसर्गाने समृद्ध असूनही या देशात राहणारे आपण मात्र दरिद्री आहोत. त्याला कारण ग्रह नाही, देवता नाहीत तर आपणच आहोत.

## खेड्यातील व्यवहार शहरांच्या हातात

भारताची जनसंख्या अदमासे ६० कोटी आहे. त्यातील बहुसंख्य लोक खेड्यात राहतात. शेतीवरच त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. त्यांच्या स्वतःच्या हितसंबंधाने खेड्यातील शेतकरी अज्ञानी आहेत. शेती ही बहुतांशी निसर्गावरच अवलंबून आहे. याशिवाय शेतीत उत्पन्न होणाऱ्या मालाची क्रय व्यवस्था व इतर बहुतेक योजना या त्यांचे हित लक्षात घेऊन केल्या जात नाहीत. शहरातील लोकांचे राजकीय व आर्थिक बाबतीत वर्चस्व असल्याने व्यापारी व श्रीमंत लोकांच्या हिताच्या दृष्टीने आखल्या जातात.

## ग्रामीण भागाच्या अज्ञानाचा परिणाम

गावातील कच्चा माल शहरात पाठविला जातो. त्यातील काही माल परदेशात जातो. शहरातील कारखान्यात अगर परदेशात त्याचा पक्का माल तयार केला जातो. अर्थातच नफ्याचा मोठा हिस्सा ग्रामस्थ शेतकऱ्यास मिळत नाही. कच्चा माल विकून आलेल्या थोड्या पैशातून त्यास त्याच्या जीवनासाठी व व्यवहारासाठी आवश्यक असा पक्का माल त्यांचेकडून खरेदी करावा लागतो. अखेरीस तो दरिद्रीच राहतो. गावातल्या गावात जर पक्का माल करण्याची व्यवस्था करता आली तर या परिस्थितीत बदल घडू शकेल. परंतु दिखाऊ माल विकत घेण्याच्या आकर्षणामुळे खर्चाकडे व शरीर-स्वास्थ्याकडे न पाहता तो विकत घेण्याची प्रवृत्ती वाढली आहे. परिणामतः ग्रामीण उद्योगधंदे बुडाले आहेत. तथाकथित 'पॉश' संस्कृती विदेशी वस्तूंच्या मोहात अडकली आहे.

खेड्यातल्या खेड्यात बनलेली वस्तू अधिक स्वस्त पडते, परंतु यंत्राने कारखान्यात बनलेल्या वस्तूंचा मोह व आकर्षण यामुळे धनिक अशा वस्तू वाटेल ती किमत देऊन खरीदतात व अविवेकी लोक त्यांचे अंधानुकरण करतात व ऐपत नसतांना अशा वस्तू खरेदी करतात. गावातील चांभार उपाशी असतांना बाटाचा बूट वापरण्यात आम्हास धन्यता वाटते. गावातील विणकर नामशेष होत आहेत कारण टेरीकॉट, टेरीलीन, टेरीवूलच्या जाळ्यात लोक अडकलेले असतात त्यांच्या पैशांचा ग्रामीण जनतेस उपयोग होत नाही.

## अशान्तीचे कारण

ग्रामीण धंदे बसविण्यात यंत्रांचा भाग फार मोठा आहे. कपाशीची सरकी काढून दोरा काढणे व मागावर कापड विणणे, जात्यावर दळण दळणे घाण्यातून तेल काढणे इ. अनेक ग्रामोद्योग यंत्रांच्या वापराने बुडाले आहेत.

पूर्वी जीवनास आवश्यक असलेल्या साऱ्या वस्तू गावातल्या गावात तयार होत. आता गावाचा व्यापार कारखानदारांच्या हातात गेला आहे. भरमसाठ किमत देऊन ह्या वस्तू ग्रामीण लोकांना विकत घ्याव्या लागत आहेत पूर्वीचा कारुनारूंचा गावगाडा संपूर्ण मोडकळीस आला आहे. परावलंबित्व व महागाई यामुळे ग्रामस्थांची मनःशान्ती बिघडली आहे

## आपले अर्थशास्त्र कसे हवे ?

ग्रामहिताचा दृष्टीकोन लक्षात घेऊन आमच्या अर्थशास्त्राची रचना झाली पाहिजे. गावातील उद्योग धंदे व शेती सुधारीत पद्धतीने होण्यासाठी तेथील जनतेस शिक्षण दिले पाहिजे, त्यांचे अज्ञान गेले पाहिजे. गावात तयार झालेली वस्तू खरेदी करण्याची प्रवृत्ती वाढली पाहिजे. आज योग्य ज्ञानाच्या व संशोधनाच्या अभावी नैसर्गिक संपत्तीचा वापर ग्रामीण जनतेस जसा करावा तसा करता येत नाही. तेव्हा या परिस्थितीत पालट होऊन गावातील संपत्ती गावातच कशी राहिल व ती उपयोगात आणली जाऊन तेथील जनता स्वावलंबी कशी होईल इकडे लक्षकेंद्रीत केले तर तेथील लोक सुखी होतील.

## पाश्चात्यांच्या अनुकरणाचा परिणाम

पाश्चात्यांच्या अर्थशास्त्राच्या अनुकरणाने हे साध्य होणार नाही. त्यांच्या परिस्थितीस अनुसरुन त्यांनी त्यांचे सिद्धांत बनवले आहेत. ते सर्व देशात व सर्व काळी लागू पडणारे नाही. संपत्तीस त्यांनी महत्व दिले आहे. त्यांची केवळ भोगदृष्टी आहे. त्यांचे सारे अर्थशास्त्र हे यंत्रशास्त्र आहे, ते यंत्राचे दास बनले आहेत; जनतेतील विविध स्तरांत त्यामुळे आंतरिक विरोध निर्माण झाला आहे.

भारतातील बहुसंख्य लोक छोटया छोटया खेड्यात वस्ती करुन आहेत. धर्म, संस्कृती, स्वभाव, रितीरिवाज इ. मध्ये अनेक प्रकारची विविधता आहे ही एवढी एकच बाब भारतीय अर्थशास्त्राचा स्वतंत्र रितीने विचार करावयास पाहिजे हे सिद्ध करण्यास पुरेशी आहे. भारतीय अर्थशास्त्राचा विचार ग्राम-हिताचे दृष्टीने करावयास हवा. त्यासाठी शेतीतील उत्पादन व गावातील उद्योगधंदे यात निकटचा संबंध रहावयास हवा. हे करीत असतांना विविध जाती, धर्म व संस्कारांचे लोकात संघर्ष व स्पर्धा उत्पन्न न होण्याची काळजी घ्यावयास हवी व श्रेष्ठ निती-तत्वास अनुसरुन गावातील अगदी शेवटच्या घटकाचीही उन्नती लक्षात घ्यावयास पाहिजे.

## शेती

शेती हा हिंदुस्थानचा प्राणरुप धंदा आहे. अन्नाच्या बाबतीत तरी पूर्ण स्वावलंबन धोक्यात येता उपयोगी नाही. शेतीच्या समृद्धीस बाध येणार नाही, शेतीस नुकसान होणार नाही, अशी करवसुली व तत्संबंधी कायद्याची व्यवस्था असावयास पाहिजे. देशास आवश्यक अन्नधान्य संग्रह देशातल्या देशात करता आला पाहिजे. शेतीच्या समृद्धीसाठी प्रत्येक गावी गायराने असणे आवश्यक आहे. तसेच ऋषी समृद्धी इतकेच वनरक्षणाचे व संवर्धनाचे काम आवश्यक आहे.

शेतीचा व्यवहार १२ महिने चालत नाही त्यासाठी रिकामपणाच्या वेळी शेतकऱ्यास उद्योगधंदा पुरविण्याची व्यवस्था व्हावयास पाहिजे सहसा ते शेतीस पुरक असावे व शेतीच्या व्यवसायात अडचण उत्पन्न करणारे नसावे शक्यतोवर घरातल्या घरात करता येणारा व विशेष तांत्रीक ज्ञानाची गरज पडणारा नसावा आणि त्या धंद्यातुन उत्पन्न होणारा माल सहजासहजी खपणारा असावा. पशुपालन व चरखा हे २ उद्योग या कसोटीस उतरणारे आहेत तथापि पशु-पालनास थोड्याफार शेतीची व द्रव्याची आवश्यकता असते. यामुळे शेतीवर केवळ मजुरी करणाऱ्यास पशु-पालनाचा धंदा करणे कठीण आहे. यादृष्टीने चरख्यावर सुत काढणे व कापड विणणे हे केवळ मजुरी करण्यास अधिक अनुकूल आहेत. चरख्याच्या ऐवजी स्थानिक परिस्थितीशी अनुसरून दुसरेही धंदे करता येतील. उदा. विटा पाडणे, तेलाचे घाणे चालविणे, समुद्रकाठ असल्यास मीठ तयार करणे, लाकूड, लाख, रबर इतर वनौषधी यांचे संबंधीत उद्योग करता येतील.

## अनारोग्यकारक उद्योग

दारू, ताडी, भांग, गांजा, तंबाखु, शस्त्रास्त्र इ

उद्योग जनतेची निती व नाश करणारे आहेत. यामुळे हे उद्योग टाळले पाहिजेत व समाजाच्या उपयोगी असणारे उद्योगधंदे केले पाहिजेत.

### – ललीत कला –

संगीत, चित्रकला, नृत्य, नाटक इत्यादी कला जनतेचे निर्दोष मनोरंजन करण्यासाठी, ज्ञानप्राप्ती–साठी, भावनांच्या विकासासाठी आवश्यक आहे. मात्र त्यासाठी काही मर्यादा असणे आवश्यक आहे.

गोपालनाचा धंदा धार्मिक दृष्टीनेही महत्वाचा आहे. त्यासाठी गावात चांगले पांजरापोळ व धर्मालय विभाग असावा व गोवधास सर्वस्वी बंदी असावी.

### धर्म

गावात विविध जातीचे व धर्मांचे लोक असणार, आपसात संघर्ष येऊ न देता सर्वधर्म समभावने आपआपल्या धर्मांचे व परंपरांचे पालन उत्तम रितीने केल्यास व सर्वधर्म संमभाव मनात बाळगल्यास कुठेही संघर्ष येण्याचे कारण नाही गावाचा कारभार शक्यतोवर ग्रामस्थांनीच चालवावा. आज भारतात जी लोकशाही आहे त्यात लोकांची भागिदारी केवळ मत देण्यापुरतीच मर्यादित राहिली आहे. जनतेचे मूलभूत अधिकार व स्वातंत्र्य यांच्यावर सुव्यवस्थेच्या नावाखाली अनेक बंधने येत आहे व जनतेची निर्भयता व आत्मविश्वास कमी होत आहे. त्यामुळे जनता शासनाधीन व दयनीय जीवन जगत आहे आजच्या सार्वत्रिक निवडणुका व मतदान यांच्याद्वारा प्रतिनिधी व शासनावरील नियंत्रण फोल ठरले असुन भरमसाठ खर्च, लालूच व पक्षबदल इ. तंत्रामुळे निवडणुकी खऱ्या अर्थाने स्वतंत्र व स्वच्छ राहिल्या नाहीत.

### विकेंद्रीकरण व स्वयंपूर्णता

मोठे उद्योग व केंद्रीत अर्थपद्धतीचा पगडा अर्थव्यवस्थेवर बसला असुन शेतकरी व मजूर तसेच ग्रामीण उद्योग व कारागीर यांची उपेक्षा होत आहे. त्यामुळे बेकारी व परावलंबन वाढले असुन गरीब व श्रीमंत तसेच गावे व शहरे यातील अंतर दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता धोक्यात आली आहे. राजनैतिक दृष्टीने सन १९४७ मधे भारत स्वतंत्र झाला. प्रत्येक नागरिकास आपल्या जीवनाचा सर्वांगिण विकास करण्यास पूर्ण संधी व स्वातंत्र्य मिळणे हा स्वातंत्र्याचा खरा अर्थ आहे परंतु दुर्दैवाने स्वराज्यप्राप्तीनंतर जनतेची विकासाची संधी, स्वातंत्र्य दिवसेंदिवस कमी होत आहे व शासनाची सत्ता सर्वकश बनत आहे. त्यामुळे जीवनाच्या सर्व क्षेत्रात ग्रामीण भागाचे विकेंद्रीकरण व स्वयंपूर्णता हे गांधीजींचे स्वप्न पूण करण्याची जबाबदारी आपणावर आहे.

समग्र ग्रामविकास होण्यासाठी वर उल्लेख केलेली विचारधारा कृतित आल्यास भारताचे कल्याण होईल हे निःसंशय.

जय जगत् ।

## एकदा

खारे एम. के.
S. Y B. Sc.

एकदा एका डॉक्टरला
देवा घरचे बोलावणे आले
मेडीसीन बॉक्स बरोबर घेतली
देवाला विचारले, "काय बिघडले" ?
एकदा एका वकीलाला
देवा घरचे बोलावणे आले
कागद पत्र बरोबर घेतले
देवाला विचारले, "कुणाशी भांडण केले" ?
एकदा एका भटजीला
देवाघरचे बोलावणे आले
पळी, पंचपात्रे, सोवळे घेतले
देवाला विचारले, "काय ठरले" ?
एकदा एका वखार वाल्याला
देवाघरचे बोलावणे आले
गोवऱ्या, लाकूड बरोबर घेतले
देवाला विचारले, "कोण मेले" ?

# कवयित्री बहिणाबाई

कु. अंजली भिरुड
XII Sc.

कवयित्री बहिणाबाई ! बहिणाबाई चौधरी म्हणजे खान्देशचं भूषण ! बहिणाबाईंचे काव्य म्हणजे मराठी काव्यातील अमोल ठेवा ! ! बहिणाबाईंचे काव्य म्हणजे सामान्यातलं असामान्यत्व प्रकट करणारं व्यक्तिमत्व ! 'त्यांनी काव्यातून जीवन रंगविलं आणि जीवनातून काव्य निर्माण केल' असे त्यांच्या काव्याबद्दल म्हणता येईल. जीवनदर्शन हेच त्यांच्या काव्याचे फार मोठे वैशिष्ठ्य होय. कारण जीवनात त्यांनी जे पाहिलं, जे अनुभवल ते त्या इतरांना सांगत असतांनाच काव्यरूपांत प्रगट झालं.

बहिणाबाईचा जन्म एका साध्या शेतकरी कुटुंबात झाला. लौकिकदृष्टचा त्या अशिक्षित होत्या. शाळेत त्या कधी गेल्याच नाहीत. बहिणाबाईंचं म्हणणं अस की– " विठोबाचं आणि रामाचं मंदिर ह्याच माझ्या शाळा आहेत. ' मी धरित्रीच्या आरशात सर्ग पहाते. ' 'माझी माय सरसोती मला सारे काही शिकवते.' पांडुरंगाचं गीताभागवत माझ्यासाठी मातीमध्ये आणि पावसामध्ये सामावलेलं असतं. " ह्या बहिणाबाईंच्या म्हणण्याचा पुरावा म्हणजे त्यांचे काव्य ! आपली रोजची काम करत असतां–नाच त्यांचं काव्य अगदी कस सहज आकार घेतं– सकाळी उठून त्यावेळी दळावं लागत असे. आपले दळण दळीत असतांना त्या म्हणत—

'अरे घरोटा घरोटा
तुझ्यांतून पडे पिठी
तसं तसं माझं गानं
पोटांतून येतं व्होटीं !'

दळल्यानंतर स्वयंपाकासाठी चूल पेटवावी लागे. त्यावेळी साऱ्या घरभर धूर व्हायचा, तेंव्हा त्यांच्या तोंडी शद्व येत—

'पेट पेट धुक्कयेला
किती घेसी माझा जीव
अरे इस्तवाच्या धन्या
कसं आलं तुले हींव !'

भाकरी टाकतांना हाताला चटके बसू लागले म्हणजे संसाराची रहस्ये काव्यरूपाने त्यांच्या मुखावाटे प्रगट होत––

'बरा संसार संसार
जसा तवा चुल्हृयावर
आधी हाताला चटके
तेंव्हा मिळते भाकर'

सहजता आणि गूढता यांचा सुरेख संगम बहिणाबाईच्या काव्यात आढळून येतो. घरोटावर गाणं म्हणतांना काव्य कसं निर्माण होतं हे त्या सांगून जातात. तर चुलीत जाळ करतांना त्या इस्तवाच्या धन्याला हींव आल्याची उपमा देऊन जातात. भाकरी भाजतांना संसार सुखाची प्राप्ती केंव्हा होते हे सहजतेने त्या सांगतात. शेतात भाकरी घेऊन जातांना छापखाना दिसतो आणि छापखान्याकडे पाहून त्यांच्या मनात विचार येतो,—

'मानसापरी मानूस
राहतो रे येडजाना
अरे होतो छापीसनी
कोरा कागद शहाना !'

तर शेतात विहिरीतील मोटांमधून येणारे पाणीही त्यांच्या विचारांना एक वेगळे वळण देते —

'येहेरींत दोन मोटा
दोन्हींमधीं पानी एक
मोट हाकलतो एक
जीव पोसतो कितीक ?'

असे म्हणणाऱ्या कवयित्री बहिणाबाई किती श्रेष्ठ दर्जाच्या कवयित्री होत्या हे सिद्ध होते. अनेकातून एकत्व आणि एकातून अनेकत्व त्या किती सहजतेने सिद्ध करतात हे दिसून येते, आणि त्यासाठी त्यांना काही कल्पना शोधाव्या लागल्या नाहीत, सतत चिंतन करीत बसावं लागल नाही. रोजचाच अनुभव फक्त तो काव्यरुपात अवतरलेला! बहिणाबाईंच्या काव्यात मळणी करणारा 'बैल' आहे, मारोतीचा बापा-लहरी 'वारा' आहे, टाळचा वाजवून भजन करणारी आणि सर्वांसाठी समृद्धी मानणारी पिकही आहेत.

साऱ्या जगाला न गवसलेला परमेश्वर बहिणाबाईंना पाहू शकतात. साध्या शद्बांत अगदी सहजतेने परमेश्वराचं रहस्य सांगण्याइतकी बहिणाबाईची कल्पना समर्थ आहे.

'सदा जगाच्या कारनी
चंदनापरी घसला
अरे सोतामधी त्याले
देव दिसला दिसला
डोये मीटले मीटले । सोताले बी इसरला
अरे अंधांऱ्यात त्याले
देव दिसला दिसला'

एका साध्या अशिक्षित स्त्रीने परमेश्वराला ओळखले आणि साऱ्या जगाला तो कोठे व कसा गवसेल हे सांगितले. बहिणाबाईंच्या काव्यातून उदात्त आणि व्यापक भावनाही अगदी साध्या शद्बात व्यक्त झालेल्या दिसतात. जीवन कसं जगायला हवं हे त्या जीवाला सांगतांना म्हणतात—

'जग जग माझ्या जीवा
असं जगनं तोलाचं
उच्च गगनासारकं!
धरत्रीच्या रे मोलाचं!

बहिणाबाईंच्या निरीक्षणशक्तीची आणि मार्मिकतेची तर स्तुती करावी तेवढी थोडीच आहे बोरी-बाभळीला असलेले काटे आपण सदोदित पाहतो. ते बोचतात म्हणून त्यांच्या वाटेला जाण्यास घाबरतो. पण बहिणाबाई मात्र त्या काटयांची संगती लावतात. त्या म्हणतात—

'पाहीसनी रे लोकाचे
यवहार खोटे नाटे
तव्हां बोरी बाभयीच्या
आले आंगावर कांटे'

बहिणाबाईंच्या कल्पनेची झेप असामान्य आहे. कुलूप आणि किल्लीबद्दलची त्यांची कल्पनाही किती मार्मिक आहे बघा

'जव्हा इमान सचोटी । पापामधीं रे बुडाले
तव्हा याच मानसान । किल्लच्या कुलूप घडले
किल्लच्या राहूचला ठिकाणी । जव्हा तिजोऱ्या फोडल्या
तव्हा याच मानसान । वेडचा लोखंडी घडल्या.'

किल्लच्या कुलपांचा शोध कसा लागला हे सांगणाऱ्या बहिणाबाई किती डोळसपणाने जीवन जगत होत्या हे आपणास दिसून येते त्याचबरोबर त्यांच्या कल्पकतेची झेपही आपणास चकीत करते.

नेहमीच्या साध्या प्रसंगातूनही तत्वज्ञान सांगून जाणाऱ्या बहिणाबाई सर्व चराचरांशी समरस होतांना दिसतात. त्यांना पानांचे मनोगत समजते—

'टाया वाजवती पानं
दंग देवाच्या भजनी
जसे करती करोन्या
होऊ देरे आबादानी'—

वाऱ्याने हलणारी पाने टाळचा वाजवून देवाचे भजन करीत आहेत आणि सर्वत्र आबादानी होऊ दे असे म्हणत आहेत हे ओळखणाऱ्या बहिणाबाई जगाच्या दुःखाशी समरस होतांना दिसतात. त्या भुकेलेल्यांची हाक ऐकतात आणि कळवळतात. लगेच काव्य बाहेर पडतं—

'उभे शेतामधी पिकं
ऊन वारा खात खात
तरसती 'कव्हां जाऊं
देवा, भुकेल्या पोटांत'

गरीबांच्या वाढत्या अडचणीचे वर्णन करतांना त्या म्हणतात—

'नही दियामधी तेल । कशी अंधारली रात
तेल मिये एकदाच । नेली उंदरानं वात
वातं केली चिंधूकाची । तेल दियात पडलं
सापडेना आकपेटी । घोडं आठी बी अडलं
सापडली आकपेटी । आग्यावेतायाची लेक
आली आली हातकाडी । लाडानवसाची एक
शिलगावली रे काडी । ज्योत पेटली पेटली
आंधाऱ्याले व्याहीसनी गेली इझीसनी गेली'

बहिणाबाईंची प्रतिभाशक्ती सर्वस्पर्शी आहे हे ह्यातून सिद्ध होते. त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाचा प्रत्यय आपणास पुढील व्यक्तिचित्रातूनही येतो. निरनिराळ्या माणसांच्या स्वभावाच्या छटा ही त्यांनी बरोबर हेरलेल्या आहेत. किती साध्या शद्बात ही व्यक्तिचित्रं आणि शद्बचित्रं उतरलेला दिसतात! त्यांच्या कल्पनाशक्तीला विनोदाचीही साथ लाभलेली आहे—

एका वरवर गोड बोलून मतलब साधून घेणाऱ्या स्त्रीचे वर्णन करतांना त्या म्हणतात—

'हिच्या तोंडांत साकर
आन पोटांत निंबोनी
मोठी आली पट्टवनी
साऱ्या मुल्ख्याची लभानी!'

घरात एखादीच व्यक्ती काळी दिसली की त्या उपमा देतात—

'घरांमधी सर्वे गोरे । तूंच कशी कायीघूस
उज्या जवारींत आलं । जसं कान्हीचं कनूस!

बहिणाईंच्या काव्यात काही नवीन म्हणींचाही समावेश आहे; आणि त्या म्हणीही मोठ्या वैचित्र्यपूर्ण व तितक्याच अर्थपूर्ण आहेत.

'दया नही मया नही डोयाले पानी
गोगलगायच्या दुधाचं काढाव लोनी—'
'जन्मदात्या मायजागी सावतर माया आल्या
जशा खिरनीच्या झाडाले निंबोया आल्या'

बहिणाबाईंच्या काव्याचे सामर्थ्य हे असे आहे. त्यात जीवनाचं तत्वज्ञान आहे. त्यात कल्पनेची झेप आहे. त्यात स्वाभाविकपणा आहे. बहिणाबाईचे काव्य म्हणजे प्रतिभाशक्तिचा एक चमत्कारच आहे. अचाट कल्पनासामर्थ्य, अलौकिक प्रतिभाशक्ति, उदात्त व व्यापक अनुभूती यांनी हे काव्य नटलेलं आहे. कृत्रिमतेचा स्पर्शही या काव्याला झालेला नाही, तत्वज्ञानाचा आवेश नाही. कवित्वाचा अभिमान नाही. जे आहे ते साधे सरळ पण परिणामकारी आहे. बहिणाबाईंचे काव्य म्हणजे जीवनातील मोहक उद्यान. बहिणाबाईंची कविता म्हणजे खेडूतांची व शेतकऱ्यांची गीताच आहे. जीवन जगण्याचा मंत्र देणारी चिरसंजीवनीच आहे.

श्री. अत्रे यांनी तर बहिणाबाईंच्या काव्याला 'बावनकशी सोनें' अशा शद्बात गौरविले आहे. श्री. अत्रे यांचे म्हणणे किती सार्थ आणि संयुक्तिक आहे!

# मुखवटा

कु. संगीता येवले
XI (Sc.)

माझ्यासारखंच
सुखाचा बुरखा पांघरुन
हे सारं जग जगतं का?
दुःखात होरपडतांना
सुखाचा मुखवटा घेऊन - - - -
जगाला आणि स्वतःलाही फसवीत
पण प्रत्येक जण विसरतो
सारं जगच तसं आहे
मुखवटा धारण करणारं - - - -
आतून दुःखी, वर हसणारं - - - -
समजतय् मला, खुप चीड येते
पण - - - पण मी काहीच करू शकत नाही
कारण - - - कारण मी देखिल
या जगातीलच आहे - - - -
मुखवटचात राहणारी
आणखी एक
नुसता नुसता मुखवटा!

# शिल्पा

कु. ललिता नंदनवार
T. Y. B. A.

शिल्पा ड्रेसिंग टेबल समोर आपले काळेभोर, रेशमी लांब केस मोकळे सोडून उभी होती. केसात कंगवा अडकविला आणि अचानक रितेशचे शद्ब तिला आठवले. तिच्या हृदयाची तार छेडली गेली. तिच अंग रोमांचित झालं. ती स्वतःच स्वतःचे सौंदर्य निरखू लागली ... .. काळाभोर दाट कुंतलातून पुनवेच्या चंद्राप्रमाणे दिसणारा सुंदर चेहरा, टपोरे, किंचित तपकिरी छटा असलेले बोलके डोळे, छोटे पण चाफेकळी सारखे धारदार नाक, जास्वंदी कोमल ओठ, रेखीव नाजुक जिवणी, कमनीय बांधा, केतकी वर्ण, तिला कालचा प्रसंग आठवला. काल सायंकाळी रितेशने शिल्पाचे पोर्ट्रेट पूर्ण केले. आणि रितेशने शिल्पाला आवेगाने जवळ ओढले तिची हनुवटी किंचित वर उचलून तिच्या डोळयात पाहात तो म्हणाला, खरंच शिल्पा तू एक सजीव शिल्प आहेस माझी प्रेरणा आहेस ........ आणि शिल्पाचे गाल अस्ताला जाणाऱ्या सूर्यासारखे आरक्त झाले.

रितेश शिल्पाच्या जीवनात आल्यापासून शिल्पाला नवे चैतन्य मिळाले. शिल्पाला तिच्या पपांबद्दल काहीच नक्की माहित नव्हते. आई, कनकलक्ष्मी, एका नाटक कंपनीत काम करेत होती. शिल्पाच्या मैत्रिणी कनकलक्ष्मीच्या अनैतिक संबंधाबद्दल आणि चारित्र्याबद्दल नेहमी कुजबुजत असायच्या ते शिल्पाला असह्य व्हायचं. पप्पांच्या आठवणीने तिचं मन गहिवरुन यायचं!

अशातच रितेशशी तिची ओळख झाली. रितेश मध्यमवर्गीय, आकर्षक व्यक्तिमत्वाचा नि आपल्याच धुंदीत असणारा तरुण चित्रकार होता. लहान भावंड, विधवा आई यांचा भार त्याच्यावरच होता. पण तो पेन्टींग करायचा ते केवळ एक उदरनिर्वाहाचे साधन म्हणून नव्हे. त्याचं प्रत्येक चित्र सजीव असायचं एक रसिकाच्या दृष्टीकोनातून ते काढलेले असायचे. रितेश चित्र काढायला लागला की कॅनव्हास, कलर ब्रश यांच्याशिवाय सर्व जग जणू विसरुन जायचा आणि तासन्तास शिल्पा मुग्ध होऊन चित्राकडे आणि रितेशकडे बघत रहायची.

शिल्पाच्या जीवनाची कळी आताशा उमलू लागली. होता. तिला आपलं दुःख मोकळे करायला एक आधार मिळाला. आपल्याला कोणीतरी आपलं म्हणतयं आपल्यावर प्रेम करतयं या भावनेनंच ती मोहरली. पूर्वीची अबोल उदास, शिल्पा हल्ली काम करतांना, बागेत झाडांना पाणी घालतांना गुणगुणायला लागली. तिच्या पदन्यासात लय आली. मूळचंच सौदर्य आणखीनच खुलू लागले.

शिल्पा आरश्यात पाहून स्वतःशीच खुदकन हसली. गुलाबी गालावर गोड खळी उमटून गेली पण... ... दुसऱ्याच क्षणी आईच्या हाकेमुळे शिल्पा दचकली. स्वप्नातील जगातून जागी होत खादयावरुन ढळलेली ओढणी सावरीतच 'आले आई !' म्हणत आत गेली. कनकलक्ष्मी संतापाने फुलून गेलेली होती. आवाज चढलेला होता. कनकलक्ष्मी शिल्पाला म्हणाली- शिल्पा ही पत्र कुणाची? शिल्पा घाबरली व न समजल्याप्रमाणे खाली मान घालून म्हणाली,

'कोणती पत्रे आई?'

हे बघ कार्टे असं वेड पांघरु नकोस-'. हा रितेश कोण ?'

शिल्पा घाबरलेली होती तरीही सर्व बळ एकवटून ती म्हणाली, 'आई रितेशवर माझं प्रेम आहे. आणि लवकरच आम्ही विवाहबद्ध होणार आहोत. मी तुला सर्व सांगणारच होते' आणि मग तिने रितेशची सर्व माहीती दिली.

कनकलक्ष्मीचा राग आणखीनच वाढला. ती म्हणाली 'कार्टे तुझी ही हिम्मत' आणि जर तुला प्रेमबिम करायचे होतेच तर हाच एक दीडदमडं ना पेन्टर सापडला काय ? हे लग्न होणार नाही.!' शिल्पाला आईच्या पैश बद्दलच्या मोहाची किळस आली. रितेशच्या अपमानाने ओठ थरथरायला लागले, एक हलकसा हुंदका बाहेर आला. कनकलक्ष्मीने शिल्पाचे घराबाहेर जाणे बंद केले.

एक दिवस अचानक कनकलक्ष्मीने सांगितले की आमची नाटक कंपनी आज संध्याकाळी बाहेरगावी जाणार आहे. तुलाही मी बरोबर नेणार आहे. शिल्पाने जाण्यास नकार दिला, खूप प्रतिकार केला, पण कनकलक्ष्मीने व आईचा मित्र बाबूराव, नाट्य कंपनीचे दिग्दर्शक यांच्यापुढे तो दुबळा ठरला. बाबूराव घरी आले की शिल्पाच्या डोक्याची नस तडतडू लागे. त्यांची नजर तिला नकोशी व्हायची आणि मग आई व ते गप्पा मारत असतांना काहीतरी कारण सांगून ती बाहेर निघून जायची.

कनकलक्ष्मी आता शिल्पाला आपल्याबरोबर पार्टीला नेवू लागली. पण शिल्पाला पार्टीचे भडक वातावरण असह्य व्हायचे. एक दिवस कनकलक्ष्मीने घरीच तिच्या मित्रांना पार्टी दिली. पार्टी संपली आणि शिल्पाची नजर उरलेल्या ड्रिंक्सवर गेली. तिने नकळत व्हिस्की ग्लासात ओतली आणि ग्लास ओठाला लावला. एक कडवट घोट घसा करपीत गळ्याखाली उतरला. तिचा चेहरा कडवट झाला. व दुसऱ्याच क्षणी तिने एका वेगळ्याच आवेगाने ग्लास रिता केला. आणि ....आणि काही वेळाने तिची पावलं डगमगू लागली. ती स्वतःला विसरली. दुःखाला विसरली.

आता शिल्पाने पार्ट्यांना जाणे बंद केले. मद्याच्या नशेत ती दिवस-रात्र बुडून राहू लागली. कधी-कधी नशेतच रितेशचा फोटो हातात घेऊन असंबद्ध बोलायची. भावनावेग अनावर होऊन त्याची चुंबने घ्यायची.

अशातच एक दुर्दैवी दिवस उजाडला, आकाश संपूर्ण आभ्राच्छादित होते. संध्याकाळी मुसळधार पाऊस कोसळू लागला. वारा सुसाट वाहत होता. अंधार दाटू लागला. पाऊस वाढतच होता, रात्रही वाढतच होती. तेवढ्यात फोनची बेल वाजली. शिल्पाने रिसीव्हर उचलला पलिकडून कनकलक्ष्मी सांगत होती, 'शिल्पा' मी आज रात्री येणार नाही.' पण शिल्पाला त्याचे काहीच वाटले नाही. तिने रिसीव्हर खाली ठेवला.

व्हिस्कीची बाटली घेऊन तशीच शिल्पाने ओठाशी लावली. रितेशचा फोटो हातात घेऊन त्याच्याकडे एकटक पाहू लागली आणि तिच्या टपोऱ्या डोळ्यातून आसवांची मालिका गालावर घरंगळू लागली. तिचं भान हरपलं. पाऊस आता थांबला होता. वाराही शांत झाला होता. मात्र हवेत गारवा जाणवत होता. आणि अचानक दार आत लोटले गेले. बाबूराव चोर पावलांनी आत शिरले. हात मागे करूनच दाराची कडी अडकविली गेली. दिवा मालविला गेला. आणि थोड्यांच वेळात एक आर्त किंकाळी वातावरणात विरुन गेली. आणि नंतर सारं शांत ....,.. शांत झालं ! -

# पश्चिमेकडे

शशि वाघ
F. Y. B. A.

गुलाल उधळलेल्या
लाल रंगाकडे
उगवत्या सूर्याची
मी, वाट पहात होतो

पण............

मला काय ठाऊक
मी,
पूर्वेकडे नाही
पश्चिमेकडे पहात होतो.

# संस्कार

कु. रत्ना जोशी
S. Y. B. Com.

हळदीच्या पावलानं, नव्या नवलाईनं एखादी सून घरी येते तिचे कोडकौतुक चालू असते. तिचा मूळ-चाच सुन्दर चेहरा आनंदी होतो. चेहऱ्यावर हास्य असते. सुख म्हणतात ते हेच का? असे प्रश्न तिला पडलेले असतात. आपल्या सुखाला आपलीच नजर तर लागणार नाही ना? म्हणून ती दचकते. हे नव्या नवलाईचे दिवस संपतात. नि तिच्यातले दोष दिसू लागतात. तुझ्या आई-वडिलांनी हेच संस्कार केलेत का? म्हणून तिच्या आई-वडिलांचा उद्धार होतो. बिच्चारी ती हिरमुसली होते. संस्कार,! संस्कार! म्हणजे काय? हा प्रश्न तिला पडतो.

'पॉश' फर्निचर असलेल्या मोठ्या घरात डॅडी, मम्मी राहातात. त्यांच्या लाडक्या लेकासाठी सुरेख, नाजूक पत्नी आणली जाते. दागिन्यात तिला गुदमरुन टाकले जाते. मोठी पार्टी दिली जाते. त्या पार्टीत बस्स् तिचे थोडेसे चुकते. तिच्याही आई वडिलांचा उद्धार होतो तो तिला काहीच मॅनर्स शिकवले नाहीत या नावाखाली. बिच्चारी ती हिरमुसली होते.

चंद्रमौळीत राहणारी माणसं देखील आपल्या सखा-राम साठी घरणीसाठी बायको आणतात त्यांच्या परीने तेही तिचं कोडकौतुक करतात. पण एक दोन दिवसांतच "ह्यो बया हिले तो काम बी येत नाही. आई-बा मेल्ये कि जिते हाय कोनास ठाव, त्यास्नी काही रीतभात हाय कि नाय." बिच्चारी ती हिर-मुसली होते. तिच्या मनात येते रीतभात कशाले म्हणत्यात बरं?

पण संस्कार म्हणजे काय? सकाळी-संध्याकाळी हात पाय धुवून देवाला नमस्कार करणे किंवा मोठ्यांची कामे ऐकणे म्हणजे का? संस्कार असा आपणाला प्रश्न पडतो. पार्टीतले किंवा जेवणाचे नियम म्हण-जेच संस्कार का? किंवा जास्त काम करणे म्हणजेच रीतभात का? शेवटी संस्कार म्हणजे आहे तरी काय? हा प्रश्न डोक्यात भुंग्यांप्रमाणे घोंगावू लागतो. पण नेमके संस्कार कशाला म्हणायचे, त्याची काही निश्चित व्याख्या नाही. जो तो आपल्या मनाप्रमाणे त्याचा अर्थ लावीत असतो.

समाजाने घालून दिलेले ठराविक नियम पाळायचे. त्यात चूक होता कामा नये. त्यात थोडीशी जरी चूक झाली की त्यांना लगेच संस्कार नाहीत असे म्हटले जाते. शेवटी भावनांपेक्षा संस्कारांनाच महत्व दिले जाते. चूक कोणी मुद्दाम करीत नाही आणि झाली तर लगेच त्याला हिणवले जाते. तेव्हा त्यास काहीच वाटत नसेल का?

अगदी लहानपणापासून दारु वाईट असते, ती पिऊ नये असे कितीदा आपण ऐकतो पण तरीही त्या मोहजाळात आपण अडकत जातो. एकच प्याला म्हणून जेव्हा आपण हातात ग्लास घेतो तेव्हा अचा-नक आपल्या डोळ्यासमोर आईचा किंवा आपल्यावर संस्कार करणाऱ्या व्यक्तीचा चेहरा दिसू लागतो आणि आपल्या हातून ग्लास निसटतो. तेव्हा लहान-पणी शिकवलेल्या गोष्टींनाच संस्कार म्हणावं.

कोणी काहीही म्हणो पण लहानपणी शिकवलेल्या गोष्टीच मनात कायम कोरल्या जातात. पुढे आपण नकळतच त्या गोष्टींचे अनुकरण करु लागतो. त्या शिकविलेल्या चांगल्या गोष्टींनाच संस्कार म्हणू लागतो. प्रत्येक घरातील, समाजातील संस्कार वेगळे असतात. त्यामुळे त्यावरुन आपल्याला बोलणी ऐकावी लागली तर नवल नाही.

हे संस्कार, - - - - चांगल्या गोष्टी- - पिढ्यान्-पिढ्या चालत येत असतात. त्यांची जोपासना करावी लागते. कारण चांगल्या गोष्टींमुळे माणसं सद्गुणी होतात. समाजात त्यांची प्रतिष्ठा वाढते. कीर्ती मिळते. त्यामुळेच प्रत्येक समाजातील माण-सांना संस्कार असावेत असे वाटते. हे संस्कार आई-वडिलांच्या कडून दिले जातात. व्यक्तीच्या संस्कारा-मुळेच देशाची संस्कृती निश्चित कशी आहे हे ठरते. प्रत्येक देशाची संस्कृती ही त्या देशातील व्यक्तींच्याच संस्कारावरच अवलंबून असते असे आपणास म्हणता येईल. संस्कार चिरंतन असतात. त्यांचे नाव बदलले तरीही.

# परिवर्तन

किरण गंगापूरकर
T. Y. B. A.

विरहाच्या दाट धुक्यात
आसवांचे पडले दंव
उष:कालच्या थंडाव्याने
शहारले माझे अंग
मधुर उषेची अथांग निद्रा
पावली आता भंग
कोण होतो काय झालो
मुकला जीवनाचा चाफा
व्यथा त्याच्या व्यक्त करी
उच्छ्वासाच्या ऊन वाफा

**पैसा!**

'पैशाविषयी परमेश्वराच मत काय आहे हे पहायच असेल तर तो ज्यांना पैसा देतो त्यांचेकडेच पहा'.

**श्रद्धा!**

श्रद्धा हा असा पक्षी आहे की, पहाटेच्या गर्द काळोखात त्याला प्रकाशाची चाहूल लागून तो गाऊ लागतो. —कविवर्य टागोर

# लौकिक

देवदत्त कासखेडीकर
F. Y. B.Com.

लौकिकासाठी जगणाऱ्यांनो
रीतीच्या आणि परंपरेच्या
पाऊलखुणांना विसरुन जा.
कारण सारं जग
निधर्मीपणाचा आभास
निर्माण करु पाहातंय!
कारण—
आम्ही आम्हालाच समजावतोय
निधर्मीय म्हणून
नुसतंच —
पाण्यातलं प्रतिबिंब!
स्थिरावल्यावर स्पष्ट होतय
कल्पना आहे चांगली,
पौर्णिमेच्या चंद्रासारखी
स्वच्छ!
पण! असंतोषाची
एक लहर, आंदोलन
या पाण्याला
प्रक्षुब्ध करुन टाकते
आणि हे प्रतिबिंब
शोधू पहाणाऱ्यांनाच
सापडतच नाही!
तुम्ही आमची प्रेरणा
हाच तुम्हाला
साक्षात्कार......

# 'निर्माल्य कळीचे'!

कु. शर्मिला जगताप
XII ( Arts )

सतत चिवचिवणारी श्रद्धा आज अगदीच स्तब्ध होती. तिचे मध्येच स्वतःशी हसणे, कोणी हाक मारली की बावरुन जाणे, हे सर्व गीतेच्या नजरेतून सुटले नव्हते.

ती या बदललेल्या श्रद्धाचा विचार करीत होती. तोच मागून हळूच हाक आली, " ए गितू. " अरेच्चा ! हा तर श्रद्धेचा आवाज ! नेहमी जिन्यावरुन येताना धाड्धाड् पावले वाजवत येणारी, जोरात ' गीत्या SS' म्हणून ओरडणारी हीच का ती श्रद्धा ? गीतेने कितीदा सांगून पाहिले पण आरडा-ओरड, धसमुसळेपणा अगदी श्रद्धाच्या पांचवीलाच पुजला होता. पण आज......... नेहमीसारखी धाड्धाड् पावले न वाजवता, " एवढेच नव्हे तर स्वतःची चाहूलही न देता हळूच श्रद्धा मागे येऊन उभी राहिली व हळूवारपणे हाक मारली ' ए गीतू ' " काय ग, आज तुला झालय तरी काय? तिच्याकडे पहाताच गीताला दुसरा आश्चर्याचा धक्का बसला. आज श्रद्धेचा नेहमीसारखा बेलबॉटम-टॉप नव्हता. तर अंगभर साडी व खांद्यावरुन पदर नेहमी भुरभुरणारे सोनेरी केस आज एका क्लिपमधे बंदिस्त केले होते. गीताने तिला एकदम हालवले, " अग श्रद्धा, हा काय प्रकार आहे ! आज एका माणसाचा नूर अगदीच वेगळा दिसतोय बाई! काय ग, काय विचार आहे?"

"अग, मला बोलू तरी देशील की आधीच, आल्या आल्याच प्रश्नांची बरसात करतेस. " श्रद्धा तिच्या शेजारी बसली. पण हे बसणेही नेहमीसारखे नव्हते. तर ती अगदी पदर सावरुन बसली. तिच्यातील हा बारिकसारिक बदल गीता बघत होती.

'श्रद्धा, मला आधी सांग की हा रुपपालट कां एकदम?" ही श्रद्धा तर मी स्वप्नातही बघितली नव्हती.

" गीता............"

" अग, बोल लवकर, अडखळतेस काय? माय गॉड! लाजतेस की चक्क.!!"

" ए गीता, चेष्टा नको " खूप बोलायचे आहे तुझ्याशी, पण धीरच होत नाही तूला सांगायला. "

" अग ए श्रद्धे, मला सांगायला आणि, धीर होत नाही ? ए, लवकर बोल,

" किनई गीता........."

" ए श्रद्धा काय ग, एखादा माझा अडकलेला दिसतोय गळाला."

" तसच म्हण हव तर पण गळाला मीच अडकले आहे ग. "

" हं! अच्छा, माझा तर्क बरोबर होता म्हणजे. पण...... काय गं ? कोण आहे तो भाग्यवान! की ज्याच्या गळाला ही आमची खुबसुरत मैत्रिण लागली. हं! म्हणजे तो नक्कीच 'चिकना' असणार, होय नां ?

" अग हो हो. मला काही बोलू देतेस की नाही.?

' हे बघ, तुला तो...... काल आपण माझ्या होस्टेलच्या गेट मधे उभ्या राहून गप्पा मारत असतांना आपल्या जवळुन जोरात स्कुटर नेणारा ज्याच्यावर तू कॉमेन्ट पण केली होतीस. तो श्रेयस' ग! आता तरी आठवला कां ?

" हां, हाSSS हे बघ निळी झाक आहे त्याच्या डोळयात जरा. कॉलेजच्या होस्टेलवर रहातो नां?

" होSSS तोच तो."

" काय ग कुठवर आलय हे प्रकरण ? आणि कधी सुरु झालय "

" अग आतापर्यंत फक्त ' नजरोंसे बाते ' होती. पण काल कॉलेजहून परतलो नां ? आणि होस्टेल समोर उभ्या राहुन बोलत असतांना तो समोरुन गेला आणि तू गेल्यावर मी आत जायला वळणार तोच स्वारी हजर. " म्हणतो कसा ?" मला तुमच्याशी बोलायचे आहे काही संध्याकाळी भेटाल? मी इतकी घाबरले गित्या, पण मग...... जमलं हे सगळं. आता डिटेल नंतर सांगेन हं! नाही तर पिरियडला चाट बसेल

" चल लवकर कॉलेजला. "

" ए! आता कॉलेजला जायला कां इतकी उत्सूक झाली. केव्हा पासून पिरियडबद्दल आस्था वाटायला लागली? अं ?"

" चेष्टा नकोस हं करु. समजेल काही दिवसांनी कोणाच्या प्रेमात पडल्यावर........ "

पाहता पाहता दोन, तिन महिने उलटले. गीता ती हळूवार फुलणारी कळी निखरत होती. कल्पनेच्या विश्वात रंगणारी श्रद्धा तिला मनापासून आवडत होती.

" ए श्रद्धा, कधी ओळख करुन देणार आहे ' तुझ्या त्या श्रेयस्ची.' " अग जरा धीर तर धरशील ! त्याच्या आईवडिलांना भेटायला त्याच्या गावाला गेलाय् तो. पंधरा दिवस झाले. मला तर तो कधी येईल असे झाले आहे.

श्रद्धाची रुम पार्टनर गावाला गेली, म्हणून तिने गीताला रात्री रहायला बोलावले होते. आणि रात्री पिक्चरचा प्रोग्राम पण ठरला होता पण गीताला काही कारणाने जायला जमले नाही. आता श्रद्धेचा राग नाकावर आला असणार. म्हणून आज सकाळीच ती श्रद्धेच्या रुमवर गेली. होस्टेलवर नुकतीच तुरळक ये जा चालू होती बाईसाहेब अजुन साखर झोपेतच दिसतात म्हणून तिने दार वाजवले ते उघडेच होते. बघते तो काय कालचे सायंदैनिक चुरगाळलेले अस्ताव्यस्त पडले होते. जिज्ञासेनेच तिने ते दैनिक नीट केले. त्याचबरोबर लक्ष श्रेयसच्या फोटोवर खिळले. एस टी च्या भिषण अपघाताची बातमी होती. मृत्यूमुखी पडलेल्याच्या यादीत 'श्रेयस देशमुख'.........

' ओ गॉड !' तिने दचकून श्रद्धाकडे पाहिले. अस्ताव्यस्त झोपलेली, सोनेरी केस पार विस्कटलेले, गीतेने तिला उठवण्याचा प्रयत्न केला. 'बापरे, हात इतका थंडगार ? "

' श्रद्धा अग.........' तोच तिचे लक्ष झोपेच्या गोळयांच्या रिकाम्या बाटलीकडे गेले तेव्हा तिच्या हातून श्रद्धेचा निर्जीव हात धाडकन् खाली पडला.

आत्महत्या !!!

ती कळी उमलत होती. पण नियतीला तिचे सुख पाहावले नाही. पूर्ण उमलायच्या आतच ती कोमेजली नव्हे तर ती देठापासून उखडून टाकली गेली

# स्वप्नात पाहिले

अशोक माहेश्वरी
S. Y. B. Sc.

स्वप्नात पाहिले ते
चित्रात रेखिले ते
ती एक रात्र होती
मूर्तीस प्रियतमाच्या
मोदे तंरगलो मी
त्या धुंदल्या क्षणांना
विरहाचिया विषाचे
स्वप्नांतल्या व्यथांना
स्वप्नांत पाहिले ते
चित्रात रेखिले ते

चित्रात रेखितो मी
गीतात गुंफितो मी
ज्योत्स्नेन रंगलेली
कुंजात पाहतो मी।
ल्हरीवरी सुखाच्या
छंदात बांधितो मी
मी घोट घोट घेतो
अमृतात रेखितो मी
चित्रात रेखितो मी
गीतात गुंफितो मी।

# असे खेळ–असे जीवन

अशोक डी. पाटील
Jr. M. A.

आजच्या गतीमान जीवनात स्पर्धेला फारच महत्व प्राप्त झालेले आहे. आजच्या या युगात खेळांचे महत्वही खूपच वाढले आहे. आज कुठल्याही प्रकारच्या नोकरीसाठी खेळांची आवड अथवा खेळात भाग घेतल्याबद्दलच्या सर्टिफिकेटस्‌ची मागणी केली जाते. यामुळे हळूहळू खेळांची आवड वाढते आहे.

तसे तर जीवन आणि खेळ यांच्याबाबतीत अंतर्मुख होऊन विचार केल्यास असे वाटते की ज्याप्रमाणे विशिष्ट आकाराच्या मैदानात, विशिष्ट वेळेच्या आत आपला विजय प्रस्थापित करण्याचे कौशल्य आपल्याला फुटबॉल, हॉकी, बास्केटबॉल, खो–खो, ॲथलेटिक्स, इ. खेळांमध्ये दिसून येते, त्याप्रमाणेच आपणसुद्धा जीवनात अशाच प्रकारे खेळ खेळत आपले जीवन जगत असतो, विशिष्ट अडथळ्यांवर मात करुन आपले ध्येय आपण गाठत असतो.

हे खेळ खेळत असतांना मनातले हेवेदावे, मत्सर, राग हे सर्व मैदानाच्या बाहेर सोडून खेळले तरच यात एक प्रकारचा असीम आनंद व रस मिळतो. ज्याचा विजय झाला त्याच्या विजयात समरस होऊन पुन्हा सामना करण्यासाठी तयार व्हायला हवं. जीवनात अपयशी ठरल्यानंतर निराश न होता ते अपयश आनंदाने स्वीकारुन पुढच्या विजयाची तयारी करायला हवी. असाच संदेश हे खेळ देतात.

आयुष्य हे चैतन्यमय हवं! स्फूर्तिदायी आणि हे चैतन्य, ही स्फूर्ती आपल्याला विविध खेळांमध्ये अनुभवण्यास मिळते. विशेषत: 'ॲथलेटिक्स' म्हणजे वैयक्तिक स्पर्धांमध्ये हा अनुभव आपल्याला जास्त येतो. या वैयक्तिक स्पर्धांच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे खेळाडूंना तर सुखहोतेच पण प्रेक्षकांनादेखील त्यात उतरण्याचा मोह अनावर होतो.

मृत्यूला हसत सामोरे जाण्याचे शरीरबल व मानसिक धैर्य ज्यातून निर्माण होते अशा खेळांचा 'ॲथलेटिक्स गेम्स'मध्ये समावेश झालेला आढळतो. 'ॲथलेटिक्स' या शद्बाला डिक्शनरीत जो अर्थ आहे त्या पेक्षा जीवन विकासाला पोषक अशा अनेक गोष्टी डिक्शनरीकारांच्या नजरा चुकवून हे खेळ करुन जातात.

माणसाचे जीवन घोड्याप्रमाणे गतिमान असावे असेच जणू या धावण्याच्या शर्यती सांगून जातात. आपल्या जीवनात अडथळे पावलोपावली असतात. परन्तु या अडथळ्यांची फिकीर न करता, तमा न बाळगता शरीर, मन, बुद्धी यांना अडथळ्यांवर मात करण्याचे सामर्थ्य हे खेळ देतात.

केवळ पावणे दोन मिनिटात ८०० मीटर, साडे तीन मिनिटात १५०० मीटर व केवळ १४ मिनिटात ५००० मीटर्स अंतर धावून जाण्याच्या या शर्यतींमुळे गती व कार्यक्षमता यांच्या वाढीस वाव दिला जातो. बांबूच्या सहाय्याने १६/१७ फूट उंच उडी घ्यावयाची. हा एक असाच नाविन्यपूर्ण खेळ आहे. आपण उंच गेल्यावर ते सहाय्य सोडून असहाय्य स्थितीत मनाचा समतोल बिघडू न देता त्यात यशस्वी होण्याचा संस्कार घडविणारा "बांबू उडी" हा खेळ आहे. मनाने उंचच उंच झेप घेणाऱ्या साहित्यिकांना ही जणू हे क्रिडापटू असे दाखवून देतात की; जड शरीरानेही किती उंच जाता येऊ शकते.

वेळप्रसंगी शत्रूशी हातघाई करण्याचा प्रसंग आलाच तर त्याचेवर एखादी जड वस्तू फेकण्यासाठी व स्वतःचा बचाव करण्यासाठी उपयुक्त असे गोळाफेक, थाळीफेक, हॅमर थ्रो, भालाफेक या सारखे खेळ या स्पर्धेत असतात. यात थोडाफार फरक करुन स्त्रिया व मुलींसाठीही या खेळांची योजना असते.

जीवनविकास, ज्यातून अविच्छिन्नपणे होत राहील असे हे खेळ आहेत. जीवनात कधीच न कराव्या लागणाऱ्या अनावश्यक गोष्टींपैकी कोणतीही गोष्ट या खेळात घेण्याचे टाळले आहे. जीवन विकासाशी सुसंवादी असणारे असे हे खेळ आहेत. उभ्या आयुष्यभर ज्यांची सोबत आपणास लाभावी त्या खेळांची उपासना, सराव, आराधना करावीच लागते. ह्या खेळांबाबत लिहावे तेवढे थोडेच व पहावे तेवढे कमीच, असे यांचे स्वरुप आहे. ही कौशल्ये पहात असतांना त्यामागे प्रत्येक सेकंदाला होणाऱ्या स्नायुंच्या हजारो स्पंदनांची निर्मिती आपणास दिसणार नाही. पण त्या सर्वांचा समन्वयात्मक अविष्कार आपल्या मनाला आनंदावकाशात नेल्याशिवाय राहात नाही.

जीवनाशी संबंधित असलेल्या या खेळांना आज पुष्कळच प्रतिसाद मिळतो आहे. 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे' ही कवी कुलगुरु केशवसुतांची उक्ती सर्वांना सार्थ करायची असेल तर केवळ युवकांनीच नव्हे तर प्रौढांनीही विविध खेळ हिरीरीने खेळले पाहिजेत. जीवन रडत व रखडत जगण्याची गोष्ट नसून आव्हानांना व समस्यांना हसत खेळत तोंड देण्याचा तोही एक मनोरंजक खेळच आहे, असे हे खेळ शिकवितात.

卐

## पहाट

बाळकृष्ण माधव नेवे
D. O. M.

पहाट– प्रेमाने कवेत उचलून घेणारी
गहनगार अंधारात खालोखाल नेणारी
अवस्थ डोळे उन-पावसाळी
प्रचंड उत्साह पण लोळत राहाणारी !!
पहाट– धुक्यात मनमुक्त विवस्त्र न्हाणारी
सारंगीचे सुंदर सुर, अंगभर थरारणारी
जात्यावर गाणारी तुळशीदल वाहणारी
शेताच्या बांधावर वाट वेडी पाहणारी !
पहाट– कधी लोकलच्या डब्यातच उगवून मावळणारी
पेंगुळलेले डोळे... वर्कशॉपमधून परतणारी
शाळेतील चिमणी पाखरं चिवचिवत उडणारी
अशी पहाट ..... ... नंतरच्या पहाटेला
उद्याच्या सुख-दुःखांचे अर्घ्यदान देणारी !

## आठव !

कु. अरुणा वाणी
M. A. (Sr.)

आज माझी लोचने ही
का अशी पाणावली
लुप्त आठव आज ही
कां मन्मनी डोकावली...

आटले जे अश्रु माझे
आज मग कां दास्ती
पापण्या या आसवांना
कां न आता रोधिती.

ओघळू दे अश्रु माझे
माझिया गालावरी
सुकवितो वारा जयांना
परि दुःख माझ्या अंतरी !

# प्रा. गोवर्धन पारीख
# एक थोर शिक्षण तज्ज्ञ

**विद्यानंद द. व्यास**
XI (D)

प्रा. गोवर्धन पारीख यांचे गांव पुण्याजवळील जुन्नर हे होय. त्या ठिकाणी प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेज–मध्ये झाले. तेथूनच त्यांच्या जीवनाचा उत्कर्षकाल सुरु झाला. फर्ग्युसन कॉलेजमधून एम. ए. ची पदवी संपादन करुन मुंबईतील माटुंग्याच्या रामनारायण रूईया कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी सूत्रे हातात घेतली. त्या कारकिर्दीत अनेक विचारवंतांचा सहवास त्यांना लाभत गेला. स्वातंत्र्य-पूर्व काळात मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांकडे आकर्षित झालेल्या द्वा. भ. कर्णिक, तर्कतीर्थ लक्ष्मण-शास्त्री जोशी, अच्युतराव पटवर्धन, यशवंतराव चव्हाण, वगैरे रॉयवादी मंडळीतील एक विचारवंत म्हणून प्रा. गोवर्धन पारीख ओळखले जाऊ लागले. पुढे त्यांची मुंबई विद्यापीठात रेक्टरपदी निवड झाली. आज मुंबईत उभ्या असलेल्या कालीना विद्यापीठ नगरी हे त्यांनी घेतलेल्या अविश्रांत श्रमाचे स्मारकच म्हटले जाईल. एक विचारवंत व उत्कृष्ट वादविवाद पटू म्हणून त्यांचा लौकीक होता. मुंबई विद्यापीठातून अकाली निवृत्त झाल्यानंतर केंद्र सरकारने त्यांची बँक ऑफ इंडियाच्या डायरेक्टर बोर्डावर नेमणूक केली. टाईम्स ऑफ इंडियासारख्या वृत्तपत्र क्षेत्रात, नावाजलेल्या कंपन्यांनीसुद्धा त्यांचे सहकार्य घेतले होते.

महाराष्ट्र टाईम्सवर त्यांचा फार जीव होता. त्यावेळचे महाराष्ट्र टाईम्सचे संपादक गोविंद तळवलकर यांनी लिहीलेल्या त्यांच्या मरणोत्तर अग्रलेखात बौद्धिक वादविवादाचा बादशहा गेला म्हणून खंत व्यक्त केली आहे.

मुंबई मराठी साहित्य क्षेत्राशी त्यांचा निकटचा संबंध होता. महाराष्ट्र व मुंबईतील अनेक शैक्षणिक संस्थांना त्यांचे बहुमोल सहकार्य, मार्गदर्शन शेवट–पर्यन्त मिळत होते. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, न्यायमूर्ती रानडे, गोपाळकृष्ण गोखले, आगरकर अशा महाराष्ट्रातील थोर व्यक्तींवर आणि त्यांनी केलेले कार्य या विषयावर महाराष्ट्रभर त्यांची व्याख्याने गाजत होती

पुण्यात झालेल्या एका सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून त्या वेळचे केंद्रीय अर्थमंत्री यशवंत–रावजी चव्हाण उपस्थित होते सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ वि म. दांडेकर यांनी आपल्या भाषणाच्या ओघात केंद्रीय अर्थशास्त्राबाबत अप्रत्यक्षपणे यशवंतरावांवर मिस्कील टीका केली होती परिसंवादाला अनेक तज्ञ उपस्थित होते. "दांडेकरांचा फोकस चुकला आहे" असे ठाम मत मांडून प्रा पारीख यांनी वरील टीकेची जाहीर दखल महाराष्ट्र टाईम्समधून घेतली होती. इतकेच नव्हे तर विविध अर्थशास्त्रीय तज्ज्ञांच्या त्या भाषणाच्या चिकीत्सेबाबत अभिप्राय व्यक्त करणारी छोटी पुस्तिकाही त्यांनी प्रकाशित केली होती. त्यांचे काही मुद्दे दांडेकरांनी खिलाडू वृत्तीने मान्यही केले होते. अनेक जागतिक शिक्षण परिसंवादांच्या निमि–त्ताने त्यांनी साऱ्या जगाचा दौरा केला होता अमे–रिकेतील ऑक्सफर्ड विद्यापीठाने आपली पी. एच.डी ची पदवी मोठ्या गौरवाने त्यांना दिली होती. त्या वेळी मुंबईत झालेल्या समारंभात राज्यपाल पी व्ही. चेरिअन आणि अनेक शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते ब्रुसेल्सच्या शिक्षण संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. म्हणून त्यांना वारंवार ब्रुसेल्सच्या दौऱ्यावर जावे लागत असे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे तर ते श्रद्धास्थानच होते. त्यांच्या दाराशी आलेला कुठलाही विद्यार्थी योग्य मार्गदर्शन न मिळता परत गेला असे कधी घडलेच नाही. अस्पृश्य समाजातील एका गरीब विद्यार्थ्याला सर्वतोपरी मदत करुन नावारुपाला त्यांनी आणले. हे त्यांच्या निकटवर्तियांना ठाऊक आहे. नासिकच्या बॉईज टाऊन या विद्यालयात झालेल्या युवक बिरादरीच्या शिबीरात ते एक प्रमुख वक्ते होते. त्या वेळी अध्यक्षस्थानी त्या वेळचे महा-राष्ट्राचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी हे होते. त्या समयी ज्योत आपल्या हस्ते प्रज्वजीत केल्यानंतर प्रा. पारीख यांनी केलेल्या आपल्या दोन तासाच्या भाष-णात शिबीरार्थींना बहुमोल मार्गदर्शन लाभले. मधुकरराव चौधरींच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला होता. असा हा थोर शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, उत्तर आयुष्यात विश्वकोषाचे संपादन करीत होता. आपल्या जीवनात कधीही राजकारणात न पडता समाजाला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या विचारवंतां–पैकी एक म्हणून त्यांची गणना केली जात होती. त्यांनी पुण्याच्या आर्यभूषण प्रेसचे रुपांतर महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयात केले. त्या कामी त्यांना गोविंद तळवलकर, वसंतदादा पाटील व इतरांचे सहकार्य लाभत होते. त्या माध्यमातून काहीतरी घडविण्याचा त्यांचा विचार होता. पण त्यांचे स्वप्न अपुरे राहीले. ६ डिसेंबर १९७७ रोजी माटुंग्यातील आपल्या निवासस्थानी त्यांना हृदय विकाराचा जोर–दार झटका आला. डॉ. तुळपुळे, डॉ. रणदिवे यांनी त्यांना वाचविण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली पण त्यात त्यांना अपयश आले व दुर्दैवाने एक शिक्षणतज्ज्ञ हरपला. उत्तर आयुष्यात त्यांना भारतातील लोक–शाहीबद्दल खंत वाटत होती. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, समाजसेविका, मुंबईतील स्त्री हितकरणी संस्थेच्या अध्यक्षा, डॉ. इंदुमती पारीख ह्या त्यांचे अपुरे राहिलेले कार्य पुढे पूर्ण करीत आहे मरणोत्तर त्यांचे कायमस्वरुपी स्मारक म्हणून ५ लाख रुपये जमवून ट्रस्ट करावा, गरीब व हुषार विद्यार्थ्यांना त्या योगे मदत मिळावी असा त्यांच्या मित्रमंडळीचा संकल्प आहे. ह्या मागे यशवंतराव चव्हाणांची प्रेरणा आहे. सहा महिन्यापूर्वी त्यांच्या जीवन ग्रंथाचे प्रका–शन डॉ राम जोशी यांच्या हस्ते मुंबईत झाले. दि. २४ नोव्हेंबर १९८० रोजी महाराष्ट्रातील महावि–द्यालयीन विद्यार्थ्यांची ' प्रा. गोवर्धन पारीख वक्तृत्व स्पर्धा" मुंबईच्या रुईया कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आली होती.

"शैक्षणिक आसमंतातील एक तारा मावळला, एक बुद्धीसम्राट हरपला, तरीही त्यांची प्रेरणा आम्हाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करीत राहील, विस्तारत राहील."

प्रा. पारीख यांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने ही आदरांजली.

★

## दु:ख

**कृष्णदास वाणी**
T. Y. B. A.

दु:ख विसरायचे म्हटले
की
सुखच विसरले जाते
नि
वेदना सुरु होतात
दु:खाच्या
मनाला होरपळणाऱ्या
अन्
जीवनच उध्वस्त करु
पहाणाऱ्या

# अस्मान झेप

चारुदत्त मधुकर जोशी
T. Y. B. Com.

संध्याकाळची वेळ, राजेश शांतपणे विचार करीत आरामखुर्चीत विसावलेला. तेवढ्यात विमानाची घरघर त्याच्या कानावर आल्याने तो भांबावतो, त्याचे मन सैरभैर होते. नि तो असंबद्ध बडबडू लागतो 'आज तुझा वाढदिवस ना? तुला आज काय प्रेझेंट देऊ? इंटिमेट सेंट की सुरेख साडी! थोड्याच दिवसात आपण– – – –'

तेवढ्यात स्वप्नाची रील तुटते. विमान निघून गेल्यामुळे आवाज बंद होतो व राजेश भानावर येतो– – सुजाता एअर हॉस्टेस होती, तिला इतरांपेक्षा काही वेगळं करुन दाखवायचं होतं एखाद्या अप्सरेला लाजवेल असे सुजाताचे सौंदर्य होते. सुजाताचं घरचं वातावरण साधं होतं. सुजाता एअर हॉस्टेस होण्याला आई–वडिलांनी खूप विरोध केला. परंतु सुजाताच्या हट्टापुढे वडील काही बोलू शकले नाही. सुजातास बॉन्डवर सही करतांना वडिलांनी बजावले. विचार करुन सही कर म्हणजे झालं!

सुजाताचे कॉलिज शिक्षण वडिलांनी कसेतरी पूर्ण केले होते. त्या दोघांना सुजाता काय तेवढा एकच आधार होती. ते सुजाताला म्हणाले होते आम्ही पिकली पानं केव्हा गळून पडू, सांगता येत नाही, आमच्या डोळ्यादेखत तुझ्या गळ्यात मंगळसूत्र पडून आम्हास समाधानाने डोळे मिटू दे.

सुजाता! नावाप्रमाणे दिसण्यास सुन्दर होती, चाफेकळीसारखे नाक, निळसर डोळे, हसतांना ओठांतून मोत्याच्या सरी पडल्याचा भास व्हावयाचा, तसेच मृदु स्वभावाची व मनमिळावू होती. पहिल्यापासूनच हुशार होती. कॉलिजमध्ये असतांना सुजाताचा इंग्रजी हा आवडता विषय होता.कॉलेजमध्ये सुजाता 'ब्यूटी-क्वीन' म्हणून प्रसिद्ध होती कॉलेजमध्ये आल्यावर सर्वांची नजर तिच्याकडे धाव घेत असे परंतु तिचा नेत्रकटाक्ष फक्त राजेशला शोधत असे.

हो! राजेश पटवर्धन पण काही कमी देखणा नव्हता. रुबाबदार आणि भेदक नजरेचा होता. त्याची मैत्री होण्यास फारसा उशीर लागला नाही. मैत्रीनंतर एकमेकांच्या प्रेमात केव्हा पडलो, दोघांची मनं एकमेकांत केव्हा गुन्तली हे देखील त्यांच्या लक्षात आले नाही.

राजेश बँकेत चांगल्या हुद्यावर होता. सुजातावर प्रेमाची बरसात करत असतांना त्याच्या बाहुपाशात सुजाता प्रीतीच्या सुगंधात धुन्द होवून जात असे. आजपर्यन्त राजेशसाठी तिने इंपोर्टेड घड्याळ, शर्ट-पिसेस् आणले होते. एअर हॉस्टेस असल्यामुळे अनेक देशात मोठ्या शहरात तिच्या सफरी व्हायच्या.

चौपाटीवर वाळूमध्ये बसून विमान प्रवासातील गंमती ती राजेशला सांगत होती. न्यूयॉर्कला गेले तेव्हा अमेरिकन जोडपे काय बोलत होते, सिंगापूरला जातांना विमानात कोणते लोक होते, याबद्दलची माहिती ती त्याला देत होती. त्या दिवशी सुजाताची मुंबई ते सिंगापूर अशी ड्यूटी होती. सकाळी आठ वाजता आपला मेक-अप् करुन ती एअरपोर्टवर गेली. दुसऱ्या दिवशी सुजाताचा बर्थ-डे होता. सिंगापूरहून आदल्या दिवशी सुजाताने एक सुरेख केक आणला होता. बर्थ-डे ला लेफ्टनंटस् सबलेफ्टनंटस्, मेजर्स वगैरे अधिकाऱ्यांना आमंत्रण देण्यात आले होते. त्या समारंभाचे आमंत्रण ती राजेशला देणार होती.

राजेश आपल्या प्रियतमेची वाटच बघत होता. त्याला पांढरी पॅंट व त्यावर गुलाबाचे फूल असलेला शर्ट अधिकच खुलून दिसत होता. तेवढ्यात सुजाता आली व त्याच्याशी बोलतांना राजेशच्या केसांमध्ये नाजूक बोटे फिरवीत म्हणाली, " राजा! उद्या माझी मुंबई–बंगलोर अशी सफर आहे. मी काय नवीन आणू तुझ्यासाठी!" लाटांचा खळखळाट येत होता. उंच उडणाऱ्या लाटांकडे बघत राजेश म्हणाला, " काही आणू नकोस, फक्त तूच परत ये, वाट पहात आहे!"

काही महिन्यातच सुजाताचा एअर हॉस्टेसचा बॉन्ड संपणार होता. दुसऱ्या दिवशी सुजाता लवकर उठली. नित्याप्रमाणे मेक-अप् केले. अमेरिकन साडी नेसली मलेशियाहून आणलेला लाल खड्यांचा सेट तिचे सौंदर्य वाढवीत होता. सुजाता आनंदात बुडून गेली होती. विमान नऊ वाजून सात मिनिटांनी Take off घेणार होते. जाता जाता सुजाता आईला म्हणाली, " मी दोन वाजेपर्यन्त येते, हॉल नीट सजवून ठेव. मी आल्यावर केकची सजावट करीन " असे म्हणत सुजाताने धावतच टॅक्सी गाठली व एअरपोर्टवर गेली. आज सुजाताची मुंबई ते बंगलोर अशी सफर होती. विमान तळावर घोषणा झाली, " Your attention please. Indian Airlines flight is taking off at 9-7 o'clock from domestic cordon area. The flight is from Bombay to Banglore. All the passengers are requested to take up their seats.

विमानाने उड्डाण केले. विमानात सर्व प्रकारचे लोक होते. प्रत्येकाशी बोलतांना स्मितहास्य करीत सुजाता म्हणत होती. 'What can I do for you' कोणाला सरबत, कोणाला कोल्ड्रींक वगैरे आनंदाने देत होती. परंतु मनुष्य प्राण्याला पुढच्या क्षणाला होणाऱ्या गोष्टींची माहिती नसते हेच खरे!

राजेशने सहज ११ वाजता रेडीओचे बटन फिरवले, "आकाशवाणी मुंबई प्रादेशिक बातम्या प्रसारित करीत आहोत. आज इंडियन एअरलाईन्सच्या ॲरिव्हल ४७९२–एच या विमानास अपघात झाला असून त्यात सर्वच्या सर्वजण ठार झाले आहेत. त्यात ५ विमानदलातील अधिकारी, ३ एअर होस्टेस् आणि अनेक परदेशी नागरिकांचा समावेश आहे. हे विमान ९ वाजून ७ मिनिटांनी मुंबई सोडून बंगलोरकडे जात होते. मुंबईबाहेर गेल्यावर थोड्याच वेळात विमानाच्या मागच्या भागाने पेट घेतला. अपघाताचे कारण अद्याप समजू शकले नाही. राष्ट्रपतींनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे– – – – –"

राजेशने पट्कन रेडिओ बंद केला. त्याला आपण काय ऐकत आहोत हेच कळेनासे झाले. घेरी आली. कसेतरी पलंगावर पडत त्याने दोन्ही हातांनी आपले डोके गच्च दाबून ठेवले. सुजाताच्या सहवासातील अनेक सुखद क्षणांची गर्दी त्याच्या मनात उसळली. सुजाता राजेशच्या जीवनात आली आणि निघून गेली. राजेश एकटाच राहिला! केवळ एकटा!!

## चिरायु–होवो !

कैलास सार्वेकर
M. A. (Sem II)

सकाळची सोनेरी किरणंही
न पाहिलेला पक्षी
दुपारचं उन्ह अंगावर घेऊन
त्याच्या पक्षिणीला म्हणाला,
' रात्री तुझ्या उबेत विसावेल
तो भाग्यवान अनामिक
चिरायु होवो !

# "आरसा-एक वरदान!"

कु. सुचित्रा गुळवे
XII (Com.)

" सखा जीवाचा हा माझा,
आणि तसाचि सगळयांचा
सर्व रुपांचा मज वारसा
नसे कोणी माझ्या सरसा "

हं, तर सांगा बर, माझ्या ह्या उखाण्याच उत्तर. असा हा माझा जीवलग सखा कोण? अहो हा तर आरसा !

वरदान म्हटलं की मला तर कठोर तपश्चर्या नि प्रतवैकल्य करण.ऱ्या ऋषीमुनींचीच आठवण येते आणि प्रसन्न होऊन त्यांना वर देणाऱ्या त्या परमेश्वराची. तर, वर म्हणजे श्रेष्ठ आणि वरदान म्हणजे श्रेष्ठदान. हे वरदान कधी परमेश्वर आपण होऊन माणसास देतो तर कधी माणूस ते मिळवतोही. आपल्या कष्टांच्या नि बुद्धीच्या जोरावर. माझे प्रवचनकार आजोबा नेहमी म्हणत की, हे शरीर म्हणज परमेश्वराने माणसास दिलेली फार मोठी देणगी आहे. म्हणून- वगैरे वगैरे. आणि खरेच हा निसर्ग, हे आकाश नि धरती नि हे चंद्रसूर्य मानवी जीवनासाठीच परमेश्वराने दिलेल्या देणग्या नव्हेत काय? आणि त्याच पाण्याचा, विविध तऱ्हेने उपयोग करुन वीज निर्मिती, शेतीची कला नि शास्त्रज्ञांनी लावलेले विविध शोध ही माणसाने स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर मिळवलेली वरदानेच आहेत. आरसाही असेच एक वरदान आहे.

बराच शोध करुन व पुस्तके चाळूनही आरसा नेमक्या कोणत्या शास्त्रज्ञाने व केव्हा तयार केला, हे मात्र मला अजूनही समजू शकले नाही. पण चंद्राचा हट्ट करणारा राम, आरशात त्याला चंद्र दाखविणारी कौसल्या माता आपल्या सगळ्यांनाच माहित आहे. म्हणजंच आरसा ही अती प्राचीन व पुरातन वस्तु आहेत, असा हा आरसा का बरं तयार केला गेला असेल ?–

नीटनेटके राहणे, स्वतः सुंदर दिसणे, या मानवाच्या मूलभूत प्रवृती आहेत. त्यातूनच आपण स्वतः कसे दिसतो, आपल्याला जास्तीत जास्त चांगले कसे दिसता येईल, ह्या विचारातून आरश्याचा जन्म झाला असावा. अहो, आरसा नसेल नां, तेव्हा सुद्धा माणूस संथ पाण्यात आपले प्रतिबिंब पहातच होता की.

आरसा आपण जसे असू, तसे आपले प्रतिबिंब आपल्याला दाखवतो. आजच्या काळात प्रत्येक जण अगदी आठवणीने बाहेर जाण्या अगोदर या आरशात डोकावतो. सगळे काही ठिक असल्याचा ग्रीन सिग्नल त्याने दिला की मगच बाहेर पडतो ! आपल्या व्यवस्थितपणाची, नीटनेटकेपणाची, स्वच्छतेची ग्वाही देणारा हा आरसा एक वरदान नाही का ? नाहीतर, दुसऱ्याने सांगितल्याशिवाय आपल्याला आपला गचाळपणा, गबाळेपणा अस्वच्छता याची जाणीवच झाली नसती व दुसरा तरी आपल्याला स्पष्ट कसे हो सांगणार की तुमची पावडर दिसते किंवा तुमच्या तोंडाला पिवळा रंग लागला आहे. आपल्याकडे पाहून सगळे हसले मात्र असते आणि सगळे का हसताहेत हे न कळून एकतर आपणही हसू लागलो असतो,! नाहीतर आपली केविलवाणी स्थिती होऊन काय करावे हे न आपल्याला सुचले नसते- तेव्हा या गोंधळातून आरसा आपली सुटका करतो या फॅशनच्या युगात विविध फॅशन्स निर्माण करणारा हा आरसाच आहे. कारण केसांचा कोंबडा छान दिसतो की मुलीचे बॅाब करुन फुलवलेले केस छान दिसतात, बेलबॅाटम पेक्षा आपण मॅक्सीत जास्त मोहक दिसतो किंवा नाही हे आपल्याला आरसाच सांगतो नां? केसांचे वळण, कुंकुवाचे विविध आकार नि मेक्-अपच्या विविध तऱ्हा कुणाला नेमक्या कशा दिसतात हे प्रथम आरसा सांगतो नि विविध तऱ्हेच्या फॅशन्स जन्माला येतात.

अहो! आजकाल हा आरसा कुठे नसतो ? जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी असणाऱ्या देवाप्रमाणे तरी घरी, दारी, भिंतीवर, कपाटावर, दुकानांत, पानपट्टीवर, बाथरुममध्ये, पर्समध्ये, विद्यार्थ्यांच्यां दप्तरांत, पावडरच्या डब्यात, श्रृंगार पेटीत अगदी नको तिथेसुद्धा हा असतो. आपल्या घरातही कपाटावरचा आरसा आपल्याला अशाच सोबत करतो आपण अगदी एकटे घरात असलो, तरी हा आरसा एकटेपणा मुळीच जाणवू देत नाही सारखे इकडून तिकडे फिरतांना आपलेच प्रतिबिंब त्यात पडते नि कुणीतरी सोबत आल्यासारखे वाटते गाड्यांमध्ये ड्रायव्हर समोर नेहमीच आरसा लावलेला असतो. त्यामुळे कितीतरी अपघात टळतात.

जत्रेवर कधी कधी 'आरशांच्या गंमती' असा एक कार्यक्रम असतो एका मंडपात निरनिराळे हसरे आरसे लावलेले असतात. एका आरशात आपण खूप जाड दिसतो तर एकात आपला चेहरा खूप लांबोळका दिसतो. तर एकात खूप रुंदट ! अहो हे आपलेच का प्रतिबिंब म्हणून शंका येते नि त्या विचित्र तऱ्हा पाहून हसून हसून पोट दुखू लागते!

हाच आरसा आपल्याला बरेच काही शिकवतो. आरशाला थोडीशीही घाण लागली तर त्यात प्रतिबिंब स्वच्छ दिसत नाही तो नेहमी निर्मळ, स्वच्छ असतो. त्याच्यासारखे आपणही स्वच्छ रहायला शिकले पाहिजे. आपले मन निर्मळ बनविले पाहिजे मनाला मळवणारे मोह, मत्सर, द्वेष टाकून मन कसं स्वच्छ नि निर्मळ बनवा असेच जणू हा आरसा सांगतो.

माझ्या लहानपणी मला गोष्टी वाचण्याचे फार वेड होते त्या गोष्टीतील प्रत्येक चेटकिणीकडे किंवा दुष्ट राणीकडे असा जादूचा आरसा असे की त्यात तिला वाटेल ती व्यक्ती व वाटेल तेथले दिसे! त्यामुळे कितीतरी वाईट गोष्टी घडत. तेव्हा मला या आरश्याचा अस्सा राग येई की सगळे आरसे तोडून फोडून नाहीसे करावेत.!

आता तोच आरसा माझा जिवलग सखा बनलाय्! त्यादिवशी ताईला पहायला पाहुणे येणार होते, तर तब्बल चार तास ती आरश्यापुढे बसली होती. शेवटी मीच म्हटलं, 'बाईसाहेब, तुम्हाला नाही, तरी त्या आरशलाच कळ लागेल! तेव्हा म्हटलं उठा !!'

नेहमीच माझ्या मनीची गुजं मी आरशाला सांगू लागते. कधीकधीतर दुःखातसुद्धा मी आरशात पाहून रडते. अगदी मैत्रिणी सारखा दिलासा देतो तो मला अशा रीतीने आबालवृद्धांना अनेक तऱ्हेने उपयुक्त ठरणारा आरसा हे वरदानच नव्हे काय?

---

**प्रतिष्ठा !**

'माणसाची प्रतिष्ठा ही त्याच्या मनात अंतःकरणात असते. ती त्याच्या डोक्यात म्हणजे बुद्धीत नसते.' —म. गांधी

**दैव !**

"दैवावर सर्व सोपवू नका, तसेच पुरुषार्थही गमवू नका, दैव हे चालूच रहाते. आपणांस कशात लक्ष घालता येते, कशात लक्ष देणे आपले कर्तव्य आहे. हे आपण पहावे, मग त्याचे परिणाम काहीही होवोत —म. गांधी

# प्रेम-पत्र

अवधुत पाटील
T. Y. B. A.

सुरेखा पेन आणायला म्हणून सुधाकरच्या अभ्यासाच्या खोलीत गेली आणि तिथला एकंदर अवतार पाहून तिच्या तोंडून शब्द बाहेर पडले, "शी? काय घाण आहे? दादीटला मेला! सांगून सांगून थकले, कपडे नीट आवरुन ठेवावेत, पुस्तके नीट ठेवावीत, पण पालथ्या घागरीवर पाणी! अशी बायको मिळायला हवं की, चांगल्या मिऱ्या वाटेल डोक्यावर, त्या शिवाय सुधारणार नाही भाऊसाहेब," अगदी दुसऱ्याशी बोलावे या स्वरांत तिचे पुटपुटणे चालूच होते. "शी, काय हा गबाळेपणा!" एकेक कपडयाची नीट घडी करीत ती पुटपुटली.

कपडयाच्या घडया नीट लावल्यावर तिची नजर टेबलाकडे गेली. 'अहाहा! काय पण टेबल आहे! वा! भाऊसाहेब बी. ए.चा अभ्यास करीत आहेत यावर कोणाचा विश्वास तरी बसेल कां? काय पण पुस्तके पसरवून ठेवली? जसे काही "पारितोषिक" मिळविणार आहे. का अभ्यासाचे ढोंग करतो कुणांस ठाऊक. अभ्यास सोडून दुसरेच धंदे करीत असेल काही नेम नाही याचा. असा स्वत:शी विचार करीत ती टेबलावरील पुस्तके लावू लागली. वाचनालयांतील नवी पुस्तकें पण आणलेली दिसली.

इतक्यात तिची नजर एका कागदावर गेली. त्यावरील 'प्रिये' हा शब्द पांहताच तिचे कुतुहल जागे झाले तो कागद तिला वाचावासा वाटला. पण लागलीच तिच्या मनांत विचार आला, "दुसऱ्याची खाजगी पत्रे वाचणे चांगले नाही." व त्या पत्राची घडी करुन ठेवण्यासाठी तो कागद तिने उचलला व तिच्या मनाने परत उचल खाल्ली, "पण तो परका थोडाच आहे मला. चांगला मोठा भाऊ आहे माझा. काय बिघडले वाचले तर? तेवढीच चेष्टा करायला मिळेल." असा विचार करीतच तिने तो अर्धवट घड घातलेला कागद उघडला आणि ती वाचू लागली.

प्रिय अलका,
हे माझ्या काश्मिरी गुलाबा, या भ्रमराने किती बरे तुझ्यासाठी झुरावे? चंद्रालाही ज्यामुळे आपले मुख मलीन वाटावे. अशा तुझ्या मुखकमलाने माझी नुसती झोपच नव्हे तर भानहि उडविले आहे. तुझ्या नुसत्या आठवणीने दिलकी धडकन वाढते, आणि तू नजरेस पडल्यावर तर, तुझ्या सौन्दर्याच्या तेजाने माझे हृदय तर वितळून जाणार नाही ना, अशी भिती वाटते.

केवळ तुझाच!

सुधाकर सही करायला विसरला असावा. अक्षर तर सुधाकरचेच होते. सुरेखा तर वाचतां वाचतांच 'अवाक्' झाली. आपले बंधुराज एवढे पराक्रमी असतील असं वांटलं नव्हतं, पण य ही पेक्षा प्रकार येथवर येईपर्यन्त आपल्याला त्याचा थांगपत्ता लागू नये याचेच तिला राहून राहुन आश्चर्य वाटत होते. इतक्यात सुधाकर बाहेरुन दरवाज्यात येऊन केव्हा उभा राहिला हे तिला कळले देखील नाही. रूम आवरलेली पाहिल्यावरच तो म्हणाला, "काय संत बहिणाबाई? काय उद्योग चाललाय? स्वच्छता, स्वच्छता........." इतक्यात त्याची नजर तिच्या हातातल्या कागदाकडे गेली. "काय ग, काय वाचणं चाललयं?" त्याने विचारले.
"अं......कुठे? अं......कुठे काय ......?" सुरेखा चाचरत चाचरत बोलली.
"हे पहा सुरेखे"
"तू सुरेखा म्हण चांगलं."
"ओ हो! आज फार जोर आलाय! नाही म्हणत जा."
"ठीक आहे तर मग, आत्ता बाबांना बोलावून तुझं सगळं गौडबंगाल बाहेर काढीन तेव्हा तुला समजेल"
"जा ना मोठी सांगणारी आली आहे! म्हणे गौडबंगाल सांगेन" तोंड वेडावत तो म्हणाला, "आहेच काय माझं असं?"
"असं कां? अऽऽलऽऽऽकाऽऽ अं......अं"
"अ! कोण अलका?"
"एवढया लवकर विसरलास हं? पुरुष मेले असेच, पण काय रे! ती आमच्या वर्गातीलच अलका ना?"
"अग पण, का......का......काय बोलतेस तरी काय" सुधाकर अजून भ्रमांतच होता.
"आता कशी बोबडी वळली एका माणसाची, तो घाऱ्या डोळयाची, टोकदार नाकाची, भुरी अलका रे?" हत् तिच्या, काय पण पोरगी शोधलीय, नुसत्या रंगावर भुलला आहांत बंधुराज! गुणांच्या नांवाने शून्य अक्षरश: नाही पण इंग्लिशमध्ये फक्त दोन मार्कस् मिळाले आहेत टर्मिनलला तिला. "नांव ठेवायला काहीच जागा न सापडल्यामुळे ती अभ्यासावर घसरली."
सुधाकर आता मात्र भडकला 'आता मात्र फारच वहावलीस हं! काय काय पुरावा आहे ग तुझ्याकडे."
"हा घ्या पुरावा महाराज" असं म्हणत तिने ते पत्र त्याच्या समोर धरले. सुधाकरच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. इकडे सुरेखाची टकळी मात्र चालूच होती. अरे तिला एक सवय आहे, तिला कोणी काही विरोध केला की, तिचं एक वाक्य कायम "आम्ही आमचं काही करुं." काय या वाक्याचा अनुभव आला की नाही? त्या पेक्षा कित्येक जास्त अनुभव...
"सुरेखा" दाराच्या चौकटीतून घोगरा आवाज आला. दोघांच्या माना दाराकडे वळल्या, दारात बाबासाहेब उभे होते.
"मी सगळे बोलणे ऐकतो आहे केव्हाचे. आण तो कागद इकडे."
आता पत्र दिल्याशिवाय गत्यंतर नाही हे सुरेखाला समजून चुकले. आता काय ब्रम्ह घोटाळा होणार याचाच ती विचार करीत होती. सुधाकरची स्थिती तर फारच बिकट होती.
"हे अक्षर तर तुझेच आहे काय रे? कॉलेजात हेच धंदे चालतात काय?"
'अहो पण............"
'कसला पण रे?" बाबासाहेबांचा आवाज वाढू लागला.
"बी. ए झाला म्हणजे काय जग जिंकल्यासारखे वाटते तुला?
"अहो बाबा. पण माझं ऐकून तर घ्याल"
"काही ऐकायचं नाही मला तुझं. स्वत: लग्न ठरवतोय अं?" आमच्यावर काय धाड कोसळली?
"बाबा झालं आहे काय असे भलते सलते बोलायला.
"टाळकं फिरलयं माझं, आता काय कपाळ! तोंड तरी कसं दाखवू नानासाहेबांना? त्यांच्या भारतीसाठी होकार कळवला आहे मी."
आता मात्र सुधाकर भडकला. "पण बाबा शब्द देण्याआधी माझा नव्हता का विचार घ्यायचा?
"प्रश्न माझ्या जीवनाचा आहे."
पेटलेल्या आगीत आणखी च तेल ओतले गेले. "तुझ्या जीवनाचे जणू काही वाटोळंच करायला निघालो आहे मी."
'अहो पण झालं तरी काय?'
उगाच काय डोक्यात राख घालून घेता. आईनी बाहेर येत येत विचारले.
'विचारा आपल्या दिवटया चिरंजीवांना, घ्या ही चिठ्ठी, वाचा! बर झालं! प्रकरण हाताबाहेर जाण्याआधी कळलं म्हणून. नाही तर चक्क माझी अब्रू गेली असती चार-चौघात." हे पहा सुधाकर, तुला भारतीशीच लग्न करावे लागेल.
"मी तिच्याशी लग्न करणार नाही. माझं प्रेम अलकावर आहे. मी तिच्याशीच लग्न करणार"
बाबासाहेबांचा मुलगा सुधाकर तोही इरेस पेटला.
"असं! मी दिलेला शब्द खोटा पाडणार एकूण, वा! वा! छान! चांगल्या प्रकारे छान नाव गाजवाल आमचं, छान अब्रू राखाल आमची. अरे काही लाज लज्जा? सरळ सांगतो आहे भारतीशी लग्न करणार नाही."
"जेव्हा माझं अलकावर प्रेम........."
बाबासाहेब मध्येच वाक्य तोडीत गरजले.
"म्हणजे तिच्या प्रेमासमोर तुला माझ्या अब्रूचीही किंमत नाही, नीट कान उघडे ठेवून ऐक तर मग, तुला भारतीशीच लग्न करावे लागेल."

"मग तुम्ही पण ऐका. मलाहि भारतीशी लग्न करावयाचे नाही. करीन तर अलकाशीच लग्न करीन. आम्ही तशी शपथ घेतली आहे देवासमोर."
वातावरण तापतच गेलं. "ठीक! तर मग आताच्या आता चालता हो माझ्या घरांतून. यापुढे एक मिनिटसुद्धा तुझे काळे तोंड पाहण्याची मला इच्छा नाही. I say get out.

कोठून आपण तो कागद पाहिला असं सुरेखाला वाटलं. सारी चूक आपलीच झाली असे तिला वाटले. आणि इतक्यात गंभीर असलेला सुधाकर एकदम जोरजोराने हसूं लागला. "हाऽऽहाऽऽहाऽऽ अगदी पोट धरुन मोठमोठ्याने. त्याला मानसिक धक्का तर बसला नाही ना? अशी शंका आईला आली. सुरेखा त्याच्या जवळ धावली व त्याला गदगदा हलवीत ती म्हणाली, "सावध हो......सावध हो सुधाकर."

आता मात्र बाबांचे धाबे दणाणले. आपल्या मुलाचे मन एवढे कमकुवत असेल अशी त्यांना कल्पना नव्हती. आपण करायला काय गेलो आणि झाले काय, असे त्यांना वाटू लागले. सुधाकरच्या जवळ जात ते म्हणाले,

"अरे सुधाकर, सावध हो, सावध हो अरे नुसती चेष्टा केली. प्रेमात तू कुठपर्यंन्त उभा राहतोस एवढंच पहायचं होतं मला. म्हणून तर रागवावयाचे नाटक केले. माझी तुझ्या प्रेम-विवाहाला संमति आहे."

पण सुधाकर आणखीनच जोरजोराने हसू लागला. हसता हसताच तो म्हणाला, "कहरच झाला म्हणायचा, बाबा, अहो इथ कशाचा कशाला काही पत्ता नाही आणि लग्नाला काय मान्यता देता! कळस आहे अगदी!"

"म्हणजे? हे पत्र? ही ही काय भानगड आहे? अक्षर तर चक्क तुझंच दिसतय" सुरेखा.
"तेच तर सांगण्याचा प्रयत्न करतो आहे केव्हापासून, पण नाटक वठविण्याच्या नादांत बाबा माझं ऐकायला राजी असतील तर! म्हटलं चला आपणही थोडी धमाल उडवून द्यावी म्हणून मी पण माझ्या प्रेमाच्या उदात्त गप्पा मारल्या.

"अरे पण ही काय भानगड आहे मग? ही अलका कोण? हे पत्र कसलं पाठवतो आहेस तिला?"
"हे पत्र होय? अग, मासिकासाठी एक कथा लिहायला घेतली आहे, "अलका" आहे त्या कथेची नायिका त्या कथेतला एक भाग म्हणून नायकाने तिला लिहिलेले पत्र आहे ते. नायकाचे ॲप्रोप्रिएट नाव शोधत होतो म्हणून खालची जागा मोकळी आहे समजलं.." सुधाकर उत्तरला.
"छान! म्हणजे तू तर माझ्यावरहि कडी केलेस. आहेस खरा बापसे बेटा सवाई" बाबा म्हणाले.
गैरसमजाचे धुके वितळल्यामुळे सुरेखा आणि आईही हसू लागली.

**ऋणमुक्ती !**
जो तुमची सेवा करतो त्याच्या ऋणातून तुम्ही केवळ पैसे मोजून मुक्त होऊ शकत नाही, सेवेचे ऋण जगात फक्त दोनच मार्गांनी फेडता येते. एक प्रेमाने व दुसरे सेवेने.' —जिब्रान

**सत्य !**
सत्य शोधणे ही फारशी अवघड गोष्ट नाही; पण एकदा ते शोधून काढल्यावर त्यापासून पळून न जाणे ही खरी अवघड गोष्ट —विनोबा

**उत्साहाचे स्वामित्व !**
"उत्साहच इंद्रासारखा विजय मिळविणारा आहे उत्साह कधी निराशायुक्त शब्द तोंडातून काढू देत नाही. म्हणून आमच्या अंतःकरणात उत्साहाचे स्वामित्व स्थिर होवो. आम्ही ज्यांच्या अंतःकरणात उत्साहाचा महास्रोत वहात आहे त्या महान पुरषाचें नांव वर्णावे"
—अथर्ववेद ४-३१-५

# 'बळी- कादंबरी'- एक अभ्यास!

सौ. शोभा राणे
Sr. M. A.

विभावरी शिरुरकर यांची 'बळी' कादंबरी म्हणजे मराठी कादंबरी वाङ्मयातील एक सरस प्रादेशिक कादंबरी होय. एका विशिष्ट जमातीच्या जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन घडवून मानवतेला आव्हान देणारी, माणुसकीला साद घालणारी बळी कादंबरी ही एक आगळी, वेगळी कलाकृती होय! वाचकांच्या हृदयाचा ठाव घेणारी, प्रत्येक सहृदय वाचकाला विचारप्रवृत्त करणारी 'बळी' ही कादंबरी साहित्यातील एक अप्रतिम कलाकृती होय!

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश सरकारने वसाहतीचा कायदा करुन चोरी हेच उपजीविकेचे साधन असलेल्या जमातींना निरनिराळ्या ठिकाणी शहरापासून दूर वस्तीला ठेवले होते. अशा वसाहतींवर सरकारी अंमल असे किंवा मिशनऱ्यांकडे त्या वसाहती चालविण्यास दिलेल्या असत विभावरी शिरुरकर क्रिमिनल ट्राइब सेंटिलमेंट मध्ये नोकरीला असतांना अशाच एका मांगगारुडी जमातीच्या लोकांचे जीवन त्यांना अगदी जवळून पहायला मिळाले. त्या जीवनाची भीषणता त्यांच्या हृदयापर्यंत जाऊन भिडली आणि त्यातूनच 'बळी' कादंबरीचा जन्म झाला! त्या जीवनातील भीषण वास्तवता लेखिकेने अत्यंत सहृदयतेने आणि यथार्थतेने 'बळी' कांदबरीत वर्णिलेली आहे.

मैरवस्तीचे लेखिकेने केलेले वर्णन अत्यंत हृदयस्पर्शी आहे. 'पांढऱ्या स्वच्छ जातगंगेच्या प्रवाहाबरोबर असंगल मानवतेचे प्रचंड प्रवाह वाहात होते, काही शहरातल्या शहरात काही पानवडच्या खोऱ्यात पण शहरातील मानवतेनेही धिक्कारलेली, अवमानलेली, नजरेबाहेर टाकलेली, अमंगल मानवता शहरापासून दूर, अगदी दूर, थंडीवाऱ्याबरोबर झगडत, उन्हाने करपत, पावसाने भिजत, जीवनाचे शाप भोगीत पडली होती कोणी मोऱ्या उपसायला, कोणी रस्ते झाडायला, कोणी गिरणीला ....... पोटाचे भलेबुरे मार्ग चोखाळायला संभावीत अशा विशिष्ट तारांच्या कुंपणाआड जीवन जगणाऱ्या, बाहेरच्या जगाच्या उपेक्षेचा विषय झालेल्या, मूर्तिमंत कारुण्याचे, अस्वच्छतेचे, दारिद्र्याचे दर्शन घडविणाऱ्या जीवनाचे सत्य स्वरुप लेखिकेने वाचकांसमोर 'बळी' कांदबरीत रेखाटले आहे'

माणसाप्रमाणे ती वस्ती खोऱ्या बाहेर पडे. कितीक रांगा! कितीक स्त्रिया! कितीक पुरुष नी पोरं! ब्रम्हाने माणसे निर्माण करतांना उरलीसुरली ओंगळमाती चिवडून टाकलेली जणू रस्त्याने जिवंतपणाचे नाटक करुन जात होती. सुंदरता अवकळा घेऊन स्त्रीरुपाने धावत होती. ओजस्विता आणि तेज हतबुद्ध होऊन पुरुषांच्या मातीत लुप्त झाले होते आणि विधात्याच्या मायेचा कर्जबारीपणा चव्हाट्यावर दाखवीत पोरे रानोमाळ हिंडत होती.' मानवतेला आवाहन करणारे हे भयानक सत्य टिपण्यात लेखिकेची लेखणी यशस्वी झाली आहे.

या कांदबरीचा केंद्रबिंदू आहे आबा. हा तरुण गांधी बोर्डिंगातून इंग्रजी सहावीपर्यंत शिक्षण घेऊन आलेला, त्याला तेथे सात्विकतेचे, समानतेचे,

सभ्यतेचे, स्वच्छतेचे, मानवतेचे आणि सत्याचेही धडे मिळालेले असतात त्यामुळे त्याच्या विचाराच्या कक्षा अर्थातच त्याच्या जमातीतील लोकांपेक्षा उंचावलेल्या व्यापक बनलल्या असतात.

खरे पाहता आबा वस्तीत येतो तो मनाशी अनेक स्वप्ने रेखाटीत. आपल्या जमातीतील लोकांना ह्या नरकतुल्य जीवनातून बाहेर काढण्याचे स्वप्न उराशी बाळगून ! पण पहिल्यांदाच त्याच्या ह्या स्वप्नाला तडा जातो तो त्या घाणेरड्या गलिच्छ जागेत, गलिच्छ लक्तरांनी झाकलेली अमंगळ माणसे 'आईबाप बहीण-भाऊ' म्हणून त्याच्यापुढे उभी राहिल्यावर ! 'मूर्तिमंत अस्वच्छता त्याच्यापुढे हजार जिभा परजीत उभी असते.'

त्याने स्वतः बोर्डिंगातील स्वच्छ आणि निर्मळ जीवन अनुभवले असते. म्हणूनच मलिन कपड्यांवर पसरलेलं अमंगळ अन्न, वस्तीतील घरातील अमंगळ माणसे हे सारे बघून त्याच्या मनात विचार येतात, 'आपल्या अंगावरील हे स्वच्छ कपडे फाटले,' आपल्याला ते पुन्हा घेता आले नाहीत म्हणजे आपणही त्यातलेच !'

आईने आणलेल्या उकिरड्यावरील अन्नाचा घास त्याला घेववत नाही. पण मन आतून टोचतच असते. 'वेड्या धूळ, घाण, रोगजंतू तुला नाही, तुम्हांला नाही तुमच्यासारख्यांना नाही. ज्याच भरलेले ताट दूर करण्याइतक, लाथाडण्याइतक नशीब असत त्यांना ही सगळी शास्त्र विचारात घ्यायची असतात,' अशावेळी कोठेतरी पळून जावेसे आबाला वाटू लागते. त्याला मिळालेले शिक्षण त्याची मानसिक अस्वस्थताच वाढण्यास कारण ठरते. शिकून आलेल्या आबाचे कौतुकही अल्पावधीतच संपते.

आबा मोठ्या आशेने रिपनसाहेबांकडे अर्ज घेऊन जातो. पण गांधीबोर्डिंगात तो गेल्यामुळे त्याच्यावर रिपन साहेबांची नाराजी असते ते त्याला झाडू लावायचे काम सुचवितात. नोकरी ऐवजी झाडू-वाल्याचे काम आपल्याला त्यांनी सांगावे, हे पाहून आबाला मनस्वी संताप येतो, आपला व आपल्या मांग गारुडी जमातीचा कटु भविष्यकाळ त्याला दिसू लागतो. शिकल्यावरही झाडूच लावायचा हे समजले-तर कुणाला शिकावेसे वाटणार नाही. हे सत्य त्याला बैचेन करते. वस्तुस्थिती समोर असते. काशिनाथ कैकाडी सुशिक्षित असूनही बेकार असतो. आबाच्या मनांत वैचारिक द्वंद सुरु असते. त्याला शिकवण मिळालेली असते 'प्रामाणिकपणाने वागा. तुमचे कल्याण होईल." पण प्रत्यक्षात मात्र सारेच वेगळे असते. 'पण परिस्थितीशी मात्र ह्या शिकवणुकीचा मेळ बसत नाही. आबाच्या मनावर एकामागून एक आघात होऊ लागतात. त्याची आई एका गोऱ्या सोजिराबरोबर अनैतिकतेने वागत असते. त्याच्याकडून टोपपदरी लुगडे आणि पैसे मिळवीत असते. ह्यावेळी आबाची मनस्थिती काय वर्णावी ! चीड, लाज, संताप यासाऱ्या भावना त्याच्या मनाचा कब्जा घेतात पण याहूनही हे विदारक सत्य म्हणजे त्याच्या बापालाही हे समजते. पतिपत्नींच्या थोड्यावेळाच्या भांडाभांडी-नंतर सार निवळतं. सार तिनं पोटभरण्यासाठी केलेल असत आबाचा बाप अनेक पोरांचा बाप म्हणवून घेत असतो. आबाही तीच भाकरी खात असतो. सारेच परिस्थितीशी अगतिक झालेले ! सारेच परिस्थितीला 'बळी' गेलेले !

मानवी हक्कांची जाणीव ज्याच्या मनात जागृत केली गेली आहे असा आबा हॉटेलात जाऊन चहा पिण्याचा नवा उपक्रम करतो. त्याबद्दल त्याला चांगलांच मार खावा लागतो व ८ दिवसांचा तुरुंगवास नशिबी येतो. आठ दिवसातील एकाकी-पण त्याच्या विचारात वादळ घडवून आणते. त्याचं मन पालटते चोर जातीशी तो समरस होतो. चोरवस्तीचे चित्र त्याच्या समोर उभे रहाते. चोर-वस्तीने जणू आपल्या भोवती कोट रचले होते वर्षानुवर्षापासून अविश्वास, अडाणीपणा, दारिद्र्य, हेकटपणा, निरक्षरता, निराशावाद नावडीचे उद्योग अर्धपोटी रहाणे या सगळ्या गोष्टींमुळे अजूनही, त्यांना चोरी हाच मुक्तीचा मार्ग वाटत होता. आबाला वाटत आपल्यासारखीच ही जर चांगल्या विचारांच्या छायेत वाढली असती तर त्यांचीही मन पालटली असती पण परिस्थिती माणसाला काय बनवीत नाही.? पोट भरले नाहीतर मलाही चोरी करावीशी वाटते ह्याची जाणीव झालेला आबा त्या वस्तीचा हेकटपणा समजू शकतो. ते लोक शिक्षणापासून दूर का पळतात हेही त्याला कळून चुकते. घाणीची घृणा कशी जाते हेही तो स्वतः वरुनच शिकतो.

एक दिवस आबाच्याही मनाचा तोल जातो. तो परस्थितीला, अवहेलनेला बळी पडतो. आबा ज्वारीची कणसे चोरून आणतो पण त्याचवेळी नेमकी राई त्याला भेटते. राई आबाच्या वैफल्यग्रस्त जीवनातील एक प्रामाणिक विश्रांतिस्थान व प्रेरणास्थानही असते ते परस्परांकडे आकर्षिले जात असतात. अगदी दोघानांही नकळत. आपली पहिली चोरी राईने पकडताच आबाचा विचार पालटतो आणि पापाचे प्रायश्चित म्हणून कणस परत करायला निघालेल्या आबाचे पाय मावळणच्या उद्गारांनी जागच्या जागी खिळतात. "तुझ पाप तू धुऊन टाकणार अन् तिकडे तुमा प्वारांची प्वाटं जाळाया तुमची माय नरकात त्वांड बुडवील. तुझी माय काई पापात बुडून न्हाई आली. अन् तुझा बापुस मुकाट्यानं पापाची भाकर खातो. त्येला बी येड नाही लागलं ! धा प्वारं झालीतं तिला. हाड उरलीतं तिची. त्या हाडांना वासना तरी उरलीच काय? मरायची वासना हाय बाकी. तरी बी तुमा प्वारांना पोसाय हाडं टाकिनी कुत्र्याम्होर." त्यादिवशी आबाला आपली आई सापडते तो तिच्या कुशीत तोंड खुपसुन रडू लागतो. पुन्हा आपल्या जातीच्या भल्यासाठी तो प्रयत्न करू लागतो. वस्तीत नवचैतन्य खेळू लागते.

रिपनसाहेब काशिनाथ, हणम्या, बन्या, आबा इ. तरुण मंडळी गांधीटोपी वापरते आणि लालबावट्याच्या संगतीने चोर वस्तीतील शिस्त बिघडवते म्हणून पाठीवर चाबकाचे फटकारे मारविले जातात, चेतावलेल्या तरूण मनांना बारण्यांच्या व्याख्यानाने एकीचे सामर्थ्य कळून येते. बारणे समजून चुकतात की चोर वस्तीसाठी लिहीलेल्या कायद्यांपेक्षा अलिखित कायदेच अधिक कठोर आहेत. रिपनसाहेब घालतील ते कायदे! हे कायदे न पाळणाऱ्या कुटुंबाचे तीन तेरा आणि नऊ बारा होत असत. बारण्यांच्या प्रयत्नांनी या साऱ्या गोष्टी वर्तमानपत्राद्वारे चव्हाट्यावर येतात. चोर वस्तीवरील अन्याय अधिक तीव्र होतो. बारणेंच्या प्रयत्नांनी त्यांना चोर न म्हणता मागासलेले म्हणण्यात येते. आबालाही बारण्यांच्या सांगण्यावरून नोकरी मिळते. पण मध्येच असंतोष घडविणाऱ्या घटना घडून जातात.

रिपनसाहेबांच्या रोषाला इतरांबरोबर आबाचे आईवडिलही बळी पडतात. हिंगणगावच्या धरणावर त्यांना काम मिळते. धरणांवर काम करणाऱ्या लोकांची अवस्था न बघण्याइतकी केविलवाणी असते. दोन-दोन आणे मजुरी तेवढ्यात पोट भरत नाही. तसेच रोगराईला बळी पडत असणारी मुले-बाळे, स्वतःची मरणोमुख असलेली तीन भावंडे हे सर्व पाहून आबाचे दुःखी मन सूडाच्या भावनेने पेटते. तो मॅनेजरचा खून करतो. तो वरिष्ठांच्या अन्यायमूलक वागण्याबद्दल तक्रार करतो, सतरं-ज्याची चोरी न करताही चोरीचे किटाळ आल्याने, फौजदारासाठी दारू गाळणाऱ्या कल्याला पकडण्यात येते. आबा संतापाने पेटून उठतो आणि सर्रास चोर वस्तीतील लोकांप्रमाणे वागू लागतो. पण आबाचे अंतःकरण मोकळे होते ते त्याचे बोर्डिंगा-तील आदर्श असलेले भागवत गुरूजी यांच्याजवळ !

प्रथमदर्शनी 'बळी' ही आबाची शोककथा वाटते. पण खरे पाहता आबा हा एकटाच बळी नाही. शिवाय आपल्या जातभाईंच्या क्रूरतेला बळी पडण्याआधी परिस्थितीला तो कितीदा तरी बळी पडलेला दिसतो. एवढेच नाहीतर अगतिक होऊन आबा स्वतः आपल्यातील पाशवीवृत्तींनाही 'बळी' पडलेला दिसतो. आणि शेवटीतर आपणास असे दिसून येते की आबा हा एकटाच बळी गेलेला नसून त्याची सारी जमातच आर्थिक विषमतेला, सत्ता-धीशांच्या स्वार्थीधोरणाला आणि माणुसकी विसरलेल्या समाजाला बळी पडलेली आहे. आणि सर्वांचे कारण म्हणजे अज्ञान, निरक्षरता आणि रूढिप्रियता ! याचे प्रत्युत्तर आपणास आबाने

भागवत गुरूजीजवळ केलेल्या मनस्तापात येते )

"नादान स्वार्थी अधिकारी दारिद्र्यालाही दडून स्वतःच्या पोळीवर तूप ओढीत असता त्यांना अधिकारावर कां ठेवले? आम्ही चोर ना? कां चोरी करतो? आम्ही अडाणी कां? तुमच्या ताब्यात आमची जीविते असता कां अडाणी ठेवले तुम्ही आम्हाला? वीस वर्षात इतर कारणांनी पाठी सडकल्या, तुरूंग दाखविले, अर्धं पोटी ठेवले त्याऐवजी शिक्षणासाठी तुरूंगात कां नाही पाठविले? वीस-पंचवीस वर्षात फुकट खाऊ अधिकारी लोक पोसले सरकारने! त्याऐवजी एवढा पैसा कठोर आणि प्रामाणिक प्रयत्नांसाठी खर्च होता तर आज चोरवस्ती रयतेसारखी झाली असती. सरकारी प्रचंड कारखाना निवून साऱ्या वस्तीची पोटापाण्याची सोय झाली असती!" हे आबाचे उद्‌गार साऱ्या चोरजातीच्या जीवनावर, अधिकारी वर्गाच्या स्वार्थी धोरणावर प्रकाश टाकणारे आहेत.

भागवतगुरूजींच्या साह्याने आबाचा आणि त्याच्या साथीदारांच्या जीवनाला वेगळे वळण लागते. ते स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतात. चळवळीत ते तुरुंगवास पत्करतात देशाला स्वातंत्र्य मिळते, तीन वर्षे तुरुगांत काढल्यावर आबाची सुटका होते आबा चोरवस्तीकडे आकर्षिला जातो. जातीभेद मिटविला जातो, नव्या झोपड्यांमधून त्याचे जातभाई राहू लागतात मिळालेल्या स्वातंत्र्याने त्यांना आनंद होतो. मात्र त्यांच्या आनंदाच्या कथा मर्यादित असतात. पूर्वीच्या कर्दमाकडे धावतांना त्यांना आता कुणी मज्जाव करणार नसतो. आबाबद्दल साऱ्या वस्तीला आदर वाटत असतो. पण परिस्थितीच बदलते. महागाई वाढत असते. लोक विचार करू लागतात 'हा देवमाणूस आहे. पण ह्याच ऐकून पोट भरत नाही रिकामी आतडी मनात नाही ते विचार आणतात. आबा त्याना सांगू लागतो. 'इतकी शोभा कमावलीत आता काळं फासू नका! त्या शोभेचे धनी तुम्ही आहात! तुम्हीच रस्ते केलेत, पोरं शाळेत पाठवायला लागलात. मन आणि देह पवित्र केले आता पुन्हा तो चिखल नको. ज्या देवाने हे केले तो पुन्हा आपला पाठीराखा होईल.' लोकांना ते पटे; ते गप्प बसत. पण परिस्थिती बदलत असते. काळाबाजार, बेकारी वाढते, काम मिळू शकत नाही. पण आबाचे सहकारी पुन्हा पहिल्या उद्योगांत लागतात. आबा त्यांना आपल्या मार्गातील धोंड वाटते ते आबाचा खून करून त्याचा आपल्या मार्गातील काटा कायमचा दूर करतात आणि आपल्या जमातीसाठी, जमातीच्या हितासाठी झटणारा, झगडणारा, त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणारा आबा आपल्या जमातीतील लोकांच्या हातूनच 'बळी' जातो.

प्रथमदर्शनी 'बळी' ही आबाची शोककथा वाटते. पण खरे पहाता आबा हा एकटाच बळी पडलेला नाही. शिवाय आपल्या जातभाईंच्या क्रूरतेला बळी पडण्याआधी परिस्थितीपुढे तो कितीदा तरी बळी पडलेला असतो. एवढेच नाही तर आबा हा आपल्यातील पाशवी वृत्तींनाही बळी पडलेला असतो. त्याच्या पौरूषत्वाला आव्हान देणाऱ्या नामीवर सूड उगवितांना त्याच्यातील सात्विकता, पाशवी वृत्तींना बळी पडलेला दिसतो. पण 'बळी' कादंबरीत आबा हा एकटाच बळी गेलेला नसून त्याची सारी जमातच आर्थिक विषमतेला, सत्ताधीशांच्या स्वार्थी धोरणाला आणि माणुसकी विसरलेल्या समाजाला बळी पडलेली दिसते. आणि या सर्वांचे कारण म्हणजे अज्ञान, निरक्षरता आणि रूढीप्रियता!

लेखिकेने आपल्या 'बळी' ह्या कादंबरीत विविध पातळ्यांवरील 'बळी' आपल्यासमोर उभे केले आहेत. आबा, त्याचे कुटुंब, त्याची जमात, गुन्हेगार वस्तीतील अधिकारी, सरकारी अधिकारी पांढरपेशे हे सारेच स्वार्थाला, अगतिकतेला बळी पडलेले आपणास दिसतात. 'बळी' कादंबरी म्हणजे विभावरी शिरूरकर यांचे फार मोठे यश मानावे लागेल. मराठी कादंबरीच्या सामाजिकतेच्या कक्षा ह. ना आपटे यांच्या पेक्षा लेखिकेने बऱ्याच विस्तृत केलेल्या दिसतात. लेखिकेच्या सहृदयतेची साक्ष देणारी ही कादंबरी आहे! लेखिकेच्या समर्थ भाषाशैलीची आणि सूक्ष्म निरीक्षणशक्तीची साक्ष पटविणारी ही कादंबरी आहे!

# — चित्रपट सृष्टीतील गंमतीजंमती —

*कु. जयश्री तांबोळी*
S. Y. B. Com.

तुम्हाला एक प्रश्न विचारू का?. अरे! इतके घाबरलात? पण घाबरण्यासारखा प्रश्न विचारणार नाही हं! तुमच्या जीवनातील सगळ्यात प्रिय अशी गोष्ट कोणती? 'काय म्हणालात'? 'सिनेमा'? (सिनेमा म्हंटल्यावर तरूणींच्या डोळ्यासमोर हिरो आणि तरुणाच्या डोळ्यासमोर हिरॉईन तर आली नाही नां? हो! तसं झालं तर मात्र माझा पुढचा लेख वाचण्यासाठी तुम्ही शुद्धीवरच नसाल. तेव्हां तसं करु नका हं!) अगदी बरोबर सांगीतलत्! सिनेमा हा आजकाल अगदी लहान मुलांपासून म्हणजे अगदी पाळण्यात झोपणाऱ्या बाळापासून तर अगदी मान हलवणाऱ्या आजोबांपर्यंत सगळे अगदी पान चघळावं तसां आवडीने बघत असतात. तुम्ही म्हणाल गंमत सांगायची सोडून हे काय बडबडत बसलीय ही- सांगते हं! फक्त जरां......

हे तर या चित्रपटसृष्टीतील पहिलं गमतीचं पात्र म्हणजे व्हिलन, म्हणजेच खलनायक होय. खलनायक म्हटला की नजरेसमोर क्रूर चेहऱ्याचा, गॉगल लावलेला, नेहमी तोंडात सिगारेट असलेला आणि समोरच्या टेबलावर आपले दोन्ही पाय स्टायलिशपणे पसरवून बसलेला आणि ज्याच्या भोवती १०-१२ कुत्ते (अर्थातच हे 'त्याच्या' भाषेत! आपल्या भाषेत: त्यांचे साथीदार) अदबीने म्हणजे अगदी महाराजा स्टाईलने उभे असतात, असा काहीसा महाभयंकर माणूस उभा रहातो.

हे खलनायक दोन जातीचे असतात. एक म्हणजे साधारण वयस्कर आणि कुरूप खलनायक आणि दुसरा म्हणजे सुंदर चेहऱ्याचा तरुण खलनायक. यापैकी पहिल्या जातीचा खलनायक हा सहसा नायिकेला त्रास देत नाही. तो फक्त नायकाच्या मागे अगदी हात धूवून लागलेला असतो. अशा प्रकारचे खलनायक 'बॉस' म्हणून सुद्धा ओळखले जातात. हे 'बॉस' सहसा गुप्त ठिकाणीच रहात असतात. त्यांचा अड्डा तर इतका सुंदर आणि गुढ रितीने बांधलेला असतो की हे सगळे बॉस कुशल इंजिनीयरच असावेत अशी माझी खात्री होते.!

दुसऱ्या जातीचे खलनायक मात्र नायिकेच्या दृष्टीने अतिशय 'खतरनाक आदमी' की असंच काहीतरी असतात. आणि आश्चर्य असं की या खलनायकाच्या भोवती इतक्या सुंदर मुली असतांना त्याला नेमकी नायिकाच कां हवी असते त्याचं कोडं मला अजून सुटलेलं नाही. दुसरी गंमत अशी की ह्या खलनायकाची जेव्हा नायकाशी 'फायटिंग' होते तेव्हा सुरुवातीला प्रत्येक वेळी तोच जिंकत असतो. पण सिनेमाच्या शेवटीच त्याची अक्कल आणि ताकद कुठे जाते कोण जाणे; कारण शेवटी हाच शूरवीर खलनायक चक्क निशस्त्र नायकाच्या हातून चिक्कार मार खाऊन घेतो!

हे दोन्ही प्रकारचे खलनायक आपल्या माणसांच्या अंगावर धडाधड नोटांची बंडलं फेकत असतात. त्यामुळे त्यांचा खोट्या नोटा तयार करण्याचा धंदा असावा अशी तर मला नेहमीच दाट शंका येते. अगदी अशीच गत पिस्तुलाच्या बाबतीत

प्रत्यक्ष मारामारीत त्याच्या पिस्तुलातील गोळ्या कधीच संपत नाहीत.! म्हणजे ६ गोळ्यानंतर सुद्धा ७ वी, ८ वी........ गोळी अशा सटासट गोळ्या सुटत असतात. जणु काही त्याला गोळ्या निर्माण करण्याचा मंत्रच अवगत असतो.!

चित्रपटसृष्टीत सगळ्यात जास्त शिव्या खाणारा हा प्राणी असतो. मला तर त्यांची फारच कीव येते. एकतर तो नायिकेला पळवून नेण्याची घोडचूक करुन नायकाच्या शिव्या खातो. (नायिकेला पळवि-ल्याबद्दल नव्हे तर तिला ज्या ठिकाणी ठेवलेलं असते ती जागा त्याला 'झक मारुन' शोधून काढावी लागते. म्हणून, हे आपलं गुड, गुड. गुपीत हं!) आणि खून केल्याबद्दल त्यास प्रेक्षकांच्या शिव्या खाव्या लागतात. उदा. 'क्रूर मेला, नालायक इत्यादी

खलनायकानंतर नायक हा दुसरा गंमतीदार प्राणी होय. त्यांचे सुद्धा दोन प्रकार पडतात. एक, अतिशय श्रीमंत नायक आणि दुसरा अतिशय गरीब नायक. यापैकी गरीब नायक हा तर कधी कधी नायिकेच्या घरी चक्क, नोकरच असतो! मात्र तो मनाने अतिशय श्रीमंत, असतो, (असायलाच हवा त्याशिवाय नायिकेचं त्याच्यावर प्रेम कस बसणार!) आणि "• • • • तुम्हे मुझसे अच्छा लडका मिलेगा, तुम उससे शादी करो!" असं उदारपणे बोलून शेवटी मात्र तिच्याशीच लग्न करणारा असतो.

काही वेळा नायिका आपल्या सुंदर मैत्रिणींच्या घोळक्यात असते. तिला शोधून काढून आपली 'प्रेमदृष्टी' नायकाला तिच्याकडेच वळवावी लागते. [ बिच्चारा नायक! कदाचित डायरेक्टरला या बाबत शिव्या सुद्धा देत असेल )

हे नायक सर्व गुणसंपन्न असतात. उदा. सामान्य-परिस्थीतीतीला म्हणजे पांढरपेशा वर्गातला नायक जरी असला, तरी त्याच घर हे सगळ्या सुखवस्तूंनी युक्त असते. आणि त्याचे ड्रेस सुद्धा अगणित असतात. शिवाय तो कार ड्रायव्हिंग अथवा मोटारसायकल सुद्धा इतका सफाईदारपणे चालवत असतो की खलनायकाचा पाठलाग करीत असतांना एखादं वाहन रस्त्यात आलं तर त्याची कार अथवा मोटारसायकल पंख लावलेल्या पक्ष्याप्रमाणे त्या वाहनावरुन जणुं उडत जाते.! मला तर कधी कधी वाटतं की इतकी चांगली कला असतांना हे चित्रपटसृष्टीत येण्यापेक्षा सर्कशीत गेले असते तर किती चांगलं झालं असतं!

त्याचा दुसरा गुण म्हणजे मारामारी करणे. खलनायकाची १०-१२ माणसे हातात अगदी आधुनिक आणि नवीन पद्धतीची हत्यारे घेऊन वर्तुळाकार उभी असतांना, आणि नायक मध्यभागी अगदी एकटा व निःशस्त्र उभा असतांना सुद्धा आपल्या हुशारीने त्या सगळ्यांना अगदी ५ मिनिटात लोळवतो. याच नायकाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जर प्रत्येक तरुण इतका लढवय्या झाला तर सरकारच्या संरक्षणाचा आणि हत्यारांचा खर्च निश्चितच वाचेल. किंवा असे मारामारीचे 'सीन युद्धाच्याच वेळी घेतल्यास नायकाला खुद्द शत्रूशी मारामारी सुद्धा करता येईल. आणि त्यामुळे शत्रूंपासून संरक्षण आणि शूटींग ही दोन्ही कामे एकाच वेळी पार पडतिल.!

बरं हा नायक नुसताच मारामारी करण्यात पटाईत नसतो. तर तो कवि आणि गायक सुद्धा असतो. (हो! प्रत्येक नायक नायिकेचं वर्णन इतक्या सुंदर शद्बांत करीत असतो की प्रेक्षकांच्या तोंडून, "वा! वा! क्या बात है!" असे उद्गार निघत असतात.) त्यामुळे नायिकेचे गुणगान गाऊन तिला खुष ठेवण्यासाठी त्याला ह्याचा फार उपयोग होतो.

अशा नायकाची नायिका सुद्धा मोठी मजेशीर असते. एक म्हणजे ती सहसा सुंदर आणि गोरी असते. आणि यदाकदाचित सावळी असलीच तर रेखीव चेहऱ्याची असते. मात्र 'स्त्रिया इथून तिथून सारख्याचं' या उक्तीनुसार ही नायिका सुद्धा एकाच प्रकारची असते. तिचे प्रकार पडत नाहीत ही नायिका सुद्धा सर्वगुण संपन्न असते. म्हणजेच कवयित्री आणि गायिका असते. (असणारच! कविच्या सहवासात रहात असते ना!) आणि नायक बुजरा असला तर ती स्वतः एकाच वेळी १०-१२ माण-सांशी मारामारी करुन स्त्रियासुद्धा कशातच मागे नाहीत हे दाखवून देत असते.!

या नायिकेच्या, अगदी शांत आणि अबोल नायिकेच्या सुद्धा खूप मैत्रीणी असतात. इतक्या मैत्रीणी ती कुठून जमा करते कोण जाणे. त्या नेहमी तिच्या आसपास घोटाळत असतात. आणि तिने गायला सुरुवात केली की लगेच 'एकसाथ' नाचायला सुरुवात करतात. नायिका सुशिक्षित आणि कॉलेजात जाणारी असेल तर तिची सायकल नेमकी नायकाच्याच सायकलीला ठोस मारत असते! किंवा तिने संकटाच्या वेळी हाक मारली तर ती फक्त नायकालाच ऐकू येत असते. (अगदी २-३ मैलांवरुन सुद्धा! इतर लोक त्याच वेळी बहिरे कसे होतात कळत नाही!)

याशिवाय चित्रपटात अनेक गंमतं जंमती असतात. उदा. लहानपणी जे भाऊ-भाऊ 'बिछुडलेले' असतात त्यापैकी एक अगदी ठरल्याप्रमाणे नेहमीच इन्स्पेक्टर, तर दुसरा अगदी अट्टल दरोडेखोर असतो. कदाचित त्यांनी लहानपणीच ताटतूट करायचे असं ठरविलेलं असते की काय कोण जाणे! या दोघांपैकी एकाच्या हातावर किंवा पायावर काहीतरी खूण असतेच. आणि त्यांच्या मारामारीत नेमका शर्ट अथवा पॅन्ट त्या खुणेवरच फाटत असते! (ठरविल्याप्रमाणेच हं!) आणि मग आळख पटून ते एकमेकांना भटत असतात.

मुहूर्त पहाणे हा भारतातील लोकांचा महत्वाचा गुण चित्रपटातील खलनायकाच्यासुद्धा अंगी असतो. म्हणून तो नेहमीच डाका टाकण्यासाठी एखादा 'होलीकादिन' अथवा 'दिवालीका दिन' च निवडत असतो. इतकंच नव्हे तर नायिकेचा भाऊ घरातून निघून जाण्यासाठी अथवा त्याला पळवून नेण्यासाठी नेमका राखीपौर्णिमेचा अथवा भाऊ-बिजेचाच दिवस निवडतात.

मला कधी कधी एका गोष्टीचं आश्चर्य वाटतं की या चित्रपटातील नायक आणि नायिकांना गाणं म्हणण्यासाठी किंवा एकमेकांच्या मागे धावण्यासाठी बगिचा नेहमीच अगदी रिकामा असतो! त्यांत साधं कुत्रं सुद्धा नसते. इतक्या नयनरम्य नैसर्गिक ठिकाणी कुणी सुद्धा नसावं याचं आश्चर्य वाटतं! उद्या जर कुणी असं बगिच्यातून धावायला लागलं तर कितीही ओरडून सांगितल तरी लोक काहीएक न ऐकता त्यांची रवानगी सरळ ठाण्याला वेड्यांच्या इस्पितळात करतील.!

चित्रपट पहात असतांना ज्या गंमती प्रेक्षक वर्गात निर्माण होतात. त्या तर औरच असतात. अशा गंमती जंमती बघण्यासाठी आणि अनुभव-ण्यासाठी शक्यतोवर 'दुसऱ्या' किंवा 'तिसऱ्या' वर्गाचेच तिकीट काढणे जास्त श्रेयस्कर आणि फायद्याचे ठरते. विशेषतः ॲक्शनबाज आणि फिल्न प्रधान चित्रपटांच्या वेळी तर हा कटाक्ष निश्चितच पाळावा.

या वर्गातील खुर्च्या चित्रपट सुरु असतांना अगदी २।२ मिनिटांनी बोलत असतात (म्हणजेच खुर्च्या-वरील प्रेक्षक हं! नाहीतर मला तुम्ही बोलक्या खुर्च्यांचे संशोधक म्हणाल! त्यासाठी आधीच हा खुलासा) पडद्यावर खलनायक आणि नायक 'ठिश्यॉव,' 'ठिश्यॉव' करीत असेल तर समोरच्या खटचाळ मुलांच्या तोंडून "मारो सालेको," 'पीटो,' 'और जोरसे लगाओ' असे उद्गार निघत असतात तर काही लहान मुले चक्क खुर्चीवर उभे राहून दोन्ही हाताच्या मुठींनी दातओठ खाऊन, जोरजोरात हवेत ठोसे मारीत असतात! थोड्या वेळाने ही मुलं पडद्यापर्यंत धावत जाऊन पडद्यालाच तर ठोसे मारणार नाहीत ना? अशी मला भीती वाटते नायिका पडद्यावर रडत असतांना स्त्री वर्गातील प्रेक्षक सुद्धा तिच्या रडण्यात आपला सूर मिसळून स्त्रियांमधील हळवेपणा दाखविण्याचा प्रयत्न करीत असतात! आपल्याला मात्र उगीचच डबल ट्रॅजेडी बघत असल्याचा भास होत असतो. आणि म्हातारी माणसं, विशेषतः तरुण मंडळीबरोबर आलेली, चित्रपट पहातांना नेमके नायकाच्या सुंदर डॉयलॉगच्या वेळीच, तरूण मंडळींना उपदेशाचे डोस पाजण्यात गर्क असतात. (आणि तरुण मंडळींनी हासडलेल्या शिव्या खात असतात. अर्थात त्यांना कमी ऐकू येत असतं हा तरुणांच्या दृष्टीने एक फायदाच असतो!)

तर असा हा वैचीत्र्याचा लाभ घडवून देणारी ही चित्रपट सृष्टी!

# स्त्री समस्या आणि प्रेमचंद

सविता बागुल
M. A. (Sr.)

हिंदी साहित्य सम्राट प्रेमचंद यांचा जन्मदिन ३१ जुलै १८८०, त्यांचा मृत्यु १९३६ साली झाला. आज त्यांच्या मृत्युला इतकी वर्षे लोटल्यानंतरही त्यांच साहित्य समाज मनाला जिवंत, प्रेरणादायी, स्फूर्तिदायी, वास्तववादी वाटत आहे. त्यांच्या कथांतून मानवी स्वभावाचे दर्शन घडते. समाजातील अत्याचार, अन्यायाविरुद्ध बंड पुकारणारा साहित्यिक म्हणून प्रेमचंदाचे स्थान आदरणीय आहे.

भारतीय स्त्रियांच्या समस्यांचे यथार्थ वर्णन करणारे स्त्रियांवरील अत्याचारांना वाचा फोडणारे, स्त्रीमनाच्या वेदना जाणणारे त्याविरुद्ध आवाज उठवणारे प्रेमचंद हिंदी साहित्यातील पहिले पैगंबर ठरले. मुलीच्या लग्नाचा प्रश्न, हुंड्याची समस्या, विधवांचे प्रश्न, वेश्यांची समस्या यांचा जन्म एकमेकांच्या उदरातून होतो असे ते मानीत. सामाजिक प्रश्नांना साहित्याद्वारे समाजापुढे मांडून नवी दिशा दाखवणारा द्रष्टा साहित्यिक म्हणून प्रेमचंद ओळखले जातात.

प्रेमचंद व हरिभाऊ या समकालीन लेखकांनी आपल्या कादंबऱ्यातून हुंड्याच्या अनिष्ट प्रथेचे चित्रण केले आहे. प्रेमचंदांनी 'सेवासदन' 'गबन' 'निर्मला' आणि हरिभाऊंनी 'गणपतराव' 'पण लक्षात कोण घेतो?' 'मी' 'यशवंतराव खरे' वगैरे कादंबऱ्यातून हुंडापद्धतीचे दुष्परिणाम व्यक्त केले आहेत. विजोड विवाहातून उद्‌भवणाऱ्या समस्यांचे प्रभावी चित्रण केले आहे.

प्रेमचंद व हरिभाऊंच्या काळात पुरुषप्रधान संस्कृती होती. पत्नीच्या निधनानंतर पुरुषास पुर्नविवाहाची संधी होती. परंतू स्त्रीला मात्र तो अधिकार नव्हता. बालपणी लग्न झाल्यावर बालपणी पती वारला तर बालविधवेचे जीवन पदरी येई. अशा विधवांची तत्कालीन समाजात होणारी कुचंबणा त्यांनी हृदयस्पर्शीरित्या मांडल्याचे त्यांच्या कादंबऱ्यावरून आढळून येतं. प्रेमचंदांच्या 'प्रतिज्ञा' मधील पूर्णा 'गबन' मधील रतन आणि हरीभाऊंच्या 'जग हे असे आहे' मधील राधाबाई, 'पण लक्षात कोण घेतो?' मधील यमुना, 'मायेचा बाजार' मधील मधू या व्यक्तीरेखांद्वारे वास्तववादी जीवनाच दर्शन घडवलेले आहे. विधवांची या दारूण जीवनातून मुक्तता करण्याचे उपायही त्यांनी सांगितलेले आहेत. 'महिलाश्रम', 'पुर्नविवाह', स्त्रियांचे शिक्षण असे मार्ग सुचवले आहे. हरिभाऊंच्यामते स्त्रिया ह्या सुशिक्षीत बनल्या तर त्या आत्मनिर्भर, स्वावलंबी होऊ शकतील त्यामुळे विधवांच्या समस्या हळूहळू कमी होऊ लागतील.

'सेवासदन' ही प्रेमचंदाची, हुंड्याच्या दुष्ट प्रथेचे दुष्परिणाम चित्रित करणारी, हिंदी जगतात खळबळ माजवणारी पहिली कादंबरी. स्त्री जीवनाचे दुःख विविध रीतीने मांडण्यात लेखक यशस्वी झाला आहे. स्त्रीची निष्ठा आणि पुरुषाचे प्रेम याबर वैवाहिक जीवन अवलंबून आहे. त्या अभावी अनेक प्रश्न निर्माण होतात. विशेषतः वेश्या व्यवसाया सारख्या प्रथांना प्रोत्साहन मिळते.

प्रेमचंदाच्या मते मध्यमवर्गीयांची उच्चवर्णीयाप्रमाणे जगण्याची इच्छा, त्या हव्यासापायी हुंड्याची प्रथा वाढते, व त्या प्रथेस खत पाणी मिळते. ही प्रथाच वृद्धविवाह, बहुविवाह व विजोड विवाहांना कारणीभूत झाली आहे. या प्रथेमुळे कित्येक गुणी, सुंदर चारित्र्यसंपन्न मुली म्हाताऱ्या, रोगी, कुरूप, गरीब, व्यसनी पुरूषांच्या पदरात पडल्या, कित्येकांनी आत्महत्या करून आईवडिलांना एका काळजीतून मुक्त केले. कारण आई-वडील हुंडा देऊ शकत नाही. म्हणून स्वत.च मरणाला कवटाळून कित्येक सासुरवाशीणी सासरच्या जाचाला कंटाळून अकाली मरण पावल्या तर कित्येक स्त्रिया वाईट मार्गाला लागल्या. प्रेमचंदानी हे सर्व सहृदयतेने ग्रहण करून समाजापुढे मांडले

हुंडा घेणारी व हुंड्याला विरोध करणारी अशा दोन्ही प्रकारची पात्रे प्रेमचंदांनी आपल्या साहित्यात निर्माण केली. या प्रथेपायी गांजलेल्या सुमन, निर्मला रंगवल्या तसेच पतीला विरोध करुन स्वतंत्र राहू इच्छिणारी कुसुमही रंगवली.

कादंबऱ्यात मधून मधून त्यांनी आपले विचार प्रकट केलेले आहेत. हुंड्याच्या विरोधात गप्पा मारणारे स्वतःवर वेळ आली की लपून हुंडा घेणारे त्यांनी रंगवले, त्यांचे रहस्य त्यांनी चव्हाट्यावर आणले.

'निर्मला' या स्त्री समस्येवर आधारित असलेल्या कादंबरीत बाप शोभावा अशा व्यक्तीशी लग्न करूनही निर्मलाचा दैवदुर्विलास थांबत नाही. ती भीषण सांसारिक परिस्थिती व दारिद्र्यात गुरफटते व अकालीच मृत्युमुखी पडते. तिच्या जीवनाच्या शोकांतिकेस समाजाप्रमाणेच तिच्या आईची विचारसरणीही कारणीभूत ठरते. मोटेरामशास्त्री स्थळांच्या शोधासाठी बाहेर पडतात. येतांना कल्याणीपुढे अनेक पर्याय ठेवतात पण कुणाचे कुळ हीन म्हणून ती योग्य वर नाकारते आणि 'तोताराम सारखा' जावई पसंत करते. पण त्याच्याबद्दल आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना ती म्हणते-

"वय जरा जास्त आहे, पण मरणं जगणं परमेश्वराच्या हातात आहे, पोरीच्या नशिबात असेल तर सुखी होईल" निर्मलाची आई बऱ्याच कन्यांच्या आईचे प्रतिनिधित्व करते.

साहित्यातून प्रेमचंदांनी विवाह संस्थेतील अपप्रवृत्ती मांडलेल्या आहेत. मुलींचे आईवडील वर संशोधनात वराच्या स्वभाव व गुणाचा विचार सोडून संपत्ती व खानदान याकडे लक्ष देतात आणि म्हणूनच फार थोडी योग्य जोडपी समाजात आढळतात असा निष्कर्ष त्यांनी काढला म्हणून त्यांच्या साहित्यात असंख्य विजोड दांपत्ये आढळतात.

मुलींच्या आईवडीलांना तरी ते प्रसंगी क्षमा करतात परंतु हुंड्यासाठी रुसणाऱ्या, अडून रहाणाऱ्या नवरदेवावर ते टिकेची झोड उठवतात या प्रथेविरुद्ध हवी असणारी क्रांती युवक–युवतीच करु शकतील असा विश्वास असल्याने त्यांनी सामाजिक कुप्रथांविरूद्ध, हिणकस वृत्तीविरूद्ध ज्वलंत समस्येविरूद्ध, बंड करणारी, विद्रोह करणारी आदर्शवादी पात्रेही निर्माण केली.

'कायाकल्प' मधील चक्रधर हुंडाप्रथेला विरोध करतो. त्याच्या आईला तो सांगतो 'जर माझ्या समोर देण्याघेण्याच्या गोष्टी केल्यात तर मी विष खाईन' त्याची आई त्याला विचारते मग तुला पंचवीस वर्ष फुकटच वाढविले म्हणायचे! तेव्हा चक्रधर म्हणतो, "मग बाजारात उभा करुन मला विकून का टाकत नाहीस! बघू या माझ्यामुळे तुम्हाला किती पैसे मिळतात ते."

प्रेमचंदांचा समाजाला सवाल आहे. ते समाजाला विचारतात- असे चक्रधर समाजात बदल घडवून आणण्यात यशस्वी होतील का ?

स्वाभिमानी दृढनिश्चयी युवती पुढे आल्या पाहिजेत. त्यांनीच स्वार्थी व निर्लज्ज युवकांना नाकारले पाहिजे असे त्यांना मनोमन वाटायचे. प्रेमचंदाना समाजातील या प्रथांविरुद्ध लढावे लागले. त्याचे कार्य एवढ्याने थांबलेले नाही, युवापिढीला आजही या प्रथांविरुद्ध झगडावे लागते आहे. आंदोलन उभारण्याची आवश्यकता भासते यातच या समस्येचं ज्वलंतपण सामावलेलं आहे.

समाजाला लागलेली हुंडा या प्रथेची कीड कित्येक वर्षापासून भेडसावणारी ही समस्या, तीव्रतेने, प्रखरतेने आजही आढळत आहे. केवळ सभा, भाषणं एवढ्यापुरताच हा विषय मर्यादित नसून युवक वर्गाकडून आचारणदृष्टया या बाबतीत फार मोठ्या अपेक्षा आहेत. प्रेमचंदानी नेमकं हेच हेरलं आणि म्हणून साहित्यात त्यांनी या प्रथेविरुद्ध आवाज उठवला. या प्रथेच्या जाड, राठ श्रृंखलांवर प्रहार करण्यास युवक-युवतींना उत्तेजित केले, प्रवृत्त केले.

हुंडा प्रथा नष्ट करायची असेल तर प्रेमचंदाच्यामते जेव्हा समाजातील युवकांची स्वाभिमानशून्यता, भित्रेपणा, स्वार्थीवृत्ती नाहीशी होईल तेव्हा ही प्रथा संपेल. भ्याड पुरुषांना नाकारणाऱ्या खंबीर, स्वाभिमानी, बाणेदार, दृढनिश्चयी युवती निर्माण झाल्यातर या जीवघेण्या, अनिष्ट प्रथेला आळा बसेल. प्रेमचंदाचे हे विचार आजच्या काळात, वातावरणात, परिस्थितीत तितकेच उपयुक्त, व मोलाचे आहेत.

सामाजिक समस्यांविरुद्ध लढणारे प्रेमचंद हातात असलेली लेखणी व मनात असलेल्या मानवतेने मानवी समस्यांविरुद्ध लढत होते.

## मदनाचा वारा


किशोर नेमाडे

S. Y. B. Sc.


मदनाचा वारा
उडविला ज्वानीचा पदर
स्पर्श होता तुझा गे
धावे अंगी रोमांची लहर
हृदये जे सदा माझे
सोडी उसासे गरम
धावत बिलगुनी जा
मला, कशाची तुज शरम
थरथरत्या अधरावरी
ठेवू दे मज अधर
पाहू रूप, एकमेकांचे
मिळवून नजरेस नजर
मला वाटे हुरहुर
जसा तडपे चकोर
लागलासे तुझा ध्यास
भागवू दे मज प्यास

## वाटसरु


सतिश खडके

F. Y. B. Com.


चालत असतो रस्त्याने
एकटा अनवाणी
अंतर रस्त्यातील होते कमी
पावला पावलांनी
टांगलेले असते काठीला गाठोडे
नजर असते त्याची दीनवाणी
रस्त्याने तो थकतो भागतो
बसतो सावलीत पिऊन पाणी
पाय म्हणतात नको नको
तरी चालतो, थकतो !
विश्रांती घेतो परत चालतो
नव्या जोमाने !
भान त्यास कशाचेच नसते
असो कडक थंडी वा पावसाळा
किंवा असेल रखरखीत उन्हाळा
फक्त मुक्कामावर चालत असतो
तो वाटसरु !

# सूड


अशोक भंगाळे

S. Y. B. Sc.


सुनिलला आठ-दहा दिवसापासून शांत झोप येत नव्हती. मनात धगधगणाऱ्या संतापाच्या निखाऱ्याने त्याच्या जिवाची लाही लाही होत होती. पण आज सुनिलने आपल्या मनातील जळणाऱ्या ज्वालाग्नीला कायमचे मिटविले होते. त्यामुळे आज त्याला अगदी निश्चितपणे झोप लागली. सकाळी उठून बसताच त्याची थोडी तंद्री लागली होती तोच– बाहेरील दरवाज्यावर जोराची थाप पडली आणि तो भयभीत झाला.

'पोऽऽलिस !' त्याच्या तोंडातून पुसटशी किंकाळी बाहेर पडली. 'सुनिल दरवाजा उघड' नाहीतर दरवाजा तोडून तुझ्यापर्यंत यावे लागेल ? बाहेरील इसमाने धमकी दिली.

सुनिल क्षणभर बोलूच शकला नाही त्याला कान असून ऐकू येत नव्हते; तोंड असून बोलता येत नव्हते त्याच्या मनात विचाराचे प्रचंड वादळ सुरु झाले आणि पुढच्या कल्पनांनी त्याच्या छातीत धस्स झाले, पोलिसांचे वारंट जीवनभर चुकविता येत नाही. कधी ना कधी त्यांना तोंड द्यावेच लागते या अकस्मात आलेल्या कल्पनेने त्याच्या विचारांना अधीकच उग्र स्वरुप आले व जड पावलांनी तो दरवाजा उघडण्यासाठी चालू लागला.

दरवाजा उघडताच घरामध्ये चार पोलिसांनी प्रवेश केला त्यापैकी एकाने हातामध्ये हतकडी धरलेली होती.

'सुनिल' डॉ. धुरंदरच्या खुनाच्या आरोपावरुन आम्ही तुम्हाला अटक करीत आहोत त्याच्यापैकी एक बोलला.

'अहो पण........'

'जे काही सांगायच असेल ते कोर्टात सांगा. आता तर पुरावाही मिळाला आहे असे दुसऱ्याने म्हटले.

'पण...........पण मी........ खून नाही हो केला" –सुनिल

'अहो पहाता काय ! घाला हातकड्या त्याच्या हातामध्यें' दुसऱ्याने सुचविले. 'मी ........ मी तुम्हाला कस पटवून देऊ की मी निर्दोष आहे म्हणून सुनिल विनवणी करु लागला.

'पटवून दाखवायची काही जरुरी नाही. मुकाट्याने हात पुढे करा' तिसऱ्याने दटावणी केली.

सुनिलने आपले दोन्ही हात पुढे केले आणि त्याच वेळी त्याच्या डोळ्यातून टपाटप आसवं टपकू लागली आणि त्याचे मन भूतकाळातील सुखद जीवनातील आठवणीमध्ये लीन झाले.

सुनिलचा सुखाचा संसार होता. नुकतेच लग्न झाल्यामुळे तो आपल्या पत्नीच्या प्रेमामध्ये रंगून गेला होता. आई-वडील लहानपणीच देवाला प्रिय झाली आणि सुनिलला कायमचे सोडून गेली. त्याची एक बहीण होती सुनंदा तिचे नांव आपल्या पत्नीच्या व बहिणीच्या सहवासामध्ये जगातील सर्व सुख मानून आनंदाने त्याचा संसार सुरु होता. त्यावेळी सुदैवाने त्याला एका सावकाराकडे नोकरी लागली. कर्ज-व्यवहाराचा हिशोब ठेवून

महिन्याकाठी तीनशे-चारशे रुपये कमावून तिचांचे पोट भरीत होता.

परंतु दैवाला तेही सुख पाहवले नाही. सुनिल जवळून देवाने त्याची पत्नी हिरावून घेतली आणि त्याच्या सोन्यासारख्या संसाराला अमावस्येची अवदसा प्राप्त झाली.

सावकाराचेही धंदामध्ये नुकसान झाल्याने त्यानेही धंदा बंद केला आणि 'सुनिलला' नोकरीतून कायमची रजा दिली. आता सुनिल आणि त्याची बहीण सुनंदा याच्यांवर दुःखाचा अफाट डोंगरच कोसळला. सुनिलने अपार कष्ट करुन आपल्या बहीणीला सुख देण्याचा प्रयत्न केला. दिवसभर हमाली करुन तिला पोटभर खायला दिल्या-वाचून त्याला चैन पडत नव्हती. अगदी तळहाताच्या फोडाप्रमाणे आपल्या बहिणीला जपत होता तो.

सुनंदा आता वयात आली होती. म्हणजे नुक-तेच सोळाव्या वर्षात पदार्पण केले होते. तसेच दिसायलाही सुनंदा फार सुंदर होती. चाफेकळी-सारखे धारदार नाक, टपोरे आणि पाणीदार डोळे आणि गुलाबाच्या पाकळीप्रमाणे नाजुक ओठ तिच्या सौदर्यात अधिकच भर घालीत होते. पहाणारा स्वर्गातल्या परीप्रमाणे तिचें अप्रतिम लावण्य व मोहक सौदर्य पाहून क्षणभर स्वतःलाही विसरून जात असे.

एकेदिवशी संध्याकाळी जेवता-जेवता दोन्ही बहीण-भाऊ गप्पा मारतांना अगदी रंगात आली होती. सुनंदाच्या कधीपासून मनात होते की, आपण बारीक सारीक कामे करुन घरखर्चासाठी थोडीफार मदत करता येईल यासाठी खटपट करावी म्हणून तिनं त्याचवेळी सुनिलला विचारण्याची संधी साधली.

'दादा, तू' दिवसभर काम करुन खूप थकत असशील रे ' ती म्हणाली.

' अग, पाण्यात होडी टाकल्यावर ती वल्हवणाऱ्या इसमाने थकलो असे म्हणून वल्हविण्याचं काम बंद केलं तर होडी प्रवाशांसह बुडून जाईल ' सुनिलने सांगितले.

' पण प्रवाशांनी जर वल्हविण्यासाठी थोडीफार मदत केली तर प्रवासही सुखाचा होईल नावाडीही थकणार नाही ' असे सुनंदाने सुचविले.

' म्हणजे '! 'तुला काय म्हणायचे आहे ? सुनिलने आश्चर्याने विचारले.

' दादा,. मीही बारीक सारीक कामे करीन अन् तूला थोडीफार मदत करीन " सुनंदा निर्धाराने बोलली.

' नाही, सुनंदा, नाही तुझ्या कोमल अंगाला बाहेरच्या ऊन – पावसाचे तडाखे सहन होणार नाहीत. हाताला मेंदी लावण्याच तुझं हे वय आणि तू त्या कोमल हातांनी परक्या . घरची भांडी घासणार ! धुणं धुणार ! नाही सुनंदा नाही. माझ्या डोळ्यांनी हे पाहवलं जाणार नाही, बोलता बोलताच त्याचा कंठ दाटून आला.

" पण दादा, घरी राहूनही कंटाळा येतो ना ! मग बारीक–सारीक कामं केलीत तर त्यात बिघडणार आहे कुठे ?

' तुझ्या या तरूण वयात...........नाही; सुनंदा नाही. कल्पनाही करु.. शकत नाही मी त्या गोष्टीची. सुनंदा मला तू वचन दे की पुन्हा असले विचार चुकून देखिल मनात येऊ देणार नाही. सुनील काकुळतीने बोलला.

' बरं बाबा ! मी असे विचार मनात कधीही आणणार नाही. सुनंदा म्हणाली.

तेव्हा कुठे सुनिलच्या मनाचे समाधान झाले स्वतःच्या बहिणीस परपुरुषाची दृष्ट लागू नये म्हणून सुनिल फारच जपत होता. त्याची एकच इच्छा होती आपल्या लाडक्या बहिणीसाठी सुशिक्षित आणि अनुरुप पति शोधणे.

पण अचानक सुनिल कसल्याशा रोगाने आजारी पडला आणि सुनंदा ज्या आधारावर जगत होती तो आधार स्तंभच कमकुवत झाला. दोन–तीन दिवसापासून डॉ. धुरंदरे सुनिलला इंजेक्शन व औषधी देऊन जात होते. सुनंदा फार धावपळ करीत होती.

' दोन–तीन दिवसात सुनिल अगदी पहिल्यासारखा सुधारेल आता काहीच काळजी करण्याच कारण नाही. ' डॉक्टरांनी सुनंदाला सांगितले.

' डॉक्टर, फारच उपकार होतील तुमचे आमच्यावर ! ' आतातर औषधाला देखिल पैसे नाहीत माझ्याजवळ' सुनंदा रडक्या स्वरात बोलली.

' डॉ. धुरंदरानी क्षणभर सुनंदाकडे पाहिले. तिचे मादक सौदर्य पाहून त्यांच्या डोळ्यांना धुंदी चढली आणि ते वेड्यासारखे नुसते पहातच राहीले. काही वेळपर्यंत विचार करून त्यांनी एकदमच बोलण्यास सुरवात केली.

' सुनंदा, तुला दिवसभर काहीच काम नसतं म्हणून म्हणतो की, तू माझ्याकडे नर्सचे काम करायला काय हरकत आहे ?'

' डॉक्टर आपण मला नर्सची नोकरी देत आहात ! हे आपले खूपच उपकार म्हणावे लागतील ! आपले हे उपकार मी जीवनभर विसरणार नाही, 'सुनंदा' काकुळतीने बोलली.

आज सुनंदा फारच आनंदी होती. अगदी पूर्वी-पेक्षाही अधिक. सुनिलही आजारातून पूर्णपणे बरा झाला होता, आणि सुनंदाही नियमितपणे दवाखान्यात नर्सचे काम करण्यासाठी जात होती. काही दिवसांनी सुनिललाही एका मोठ्या शेतकऱ्या-कडे नोकरी लागली. दररोज दोघे जण आपापल्या कामावर जात असत.

डॉ. धुरदरेंना सुनंदा कामावर आल्यापासून चैनच पडत नव्हती. आपल्या वासना शमविण्यासाठी त्यांचे मन तडफडत होते. सुनंदाला रात्रीसाठी थांबवावे म्हणून त्याचे अतोनात प्रयत्न चालू होते आणि एकेदिवशी त्यांना या कामात यशही आले.

' सुनंदा, आज नंबर ३ च्या कॉटवरील पेशंटचा काहीच भरवसा दिसत नाही. त्याला हृदयविकार आहे हे तुला माहीतच आहे. त्याची हृदयक्रिया केव्हा बंद पडेल सांगता येत नाही म्हणून आज रात्रीही त्या पेशंटची काळजी घ्यावी लागेल तेव्हा तू आज रात्रीही थांबूनच जा' डॉ. धुरंदरानी सुचविले.

' पण... ... ... ...... डॉक्टर ' सुनंदा अडखळत म्हणाली.

' पण काय... सुनिल घरी वाट पाहील असंच ना ! अग मी फोन करुन देतो की, आज सुनंदा येऊ शकत नाही'. डॉ. मध्येच बोलले. त्यांनी लगेच फोन केला आणि खुशीतच ते सुनंदाकडे आले.

रात्रीचे अकरा वाजले. तीन नंबरच्या कॉटवर रोगी तडपडत होता. सुनंदा आपल्या रूममध्ये बसली होती. डॉ. धुरंदरेही तिच्यासमोर खुर्चीवर बसलेले होते, त्यांचे लक्ष वारंवार खोलीत अस-लेल्या रिकाम्या कॉटवर जात होते. कॉटवर मखमलीची गादी अंथरली होती आणि तो बिछाना फारच शोभून दिसत होता.

त्याचवेळी डॉ. धुरंदरची पाशवी वृत्ती जागृत झाली. त्यांच्या मनात सैतान संचारला आणि त्यांनी सुनंदावर झडप घालून तिला आपल्या बाहुपाशात घट्ट आवळून कॉटकडे ओढत नेण्याचा ते प्रयत्न करु लागले.

डॉक्टर हे काय......करताहांत तुम्ही ? मी...... मी तुम्हाला असले अश्लील कृत्य करु देणार नाही, सुनंदा ओरडली.

' सुनंदा, तुझ्यासारखी सुंदर तरूणी पाहिल्यावर ज्याच्या वासना उफळून येणार नाहीत त्याला माणूसच म्हणता येणार नाही. मी ...मी आज माझी भूक शांत करणारच........."

आणि त्यांचा जोर अधिकच वाढला. सुनंदा स्वतःला सोडवून घेण्याचा पुष्कळ प्रयत्न करीत होती पण डॉक्टरच्या अचाट राक्षसी शक्ती समोर तिचा काय निभाव लागणार ?

' डॉक्टर ! ......... अय्याऽऽऽऽई !' सुनंदा जोराने ओरडली.

डॉ. धुरंदर मात्र अगदीच खुशीत होते. एवढ्या दिवसापासूनचे रंगविलेले त्यांचे स्वप्न पूर्णपणे साकार झाले होते. त्यांनी तृप्तीने हसत आपल्या ओठावरुन हात फिरविला.

सुनंदा कॉटवर अगदीच निपचित पडली होती. शरीरात हृदय असून मेल्यासारख वाटत होत तिला. तिची सोळा वर्षापासून रक्षण करीत आलेली अमोल ठेव लुटली गेली होती. तिच्या लाखमोलाची अब्रू धुळीस मिळाली होती. तिच्या डोळ्यापुढे भयानक अंधार उभा राहिला. आपण भयानक दरीत कोसळत आहोत असेच वाटले तिला आणि पुढचे घाणेरडे तिरस्कारपूर्वक जीवन जगण्यापेक्षा मरणच बरे, असा मनाशी निर्धार करुन ती उठली आणि औषध ठेवण्याच्या कपाटाजवळ गेली आजूबाजूला नीटपणे न्याहळून घतले आणि कोणीच नसल्याची खात्री झाल्यावर कपाटातून 'POISON' ही अक्षरे असलेली बाटली काढली व क्षणातच तिने ते विष प्राशन केले आणि कायमची जगाला सोडून गेली.

सुनंदा गेल्यापासूनच डॉ. धुरंदरचा सूड घेण्याविषयी सुनिलचे मन तडफडत होते. सूड कसा घ्यायचा या विचारांनी त्याचे मस्तिष्क भणाणून गेल होते. सतत आठ–दहा दिवसांच्या अनेक विचारांमुळे त्याने आज डॉ. धुरंदरचा खन करायचा ठरविले आणि हातात धारदार सूरा घेऊन त्यानेच त्याचा खून केला. खुन केला म्हणण्यापेक्षा आपल्या वहिणीच्या आत्महत्येचा सूड घतला.

पोलिसांनी त्याच्या हातात हातकड्या घालून त्याला जेलर समोर घेऊन गेले. आता निकाल लागायचा होता, खून..... की. ...सूड ?

# जीवनात माझ्या...,

**श्रीपाद वैद्य**
T. Y. B. A.

जीवनात येतांना तू माझ्या ॥ धृ ॥
पांघर चांदण्याची शीतलता,
रातराणी अन् मोगऱ्याचा सुवास
बरोबर आण.........
जीवनात येतांना तू माझ्या ॥ १ ॥
खळखळत्या नदीचं संगीत
पक्ष्यांच्या किलबिलाटीचे शद्ब,
बरोबर आण.........
जीवनात येतांना तू माझ्या ॥ २ ॥
लाजाळू कधी लाज लाजाळूच्या झाडासारखं
कधी ताप समईतल्या ज्योतीसारखं
जीवनात माझ्या.........
जीवनात येतांना तू माझ्या ॥ ३ ॥

# गुपीत

**विजयकुमार म. बाविस्कर**
F. Y. B. Com.

डोळ्यातील इशारे ।
डोळ्यातच मालवले ॥
शद्ब ते ओठांतील ।
कसे ओठीच विरले ॥
भाव सर्व मनातील ।
हृदयात लुप्त झाले ॥
सुखावल्या चेहऱ्यास ।
दुःखानी या झाकोळले ॥
कोडे आपुल्या प्रेमाचे ।
फक्त कोडेच राहिले ॥
आजच्या क्षणालाही ।
गुपीत गुपीतच राहिले ॥

# पिंपळ

**कु. स्वाती हिरुरकर**
XI–F (Sc.)

लहान मुलाने खेळतांना कापसाचे तुकडे इतस्ततः भिरकावून द्यावेत, त्या प्रमाणें ढग निळ्याशार आकाशात इकडे तिकडे विखरुन तरंगत होते. पक्षी घरट्यांकडे परतत होते. शहरातल्या गजबजलेल्या संध्ये सारखीच ही संध्याकाळ, पण, आज एक उदासवाण पण घऊन आली होती. तात्या उगीचच अंगणात हिंडत होते !! संध्याकाळच्या प्रशांत कातर वेळेचा गुण काय आहे कुणास ठाऊक ! त्यावेळी नेमक्या गतजीवनाच्या आठवणी तरळून जातात. तात्या देखील आपल्या विविध रंगी गतायुष्याचे सिंहावलोकन करण्यात अगदी तल्लीन झाले होते. तात्यांच्या नजरेसमोर त्यांचा जीवन पट उलगडत असतांनाच त्यांची दृष्टी एका ठिकाणी स्थिरावली.

त्यांचा चौसोपी वाडा त्यांच्या डोळ्यांसमोर उभा होता. वाड्यात अनेक झाडे होती. आंबा, लिंबू, वड, औदुंबर आणि हो पिंपळ सुद्धा !! झाडांच्या दाटीने आवारात एक प्रकारची गूढ शांतता नांदत होती. पिंपळाच्या झाडा शेजारी झोपाळा होता. अप्पांना, तात्यांच्या वडिलांना झोपाळ्याची आणि पिंपळाची भारी हौस. त्यांनी अंगणात अनाहूतपणे उगवलेल्या इवल्याशा पिंपळाला जगवलं होतं ! तेच एवढसं रोपटं आज त्यांना सावली देणारा प्रचंड वृक्ष बनलं होत. अप्पांचा त्याच्यावर भारी जीव संध्याकाळी त्यांना त्या वृक्षराजाकडून वारा घालून घेत झोपाळ्यावर बसायला अतिशय आवडे. त्यावेळी त्यांना कोणीही जवळ आलेले चालत नसे. तासन्‌तास ते तिथेच बसून राहात.

अप्पांप्रमाणे तात्यांचाही पिंपळावर भारी जीव. मोडकळीला आलेल्या वाड्याच्या दुरुस्ती करता पिंपळाच्या काही फांद्या मध्ये येत होत्या. त्या तोडतांना तात्यांच्या अंतःकरणात कोण कालवा कालव झाली होती. पुढे अप्पा वारले. वाड्यावर सर्वस्वी तात्यांचा हक्क होता. पिंपळाविषयीची एक प्रकारची आदरयुक्त प्रेमभावना त्यांच्या मनात वास करत होती. त्या पिंपळाशीच त्यांनी लहानपणी आपली 'गुपितं' उघडी केली होती. वडिल व हाता-तोंडाशी आलेल्या एकुलत्या एक पुत्राच्या निधनाने सर्वस्वी कोलमडले असतांना त्यांना आधार दिला तो याच पिंपळाने. आपल्या पहिल्या कवितेचे शब्द तात्यांनी या रसिक पिंपळालाच प्रथम ऐकवले होते. त्यांनी पिंपळाला आपल्या साऱ्या व्यथा सांगितल्या होत्या. तात्यांच्या आयुष्यातले सारे चढ उतार, खाच खळगे एकट्या पिंपळाला माहीत होते. आपली पाने सळसळवून तो तात्यांना धीर देत राही. त्यांच्या प्रमाणेच हा पिंपळही एकाकी आणि तितकाच मनस्वी होता. तात्या व पिंपळ जणू एकरुप झाले होते.

तात्या शासनाची नोकरी करीत असत. त्यांची बदली वरणग वहून धुळ्याला झाली. वाड्याची देखभाल करण्यासाठी कोणीच नसल्याने तात्यांनी तो वाडा विकावयाचे ठरवले वाडा विकला गेला त्या वेळी ते घर सोडून जाणे तात्यांना फार कठीण गेले. ज्या पिंपळापांशी हृदयांची कवाडे खुली केली, त्या पिंपळाच्या सावलीला सोडून जाणे, तात्यांच्या जिवावर आले होते. त्यांची पाऊलेमागे – –मागे रेंगाळत होती.

पांच वर्षांनी शाळेच्या कामानिमित्त ते वरणगावला गेले, तेंव्हा सहज वाडा बघायला गेले. सारे आवार उजाड झाले होते लिंबू, आंबा यांचा तर ठावठिकाणाही दिसत नव्हता. वाडा भकास, उदास वाटत होता. जीर्ण पिंपळ कोपऱ्यात आपल्या ओक्याबोक्या फांद्या सावरत अपराध्यासारखा कसा-बसा उभा होता. त्याच्या पानांची पूर्वीची ती कानांना सुखावणारी रेशमी सळसळ आता ऐकू येत नव्हती. त्यांची नजर वर गेली, त्या वृद्ध वृक्ष–राजाच्या निष्पर्ण फांद्यांवर अद्यापही दोन, तीन घरटी उभी होती. त्या पिंपळाच्यां पूर्वीच्या हिरव्या वैभवाचे गोडस रुप तात्यांना आठवले. कुठे तो हिरवट पिवळट पानांचा संभार सांभाळणारा डौलदार पिंपळ अन् कुठे हा दीन-एकांडा–जीर्ण – शुष्क पिंपळ ! आपल्या जिवलगाची ती दुर्दशा पाहुन तात्यांच्या डोळयात न कळत अश्रु तरळले ! ते आणखीन थोडावेळ तेथे रेंगळले व परत निघाले त्यांची पावले वळली तोच कड्--कड् आवाज झाला,त त्यांनी मागे वळुन पाहिले तो विराट वृक्ष उन्मळून पडला होता. त्याच बरोबर तो झोपाळा व वाडाही! ती पाखरांची घरटी तर भुईसपाट झाली होती. त्या पाखरांचा केविलवाणा आक्रोश तात्यांना ऐकवेना ! शक्य तेवढया लवकर तेथून निघून – – दूर जायचा प्रयत्न ते करत होते. पण मन – – तर तिथेच रेंगाळत होते.

आज तात्या शहरात दोन खोल्यांच्या ब्लॉक मध्ये अशांत वातावरणात पेन्शनरचे जीवन जगत होते. त्यांच्या पत्नी पूर्वीच निवर्तलेल्या व त्यामुळे एकाकी झालेले तात्या पुस्तकांच्या मूकसह–वासात आला दिवस पुढे ढकलीत होते.

वाऱ्याच्या एका मंद झुळुकीने त्यांना भानावर आणले. तो वाऱ्याचा स्पर्श, तो गंध, ती मुलायम झुळुक तात्यांना ओळखीची वाटली. त्यांनी सहज वळून पाहिले, शेजाऱ्यांच्या दारी उभा असलेला पिंपळ त्यांच्याकडे पाहून हसत होता, दिलासा देत होता ! तात्यांना त्यांचा पिंपळ सापडला होता, त्यांचा मित्र खूप वर्षानंतर त्यांना दिसत होता, तात्यांच्या कापऱ्या ओठांतून शब्द घरंगळले---पुढचे शब्द गालावर ओघळलेल्या उष्ण अश्रूत विरुन गेले !!

कित्येक जन्मांचा हा ऋणानुबंध  
तुटणार आहे थोडाच !  
रेशीम रज्जूंच्या या  
निर्मळ गाठी कां कधी उकलतात ?  
आजवर दिलेल्या साथीला स्मरून  
टिकवशील ना आपला स्नेह !  
आहे प्रवास थोडासा  
नको करुस मनोभंग.

## 'वरा' चा केला राव

एम. के खारे  
S. Y. B. Sc.

माप ओलांडून लाजत आली  
घरची साक्षात लक्ष्मी झाली  
पूजे नंतर ठेवल नांव  
नांव घे म्हणत जमल गांव  
चाचरत घाबरत घेताना नांव  
वधूनं 'वरा' चा केला 'राव !'

**कला !**

'कला ही मानवी जीवनाचे नुसते प्रतिबिंबच दाखवित नाही तर त्याला वळण देते;' ती मानवी मनाची नुसती करमणूकच करीत नाही; तर त्याला उद्बोधित करते; ती मानवी जीवन नुसते मंडितच करीत नाही तर अभिनव ध्येयांच्या प्रभावाने ते आमूलाग्र बदलून टाकते, कला ही मानवी जीवनाची सहचरी आहे.

# भगवान बाहुबली !

भानुदास साळुंखे  
एम. ए. (ज्युनियर)

२२ फेब्रुवारी १९८१ म्हणजे भगवान बाहुबली. 'गोमटेश्वर' यांचा सहस्राद्बी महोत्सव आणि महा–मस्तकाभिषेक सोहळयाची पर्वणी !
हा दिवस म्हणजे भारताच्या सांस्कृतिक जीवनातील आत्यंतिक आनंदाचा दिवस. साऱ्या जगाला ललाम–भूत ठरलेल्या महान तपस्वी, आदरणीय, युगप्रवर्तक, लोकोत्तर धीरोदात्त महापुरुष भगवान बाहुबली (गोमटेश्वर) यांचा सहस्राद्बी महोत्सव आणि महा–मस्तकाभिषेक !!

जगातील आश्चर्यांमध्ये समाविष्ट करण्याजोगी भव्य आणि दिव्य, अति प्रचंड महान कला वैभव असलेली ही बाहुबलींची मूर्ती आहे. बंगलोरहून १३५ कि. मी. अंतरावर असलेल्या गोमटपूर या चिक्क बेट्ट व दोड्ड बेट्ट या दोन टेकड्यांच्या कुशीत वसलेल्या गावा-जवळ सुमारे ४७५ फूट उंचीच्या टेकडीवर, निसर्ग सौंदर्याने नटलेल्या या प्रांतात श्रवणबेळगोळा गावी भगवान बाहुबलींची इतिहास प्रसिद्ध ५७ फूट उंचीची एक भव्य अन् अखंड शिलेतून साकारलेली, चित्ता–कर्षक व नेत्रदीपक मनोहारी मूर्ति डौलात उभी आहे. भगवान बाहुबलींची ही भव्य व प्रसन्न सौंदर्य–पूर्ण मूर्ति म्हणजे त्यांच्या शुद्ध, स्वच्छ, पवित्र, वीतरागी मुद्रेची प्रतिकृती ! ही पाषाणाची मूर्ति असली तरी त्यांच्या चेहऱ्यावरील सूक्ष्मछटा मुर्तीत चित्रित झालेल्या आहेत.

आज कित्येक वर्षापूर्वी जेव्हा पृथ्वी भोगभूमीतून कर्म भूमीत रुपांतरित होत होती, तेव्हा जैन पुराणानुसार ऋषभदेव यांचा जन्म झाला तेच जैनांचे प्रथम तीर्थंकर होत. मानवाला धर्म आणि मोक्षाचा मार्ग दाखविणे हेच त्यांचे जीवित कार्य होते. त्यांना दोन महाराण्या होत्या. त्यापैकी एकीला ९९ पुत्र आणि एक कन्या, तर दुसरीला एक पुत्र आणि एक कन्या होते. शेवटी त्यांना या क्षणभंगूर जीवनाचा वीट आला आणि आपले राज्य पुत्रांना वाटून दिले. या पैकी अयोध्येचे राज्य भरतास तर पोदनापुरचे राज्य बाहुबलीस दिले. इतरांनाही अशीच वाटणी करुन ऋषभदेव स्वतः मुनी झालेत.

कालांतराने भरताने चक्रवर्ती बनण्याचा निर्धार केला व दिग्विजयासाठी निघाला. जिथे जिथे तो जाई तो तो राजा शरणागती पत्करुन त्याचे अधिपत्य मान्य करीत असे. भरताने सर्व भावांकडेही दूत पाठविले. भावांना हा संदेश ऐकून दीक्षा घेतली. बाहुबलीस मात्र या संदेशाने संताप आला व त्यांनी युद्धाचा निर्णय घेतला. दोघांचे सैन्य सज्ज झाले. पण प्रधानांच्या सल्याने असे ठरले की, निर्दोष सैनिकांच्या रक्ताचे पाट वाहवत बसण्या ऐवजी दोन्ही भावांनी आपापसातच युद्ध खेळावे आणि काय तो निर्णय घ्यावा. याप्रमाणे दोघे भाऊ द्वंद्व युद्धाला सज्ज झाले. नेत्रयुद्ध, जलयुद्ध व मल्लयुद्ध यात बाहुबलीने भरताचा पूर्ण पराभव केला. शेवटी मात्र पराभूत झालेल्या भरताने बाहुबलीवर चक्र सोडले, पण बाहुबली त्यांच्याच वंशातला असल्यामुळे बाहुबलीला त्या चक्राने फक्त प्रदक्षिणा घालून ते थांबले. ही घटनाच बाहुबलीच्या जीवनपरिवर्तनाला कारणीभूत ठरली. सख्खा भाऊही सत्तेच्या लालसेने आपल्याला जीवे मारण्यास मागेपुढे पहात नाही ? हे पाहून बाहुबलीने सर्व त्यागून घोर तपश्चर्येसाठी दूर अरण्यात निघून गेला. भरताला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. त्याने भावाची क्षमा मागितली पण त्याचा काही एक परिणाम बाहुबलीवर झाला नाही.

बाहुबलीने एवढी घोर तपश्चर्या आरंभिली की, हिंस्र पशू-प्राणी त्यांच्या चरणाजवळ येऊन बसू लागले सर्प, वेली इ. ही त्यांच्या शरीराशी खेळू लागले.

उन, वादळ वारा, पर्जन्यवृष्टी या सर्वांना तोंड देत बाहुबली आपल्या तपश्चर्येत मग्न झाले. शेवटी खरे ज्ञान मिळवून बाहुबलींना मोक्षप्राप्ती झाली. हेच भगवान बाहुबली जैन धर्माच्या ६३ महान तेजस्वी, प्रतिभासंपन्न तपस्वी महापुरूषांपैकी एक होत.

या मूर्तीचा इतिहासही मनोरंजक आहे. गंगाघाटचा राजा राचमाळ याचा चामुण्डराय हा सेनापती होता. तो अत्यन्त शूर व विद्वान होता, तसाच मातृभक्तही होता. असे सांगतात की, आईच्या इच्छेवरुनच भरत चक्रवर्तीने बनवलेल्या पोदनापुरातील भगवान बाहुबलींच्या सुवर्णमूर्तीच्या दर्शनास चामुण्डराय निघाले. रस्त्यात श्रवणबेळगोळ येथ मुक्काम केला. त्याच रात्री पद्मावतीदेवीने त्याच्या स्वप्नात येऊन सांगितले की, तुझ्या मातृभक्तिमुळे व ईश्वरभक्ति-मुळे तुला इथेच भगवान बाहुबलींचे दर्शन होईल. पद्मावतीदेवीच्या सांगण्याप्रमाणे चामुण्डरायाने सकाळी उठून समोरच्या प्रचंड पर्वतावर एक सुवर्ण-बाण सोडला, आणि आश्चर्य म्हणजे समोरील पर्वतावर चमत्कार घडून आला. व गोमेटेश्वरांचे म्हणजेच बाहु-बलींचे मस्तक दिसू लागले आणि त्यानंतर अरिष्टनेमा आणि त्याचे सहकारी यांनी मिळून ही प्रचंड मूर्ती साकार केला. या शिल्पकारांनी मूर्तित साक्षात प्राण ओतले इ. स. ९८१ साली ही मूर्ति पूर्ण झाल्याचा उल्लेख यतो हिला तयार व्हायला जवळ जवळ १ वर्षाचा कालावधी लागला असावा आणि तयार झाल्यानंतर १३ मार्च ९८१ रोजी या भव्य मूर्तिवर श्री. चामुण्डरायाने अभिषेक केला. त्याप्रमाणे दर १२ वर्षांनी बाहुबलींचा महामस्तकाभिषेक करण्याची परंपरा आजतागायत सुरु आहे.

२२ फेब्रुवारी १९८१ या दिवशी या मूर्तीस १००० वर्षे पूर्ण होत असल्याकारणानेच हा सहस्राब्दी महोत्सव आणि महामस्तकाभिषेक सोहळा यंदा साजरा करण्यात आला. गेली हजार वर्षे शांतता, त्याग, अहिंसा आणि मुक्तिचा संदेश देत उभ्या असलेल्या दिगंबर जैन धर्मियांचे श्रद्धास्थान असलेल्या गोमटेश्वराचा महामस्तकाभिषेक सोहळा लाखो भाविकांच्या उपस्थितीत, घंटानादात आणि मंत्र घोषांच्या पवित्र वातावरणात २२ फेब्रुवारी १९८१ रोजी संपन्न झाला सकाळी ६ वाजता पवित्रजल भरलेल्या १००८ कलशांचा विधिपूर्वक प्रतिष्ठापना केल्यानंतर या महामस्तकाभिषेकाच्या सोहळ्यास प्रारंभ झाला. या वेळी तर 'बाहुबली भगवान की जय' अशा जयजयकाराने सारे वातावरण दणाणून उठले.

या दिव्य मूर्तिचे धार्मिक दृष्याचे महत्व नाही, तर या जगप्रसिद्ध मूर्तिच्या चरणाशी उत्कीर्ण असलेला मराठीचा सर्वात प्राचीन शिलालेख "श्री. चामुण्डराये करवियले," "श्री गंगाराम सुत्ताले करवियले," आम्हा महाराष्ट्रीयांना अत्यंत भूषणावह आहे हेच मराठीचे पहिले वाक्य म्हणून प्रसिद्ध आहे. म्हणजेच गोमटेश्वर भगवान बाहुबलींच्या मूर्तिइतकीच आमची मायबोली फार वर्षापूर्वीची प्रचारात आहे. अशा प्रकारे भाषिक दृष्टचाही या मूर्तिला फार मोल आहे.

आपली भारतभूमी म्हणजे महान पुरूषांची जन्मभूमी आहे. साक्षात परमेश्वरांनी आपल्या भूमातेवर जन्म घेऊन आपली शिकवण सामान्यांच्या मनावर बिंब-विली. राम, कृष्ण, गौतमबुद्ध, महावीर, येशूख्रिस्त अशा या थोरांची जन्मभूमी आहे. यांच्या इतिहासाकडे डोकावून पाहिले म्हणजे भारतियांचे मस्तक झुकल्या-शिवाय रहात नाही. मग तो कोणत्याही धर्माचा, पंथाचा असा. त्याचप्रमाणे भगवान बाहुबलींच्या मूर्तिकडे पाहून तिचा पूर्वेतिहास आठवला म्हणजे फक्त तिची भव्यताच न दिसता त्यांनी केलेले त्याग, त्यातून मिळणारी शिकवण, तत्वज्ञान आपल्या मनः-चक्षूसमोर येते. त्यांच्या चेहऱ्यावरील रेखीव भाव पाहून कलुषित हृदय असणाऱ्या लोकांनाही जीवनात श्रद्धा येते. या सोहळ्याने असे दाखवून दिले आहे की, हे जैन धर्मियांचे श्रद्धास्थान असले तरी भारतातून कानाकोपऱ्यातुन लाखो भाविक या ठिकाणी नतमस्तक झालेत. विविधतेत एकता असल्याने भारतीय संस्कृती आज दृढतेने टिकून आहे आहे. आत्मोन्नती हे भारतीय संस्कृतीचे ध्येय आहे. भारतीय तत्वज्ञानाचे सार आहे. नव्हे ही भारताने जगाला दिलेला महान शिकवण आहे; आणि त्यातलेच एक प्रतीक म्हणजे गोमटेश्वर भगवान बाहुबली हे होत.

अशा या तेजोमय दैवताम शतशः प्रणाम !!!

# हुंडा एक समस्या

इंगळे व्ही. डी.
S. Y. B. Sc.

हुंडा ! हुंडा !! हुंडा !!! पहावा तिकडे हुंडाच! जळी स्थळी, काष्ठी, पाषाणी देव असतो म्हणतात. तसाच हुंडाही बहुतेक सर्व समाजांमधून सर्व राज्या-मधून आढळून येतो. गरीबांपासून श्रीमंतापर्यन्त त्याचे प्रस्थ कमी अधिक प्रमाणात व विभिन्न स्वरुपाने दिसून येते पैसा-सोने या प्रकारचा उघड स्वरूपाचा हुंडा जसा आहे तसाच अन्य प्रकारच्या देण्याघेण्या-तून, सप्रेम भेटीतूनही हुंडयाचे प्रच्छन्न स्वरुप आढळते. ह्या हुंडयामुळे एखाद्याचे घर एकदम उजाड बनते, उध्वस्त बनते तर दुसऱ्याचे भरले जाते. एखाद्याच्या सर्वस्वाची होळी होते. व त्यावर दुसऱ्याच्या स्वार्थाची पोळी भाजली जाते. समता, न्यायबुद्धी, मानवता धर्म इ. सर्व मूल्ये पायदळी तुडविणारा हा महा-भयंकर हुंडारूपी राक्षस दिवसेंदिवस अधिक अक्राळ-विक्राळ रूप धारण करीत आहे. या देशात प्रत्यहा किती तरी निष्पाप कन्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. कित्येकींचा विहिरीत कडेलोट होत आहे. त्यापेक्षाही कितो तरी पटाने मानसिक दृष्टचा जळत आहेत.

मुलगी जन्माला आल्यापासूनच तिच्या नशिबी उपेक्षेचा वाटा येतो. त्या निरागस बालिकेकडेही एखादी स्कॉयलॅब कोसळली की काय अशा नजरेने पाहिले जाते. एव्हढच नव्हे तर तिच्या संगोपनावरही त्याचा परिणाम होतो. जगाचे ज्ञान होण्यापूर्वीच हुंडयासाठी आईवडिलांना आपण छळणारे त्यांचे जणू शत्रू आहात असे तिला वाटू लागते. त्यामुळे मानसिक दृष्टचा ती कमकुवत बनते.

बरं, शिक्षणामुळे तरी या हुंडयाची तीव्रता कमी होईल म्हणायचे तर तेही घडत नाही. मुलीला शिकवून हुंडा द्यावाच लागतो. किंबहुना शिक्षणाच्या मानाने जणू काय तो वाढता एज्युकेशन टॅक्सच आहे! मुलांच्या शिक्षणाप्रमाणे त्यांचे हुंडय चे "दर" ही ठरुन गेल्यासारखे दिसतात. साधा शेता काम करणारा असला तरी तो १० तोळ्याखाली जत नाही. ग्रॅज्युएटचे तर विचारूच नका. २०-२२ तोळे तर चुकतच नाही. डॉक्टर व इंजिनियर यांचे तर विचारूच नका. ते केवळ शिक्षणाचाच काय पण आपल्या जन्मापासूनचाच एकूणखर्च आईवडिलांना 'वसूल' करुन देतात! खरोखरच आमचे शिक्षण कुचकामी आहे हे यातून सिद्ध होत नाही काय? सुशिक्षित म्हणविणारेही माणुसकीला किती पारखे होताना दिसतात.

आता मध्यमवर्गीय लोक आपल्याजवळ जी काय वडीलोपार्जीत चालत आलेली संपत्ती, शेती आहे ता विकून आपल्या मुलीची लग्ने करीत आहेत. पुढे येणारे त्यांचा मुले या संपत्तीला जवळ जवळ पारखेच झालेले असतात. कारण जी काय स्थावर मालमत्ता असते ती वडिलांना समाजाच्या या वाईट चालीमुळे विकून टाकावी लागलेली असते व त्यामुळे जवळ जवळ उपासमारीची पाळी येते तरी याचा तरुणांनी विचार करुन समाजाची हा अनिष्ट प्रथा बदलल्यास मदत करावी व ह्या प्रथेवर बहिष्कार टाकावा.

मुलीचा विवाह झाला की, आईवडिलांना ती परकी झाली असे मानले जाते. पण मायेचे मन दगडाचे होऊ शकत नाही कारण तिचीमाहेरची साडीचोळीची आस सुटत नाही आई-वडील मुलीला काही ना काही

देऊ इच्छितात. त्या देण्याघेण्याला वात्सल्याचा व स्नेहाचा गंध असतो. पण साडी–चोळीने मुलीचे मन तृप्त झाले तरी सासरच्या लोकांना ते पटत नाही. वास्तविक पहाता आईवडील आपल्या पोटाचा गोळाच त्यांना देतात. पण सासरच्या मंडळींना रोख हुंड्याव्यतिरिक्त सोफासेट, टेपरेकॉर्डर टी. व्ही. इ. हवेच असते.

विवाहात आईवडिलांना जे शक्य असेल ते आपल्या लाडक्या मुलीला ते देतातच किंबहुना कित्येकदा ऐपतीपेक्षा सुद्धा जास्त देतात. हेतू एकच "ज्या मुलीला १६वर्षे हृदयाशी धरले तिला सासरी काहीही त्रास होऊ नये. पण समाजात अगदी त्याच्या विरुद्ध चालत आले आहे. समाजात फक्त हाच प्रश्न पडला आहे की, विवाहात देण्यात येणाऱ्या द्रव्यावर मर्यादा कशी घालावी. वर पक्षाने वधुपक्षाला कमीत कमी झळ कशी पोहचेल ते पहावे म्हणजे वधुपक्षावर कर्ज वाढण्याची वेळ येणार नाही. वर पक्षाने धनाला महत्व न देता घरात येणाऱ्या लक्ष्मीला 'सुनेला' महत्व द्यावे. सर्वात अनमोल हिरा मुलीच्या रूपाने वधुपक्षाने दिला आहे. त्याचे मोल व्हावे, गुणांना किंमत द्यावी. शिवाय वरपक्षाच्या घरात देखील मुलगी असते. हा प्रसंग त्यांच्यावर सुद्धा येणार असतोच.

या प्रथेला कारणीभूत आहे स्वतःला समाजसेवक म्हणवणारा व्यापारी वर्ग, मंत्रीवर्ग. अधिकारी वर्ग व दोन नंबरवाले, काळ्या मार्गाने पैसे कमवणारे ह्या लोकांजवळ पैसा हा सतत वाढत आहे. त्यात काही ब्लॅकमेलचा माल सुद्धा असतो. व ही ब्लॅक मनी निदान हुंडा या पद्धत ने तरी आपणाला व्हाईट करता येईल असे समजून मुलीला सर्व प्रकारच्या चैनीच्या, मनोरंजनाच्या वस्तू आंदण म्हणून देत असतात. तिला आयुष्यभर पुरेल एवढे पैसे देतात. त्याच्या तुलनेने विचार केला तर गरीबांनी एवढे पैसे कोठून आणावे? आपल्या वर्तनाचा बहुजनांवर परिणाम होऊन त्यांना आपण नेस्तनाबूत करीत आहोत याचा विचार या धनिकांनी नको का करायला ?

आता सध्या या प्रथेवर बंदी घालण्यासाठी काही समाज धुरीणांनी प्रयत्न केला होता पण त्यात तरुणांनी भागच घेतला नाही त्यामुळे ते प्रयत्नही वांझोटे ठरले.

हुंडा ही प्रथा मोडण्याला सरकार काही एक करू शकणार नाही. कारण या प्रथेवर जरी सरकारने आळा अथवा बंदी बसविली तरी मागल्या दाराने हे लिलाव समाजात चालणारच. घ्यायचे म्हटले म्हणजे हात चांगले लांबतात व लगेच द्यायची पाळी आली म्हणजे जणू हात थंडीने गारठून जातात तसा प्रत्येक व्यक्तीने, तरुणाने विचार करायला हवा व ही प्रथा एकदम बंदच करायला हवी. दैनंदिन जीवनात समस्या आल्या म्हणजे त्या नेहमी सोडवण्याचा आपण प्रयत्न करीत असतो. त्यासाठी आपणास काहीही, कितीही कष्ट पडले तरी आपण तयार असतो. त्याप्रमाणे हुंडा प्रथा सुद्धा आपल्या समाजावर एक प्रकारची आपत्तीच आला आहे. ती समस्या सोडवणे फक्त तरूणांच्याच हातात आहे.

प्रत्येक तरूणाने ठरवायला हवे की; मनगटात इतकी हिम्मत आहे की, लाथ मारीन तिथे पाणी काढीन. पण सासरच्या पैशांवर आणि सासरकडच्या भिकेवर जगणार नाही. यानेच समाजाला लागलेले हुंडा नावाचे कीड निघेल. आजच्या तरूण पिढीने सोन्याचा भाव व महागाईच्या परिस्थितीचा विचार करून हुंडा पद्धतीवर बंदी घालायला हवी. तरूणांनी सामुहिक-पणे हुंडा न घेण्याची प्रतिज्ञा करावी. आईवडिलांना ते पटवून द्यायला हवे की विवाह हा पवित्र संस्कार आहे, खरेदी विक्रीचा बाजार नव्हे.

खरे प्रेमविवाह हुंड्याला आळा घालू शकतील म्हणून तरूणांनी आपला जीवनसाथी स्वतःच निवडायला हवा. हुंडा, मानपान, रूसणं फुगणी यासारख्या जुनाट प्रथांना चाट द्यायला हवी, योग्य संस्कार तेवढेच शिल्लक ठेवावेत.

---

# आसाम— एक ज्वलंत प्रश्न

नंदकुमार भारंबे
ज्यु. एम. ए.

१९७९ च्या नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या आसाम आंदोलनाकडे संपूर्ण भारतीयांचे लक्ष वेधले गेले आहे. आधीपासूनच आसाम एकाकी पडल्यासारखा, डोंगराळ, आदिवासींची वस्ती असलेला व म्हणून मागासलेला राहिला. परंतु खनिज व नैसर्गिक संपत्तीने भरलेला हा प्रदेश संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. असे हे राज्य वास्तविक सामाजिक व आर्थिक दृष्टया प्रगत व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शांत असणे आवश्यक आहे. पण आज ते धुमसत आहे, प्रक्षोभाने पेटले आहे भारताच्या एकूण पेट्रोल उत्पादनापैकी निम्मे पेट्रोल आसाममध्ये मिळते. डिझेल बरोबर ८३ टक्के चहाचेही उत्पादन होते. त्याचबरोबर ज्यूट, लाकूड, फ्लायवूड, टिंबर यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. त्यामूळे भारताच्या आर्थिक व्यवस्थेत आसामने फार मोलाची भर टाकली आहे.

अलिकडेच आसामात तीव्र स्वरुपाच्या आंदोलनास सुरुवात झाली कारण परकीय नागरिकांच्या घूसखोरीमुळे आसामातील स्थानिक जनता ही अल्पसंख्यां होईलव परकिय नागरिक बहुसंख्य होतील अशी रास्त भीती तेथील नागरिकांनां वाटत आहे आणि हाच या आंदोलनाचा मुख्य विषय आहे. त्यात भर म्हणजे काही ख्रिश्चन मिशनरी व काही जातीय मुस्लीम यांनी फुटीर वृत्तीस भडकावून देण्याचे कार्य पध्दतशीररित्या कधीपासून चालविले आहे. या सर्व बाबींकडे सरकारने प्रथमपासूनच दुर्लक्ष केले. त्याचा परिणाम आज आसाम आंदोलनात झालेला दिसून येतो. आज आसामात या परकीय नागरिकांचे..घूस-खोरीचे प्रमाण इतके वाढले आहे की तेथील मूळ रहिवाशांना आपल्या मातृभूमीपासून परांगदा होण्याची वेळ आली आहे. त्यातच काही परकीय शक्तींनी संपूर्ण पूर्वभाग भारतापासून अलग तोडण्याचा कट पद्धतशीरपणे केला असल्याचा संशय येतो. कारण आज सुमारे ४० ते ५० लाख परकीय नागरिक आसामात घुसले आहेत. त्यात अधिक संख्या बांगला देशातील नागरिकांची आहे. शिवाय काही ब्रम्हदेश व नेपाळ येथीलही आहे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी जनतेच्या सेवेच्या नावाखाली आपल्या धर्माचा प्रसार करून आदिवासी व मागासलेल्या लोकांच्या मनात फुटीरवृत्ती निर्माण केली आहे. मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, अरुणाचल, नागालंड इ प्रदेशात या फुटीरवृत्तीचा संसर्ग पसरत आहे.

आसामची समस्या ही प्रादेशिक समस्या नसून ती एक राष्ट्रीय समस्या आहे. त्यासाठी सर्व जनतेचे, पक्षांचे, नेत्यांचे सहकार्य घेऊन तो प्रश्न सहानुभूती-पूर्वक हाताळला पाहिजे. त्यात विलंब सर्वनाशास कारणीभूत होईल. नाहीतर आसाम आपल्या हातानेच आपण गमावल्यासारखे होईल.

परकीय नागरिक हुडकून त्यांना हद्दपार करणे ही प्रमुख मागणी आसामी जनता करीत आहे. जो या देशाचा नागरिक नाही त्यास मतदानाचा हक्क नसावा. त्यासाठी आसाम आंदोलन होत असून अखिल आसाम गणसंग्राम परिषद व अखिल आसाम विद्यार्थी संघटना या आंदोलनाचे संचालन करीत आहे. त्या संघटना तीन D ची मागणी करीत आहेत. (1) Detection परकीयांची ओळख पटविणे. (2) Deletion मतदार याद्यांतून परकीयांचे नाव खोडून काढणे (3) Deportion हद्दपार करणे. १९५१ च्या राष्ट्रीय नागरिक नोंदीतून परदेशी

नागरिकांची ओळख पटविणे व १९५२ च्या मतदार यादीतून परकियांना वगळणे.

१९५० च्या शेवटी कै. पंडित नेहरू व लियाकतअली यांच्यात जो करार झाला त्यास संसदेने मान्यता दिली होती. या करारानुसार १ जानेवारी १९५१ पासून ' दोन्ही देशात ( भारत व पूर्व पाकिस्थान ) जो प्रवेश करील तो परकीय नागरिक गणला जाईल. त्यानंतर National Register of citizens तयार केले गेले. तेच एकमेव डाक्यूमेंट ( आधारभूत साधन ) आहे. त्या आधारावर परकीय नागरिक हुडकून काढले जावेत या मागणीविषयीच सरकार व विद्यार्थी संघटना यांच्यात संघर्ष आहे. अर्थात त्यांच्या इतरही मागण्या आहेत. त्या मतदारांना ओळखपत्र देणे, मतदान याद्यातून परकियांची नावे कमी करणे, सीमाबंदी करणे इ.

सरकार १९५१ हे वर्ष परकीय नागरिक शोधून काढण्यासाठी आधारभूत वर्ष मानण्यास तयार नाही. कारण तेव्हापासून आलेले परकीय नागरिक आज आसामात पूर्ण स्थायिक झालेले आहेत. मानवतच्या दृष्टीकोनातून त्यांना हद्दपार करण अयोग्य आहे अशी सरकारची भूमिका आहे. सरकार १९७१ हे वर्ष आधारभूत मानण्यास तयार असून २५ मार्च १९७१ नंतर आसामात आलेल्या परकीय नागरिकांना शोधण्याचे कार्य २४ ऑक्टोबर ८० रोजी प्रारंभ केले. अशा नागरिकांना ' भारत छोडो ' ची नोटीस देण्यात येईल. असे सरकारने जाहीर केले आहे.

परंतु १९७१ हे वर्ष विद्यार्थी संघटनेला मान्य न झाल्यामुळे त्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. जो शांततापूर्ण व अहिंसक आहे. आपल्या मागण्या न्याय्य व योग्य आहेत हे पटवून देण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला आहे. विद्यार्थी सघटनेने वेळोवेळी दिलेले बंद, घेराव, बहिष्कार, निदर्शने सत्याग्रह यास आसाम जनतेकडून शभर टक्के प्रतिसाद मिळत आहे बँका सरकारी कचेऱ्या, तार पोस्ट, पेट्रोल कारखाने इ. सर्व क्षेत्रात उत्तम प्रतिसाद मिळत आहे. परंतु सरकारने अत्यंत कठोर व दडपशाहीचे धोरण स्विकारले.

लाखो आसामींनी सरकारी कचेऱ्या समोर शांततापूर्ण व अहिंसक मार्गाने केलेल्या निदर्शकांवरच, उलट गोळीबार, लाठीहल्ला, अश्रूधुर, धरपकड या हिंसक मार्गाने आंदोलन चिरडुन टाकण्याचा प्रयत्न होत आहे. त्यात कित्येक लोक मरण पावले जखमींची संख्या तर खूपच झाली. सरकार एवढ्यावर न थांबता २३ डिसेंबर ला आसामात वृत्तपत्रावर सेंसारशीप लागू केली जेणेकरून त्यांचा बुलंद आवाज इतरांना ऐकू येवू नये, सत्यस्थिती समजू नये असे सरकारला वाटते की काय कळत नाही. दिल्ली येथे आसाम समस्येवर बोलतांना ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त डॉ. विरेंद्रकुमार भट्टाचार्य म्हणतात " आसामात हिंसेचे थैमान सरकारने घातले आहे. लाठीमार, गोळीबार राष्ट्रीय सुरक्षा अध्यादेश, वृत्तपत्र नियंत्रण या मार्गाने सरकार आंदोलन चिरडून टाकीत आहे. सशस्त्र जवान निशस्त्र आंदोलकांवर गोळीबार करीत आहे. लहानमुले, स्त्रिया, म्हातारे विव्हळतांना दिसत आहेत. काहींना लाठी हल्याने अपंगत्व आले आहे, "

४ जानेवारी १९८१ रोजी Assam Crises वर परिसंवाद घेतला. त्यात काही मतांत एक वाक्यता आढळते. आसाम प्रश्न हा राष्ट्रीय व सुरक्षिततेचा आहे हे आंदोलन स्वकियाविरुद्ध नसून परकियांविरुद्ध आहे, भारताची राज्यघटना व नागरिकत्व निश्चित करणारे कायद्यानुसार परकिय शोधले पाहिजे, परकिय घुसखोरांना शोधण्याचे कार्य तावडतोब हाती घेतले गेले पाहिजे. परकियांची नावे गाळून मतदार याद्या शुद्ध करुन सुधारित मतयादीप्रमाणे लोकसभेच्या निवडणूका घेण्यात याव्या. सरकारने दडपशाहीचे धोरण बंद केले पाहिजे त्याचप्रमाणे सेंसारशीप उठवावी, स्थानबंधांची मुक्तता करण्यात यावी, शिस्तभंगाच्या कारवाया काढुन खटले मागे घेण्यात यावे अश्या किती तरी मागण्या करण्यात आल्या.

आसाम आंदोलनाविषयी एम. सी. छगला म्हणतात " परकिय नागरिक हा नेहमी परकिय असतो. त्याच्या प्रवेशाने त्याचा कायदेशीर दर्जा ठरत नसतो परकियांना मतदानाचा अधिकार नाही. त्याचप्रमाणे हा प्रश्न प्रादेशिक नाही. "

आचार्य कृपलानी म्हणतात " आसामप्रश्न शांततापूर्ण मार्गाने सोडविता येईल. सरकारची दडपशाही भयग्रस्तता व्यक्त करते. "

आसामात आज जे लंगडे अल्वा तैमुर शासन सत्तारूढ आहे ते अल्पमतातले आहे. कारण त्यास जनमताचा आधार नाही. आज आसाममध्ये मुलकी अधिकार निष्प्रभ करण्यात येवून पोलिसांचे अधिकार वाढविण्यात येत आहे ' असुरक्षीत भाग ' म्हणून जाहीर करुन केवळ जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्याच्या बदल्या करण्यात येवून आपल्या मर्जीतली अधिकारी नेमले जात आहे याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. सर्व धर्म समभावाचे धोरण डावलण्यात येत आहे अशी भिती आसामी जनता व्यक्त करतांना दिसते.

आसाम आंदोलनामुळे देशाच्या आर्थिक व्यवस्थेला फार मोठा फटका बसला आहे. पन्नास टक्केपेक्षा जास्त होणारा तेलपुरवठा आंदोलनामुळे बंद पडला. एका वर्षात १००क कोटी रुपयांचे परकिय चलनाचे नुकसान झाले आहे. चार दशलक्ष टन क्रुडाईल तेल जे९००कोटी रुपयांचे आहे त्याचे नुकसान झाले आहे, दिग्बोई, गोहत्ती, बंजाईगाव, बिहारमधील बरौनी येथील रिफायनरी कारखान्यातील उत्पादन प्रचंड प्रमाणात कमी झाले आहे. त्याचप्रमाणे देशातील इतर तेलावर चालणाऱ्या कारखान्यास नुकसान पोहचण्याची भिती आहे. त्याचप्रमाणे लाकूड, प्लायवूड यांचे उत्पादन जवळ जवळ बंद पडले आहे. आसाममधील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. त्यादृष्टीने आसाम प्रश्नाकडे सहानुभूतीपूर्वक त्वरित विचार होणे आवश्यक आहे.

आसामच्या प्रश्नाविषयी सरकारला आस्था आहे. त्यातील काही मागण्या त्वरित मान्य केल्या आहेत. आजही आसाम प्रश्नावर वाटाघाटी सुरु आहे, अन्य काही पक्षाद्वारे उपाय सुचविले गेले पण आसामी आंदोलन नेते व सरकार यांच्यात मतभेद होवून ते फेटाळले गेले. सरकारने एका प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे ' या चळवळीमुळे लोकशाही, धर्मनिरपेक्षता या मूल्यांना मुळातच इजा पोहचली आहे. कटुता संशय व अस्थिरतेच्या वातावरणाने आसामाला वेढले गेले आहे. आसामातील जाती जमाती, काही गटातील सुसंवादाला बाध आली आहे. भाषिक व धार्मिक अल्पसंस्कारांना अधिकाधिक असुरक्षित ता वाटत आहे.

आंदोलन करणाऱ्या नेत्यांनी आपली हट्टाची भूमीका सोडून राष्ट्रीय एकतेचा विचार केला पाहिज, मानवतेच्या दृष्टीने विचार केसा जावा. या आंदोलनामुळे आसामच्या विकासाच्या कामात कमालीचा खंड पडला आहे. अधिक वेळ आंदोलन चालू राहिल्यास त्याचा गंभीर परिणाम हा आसामी जनतेवर होणार आहे. कारण सर्व कामे ही थंड पडली आहेत जवळजवळ २०,००० मजूर बेकार झाले आहेत. त्यांच्या पोटापाण्याचा विचार जरुर होणे आवश्यक आहे. वाहतूकीच्या विस्कळीतपणाने जीवनावश्यक गोष्टीचा तुटवडा दिवसेंदिवस भासत आहे. याचा विचार आंदोलन नत्यांनी करणे आवश्यक आहे. व आसामच्या विकास दृष्टीने त्वरित निर्णय घेणे आवश्यक आहे.

सर्व भारतीय जनतेला आसामी लोकाबद्दल आस्था प्रेम, सहानुभूति वाटत आहे. सर्व जनतेचे लक्ष या प्रश्नाकडे आहे. काहीतरी तोडगा निघून लवकरात लवकर आसाम प्रश्न सोडविला जावा या दृष्टीने सरकारने व आंदोलन नेते यांनी आपली ताठर भूमिका सोडून भारतीय एकतेस, राष्ट्रीयतेस धोका निर्माण होणार नाही या दृष्टीने त्वरित पावले उचलली जातील असा आशावाद करण्यास हरकत कसली.

卐卐卐

# जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे

शैलजा बडगुजर
XII Com.

घरच्या चार भिंतीतून बाहेर पडलं की निसर्गात सर्वत्र कमी अधिक प्रमाणात सौन्दर्य विखुरलेलं दिसतं. निसर्ग सौंदर्याप्रमाणे मानवी जीवनातील सौंदर्य व विविधताही अनुभवायला मिळतेच. आपले अनुभवाचे भांडार समृद्ध होते. त्यासाठी मात्र पहाणाऱ्याच्या ठिकाणी सहृदयता व अभिजात सौंदर्यदृष्टी हवी. या सृष्टीत पर्वत, नद्या, दऱ्या–खोरी, पठारे, जंगले इ. सर्वत्रच आढळून येतात. प्रवासवर्णनातून वा भूगोलाच्या पुस्तकातून त्यांचे ज्ञान मिळविणे म्हणजे दुधाची तहान ताकावर भागविण्यासारखे असते. तेव्हा त्या निसर्गाचा आस्वाद प्रत्यक्षपणे घेण्यातच खरी मौज आहे.

मलाही योगायोगाने 'सारे जहाँसे अच्छा' असा 'हिंदोस्ता पहाण्याची व त्यातील निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेण्याची संधी लाभली. उत्तर भारताच्या सफरीत मी बरीचशी प्रेक्षणीय स्थळे पाहीली

या सहलीची सुरूवात झाली वऱ्हाडातील गजानन बाबांच्या दर्शनाने. त्यांच्या दर्शनासाठी लागलेल्या भाविकांच्या रांगा पाहून आश्चर्य वाटले. पुढे भेडा–घाट हे नर्मदेचे प्रेक्षणीय उगमस्थान पहायला मिळाले. दूर दूर पसरलेले पांढरे शुभ्र खडक व धब–धब्याचे उन्हात काचसारखे चमकणारे शुभ्रपाणी नजरेला भुरळ पाडते. आसपास सर्वत्र उन्हाने चम–कणाऱ्या शिळा त्या सौंदर्यात भर घालतात.

खजुराहो हे मध्यप्रदेशातील आणखी एक प्रेक्षणीय स्थळ. शिल्पकलेचा एक चांगला नमुना वाटतो. माणसातील श्लील अश्लीलतेच्या मर्यादा पुसून टाकतो व उच्च कलात्मक आनंद देतो. यातील कोरीव काम इ. स. ११ व्या शतकातील आहे. पुढील चित्रकूटा-बद्दल तर आपल्याला सांगायलाच नको. तेथील विशेष आकर्षण म्हणजे वनश्री व नदीकाठी असलेला अत्रि–ऋषींचा आश्रम. रामायणातील हे सुप्रसिद्ध स्थळ. रामटेक हे तर काशीचे प्रवेशद्वारच. वर टेकडीवरून पाचूसारखा चमकणारा खालचा आंबाळा प्रथम-दर्शनीच आपले मन खेचून घेतो. हिरव्यागार झाडांच्या पड्याआड दडलेल्या उंच टेकड्या व त्या-वरील पांढरी शुभ्र देवळे हे सर्व एखाद्या हिरव्यागार शालूवर पांढरी खडी निसर्गाने उमटविली आहे असे वाटते.

अलाहाबाद येथे विशेष म्हणजे मोतीलाल नेहरूंचे इ. स. १९१७ मधील 'आनंद भुवन' तसेच हनुमानाचे भव्य मंदिर व त्यांच्या प्रवेशद्वारावर असलेले रथारूढ भीष्म

काशी यात्रा केली म्हणजे जीवनात जेवढी पापे केली ती नष्ट होतात व गंगेत स्नान केले म्हणजे ती धुतली जातात अशी भाविकांची श्रद्धा आहे. व ते खरे आहे असे तेथील गर्दीवरून दिसते. येथील काशी विश्वेश्वराचा सोन्याचा कळस डोळे दिपविणारा आहे. बहुतेक कोरीव काम चांदी-सोन्यातच आहे. जवळच रामनगरचा राजवाडा आहे.

गया हे काशी प्रमाणेच प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. हे आपणाला माहितच आहे. मातृगया व पितृगया हे दोन प्रकार याच गयेचे आहेत. बुद्ध गया येथे लेणी–सारखे कोरीव काम केलेले बुद्धाचे मंदिर आहे. व येथेच बोधीवृक्ष पण आहे. मंदिराची रचना, आजु–बाजूच्या भागाची रचना वनश्रीने आकर्षक झाली आहे.

लखनौ हे राजधानीचे सुप्रसिद्ध शहर. तेथील भुलभुलैय्या ही एक अद्‌भुत जगप्रसिद्ध वास्तु आहे आत गेलेला नवखा कदापीही बाहेर पडणार नाही. याच भुलभुलैयात ५० फूट रूंद व १३० फुट लांब काहीही आधार नसलेला भव्य हॉल व तुसती आगकाडी जरी पेटवली तरी त्याच्या आवाज १३० फुटावर ऐकायला येतो. याचे बांधकाम ज्यावेळी सुरू होते त्यावेळी म्हणत असत की "जिसको न मौला उसको दे असीब अब्दौला" कारण या भूल भुलैयाचे काम रात्री श्रीमंत व दिवसा गरीब यांनी ११ वर्षे केले. तसेच हस्तकलेचे नमुने, छोटा इमामी वाडा येथे पहावयास मिळतात. तेथे १८" लांब व १४" रूंद एवढ्या कागदावर अब्दुल कारागीर यांनी संपूर्ण कुराण लिहीलेले आहे.

हे रेक्सैल भारताचे उत्तरे कडचे सर्वांत शेवटचे स्टेशन व तेथूनच हिमालयाच्या खरा प्रवास सुरू होतो. रेक्सैल ते काठमांडू १२ १३ तासांचा बसचा प्रवास आहे. भास्कराच्या स्वागतासाठी उभी असलेली सुगंध नसलेली पण नानाविध रंगाची झाडे व वेली त्याच्याच कोवळ्या उन्हात आपली कोवळी पाने जणू काही लाईटींग केली आहे व ती त्या वाटेने जाणाऱ्या प्रवाशाच्या स्वागतासाठी आहे–असे वाटते. काठमांडू यथील श्री. पशुपतीनाथाचे मंदीर संपूर्ण कलाकुसर केलेले चांदी व सोन्यात आहे. जवळच उमेचेही तश्याच प्रकारचे देऊळ आहे. येथील शेषशाही भगवान यांची १३ फूट लांब व ५ ते ६ फूट रूंद काळ्यापाषाणाची स्वयंभू मूर्ती आपले लक्ष विचलीत करते. येथेच भव्य असे बुध्याचे पहाण्या–जोगे मंदिर आहे. यावर उभे राहिले की काठमांडू जणू काही सारीपाटावरील एक सोंगटीच दिसते!

केदारनाथला जातांना प्रथम हृषीकेशहून मीनीबसेसने जावे लागते. येथील हिमालय चढत असतांना आपण आपलं सर्वस्व देखील विसरतो. विविध रंग, रूपाची झाडे, पाने फुले आपणास बघावयास तर मिळतातच पण पक्षी ही किती सुरेख! बसेस फक्त गौरिकुंडा पर्यंत जातात व तेथून १४ किलोमीटर केदरनाथ पायी चढून चावे लागते. तशी डोली घोडा, कंडी इ. साधने आहेत पण पायी जाण्यांत एक वेगळीच मजा येते कारण एकीकडे गगनाला हात पोहचवून पाह–णारी वेडी हिमालयाची शिखरे व खालून आपली महती ऐकवत जाणारी गंगा आपण केव्हा मंदिरापाशी येतो हे तर कळतच नाही. सकाळच्या कोवळ्या उन्हात चमकणारी हिमशिखरे किती अप्रतिम दिस–तात. बद्रिनाथला जातांना इतकी मज्जा येत नाही कारण मंदिराच्या जवळपासच बसेस थांबतात जवळ जवळ हिरवळ नसतेच हा सर्व प्रवास त्या देवावर विश्वास ठेऊन करावा कारण केव्हा कडा कोसळेल व केव्हा काय होईल हे सांगता येत नाही. कारण आमचीच बस दरित जात होती पण पाठीशी देव होता म्हणून बर नाही तर ........?

आश्चर्य म्हणजे एवढ्या हिमालयात देखिल आपल्या कडील उनपदेव – सुनपदेव सारखे गरम पाण्याचे झरे आहेत बद्रीनाथाला सोबत असते ती अलकनंदेची

'दिल्ली म्हटल्या बरोबर आपले मन गतेइतिहास बुडून जाते. पांडवांपासून तर आजच्या सरकारपर्यंत किती उलथा पालथी पाहिल्या असतील या शहराने! भारतासारख्या पुरातन देशाची ही पुरातन राजधानी. त्यामुळे तिचा थाट काही औरच! तेथे काय काय म्हणून बघावे असे होऊन जाते. देहली गेटाशीच भारतीय जवानांच्या शूर – सैनिकांच्या आठवणी निगडीत आहेत. पुढे पुढे एकाहून एक सरस अशा विदेशी दूतावासांच्या वास्तू रेडफोर्ट, विजयघाट, राजघाट, शांतीवन, बिर्लाभुवन, सचिवांलय, फोर्ट व आंतरराष्ट्रीय विमानतळ, कुतुबमिनार, देहली गेट इ. बघून आपण चकीत होतो.

आग्रा व तेथील ताजमहाल म्हणजे जगातील एक आश्चर्यच! असली अप्रतिम कलाकृति जगात क्वचितच पहायला मिळणार! यमुनेच्या काठावर संगमरवरी शिलपात असलेले ते कोरीवकाम नेत्रदीपक आहे. कोटचावधी रुपये खर्च करून हिरेमाणके, पाचू बसवून तयार केलेले हे शिल्प आहे- आपल्या प्रिय पत्नी मुमताजचे स्मारक म्हणून शहाजहानने बांधलेले हे स्मारक युगानुयुगे प्रेमी युगलांना खऱ्या प्रेमाचा संदेश देत राहील. !

भारताचे आणखी एक गुलाबी शहर म्हणजे जयपूर होय. तेथील जंतर मंतर व सोनी मंदिर फार सुरेख आहे उदयपूर येथील गुलाबबाग पहाण्यासारखी आहे अत्यंत रेखीव असलेले हे शहर भारतातील सर्वात सुंदर असलेल्या शहरातील एक! नाना रंग, गंध व आकाराची फुल आपल्याला छोटयाशा रेल्वेत बसून बघावयास 'मिळतात. तसेच "सहेलीकी बाडी' ही प्रेक्षणीय आहे.

इंदौर यथील शीशमहस पाहून आपण चकीत होतो. ओकारेश्वर यथील नर्मदामाईचे पात्र डोळयांना भुरड घालते. तिथला निसर्ग ही डोळयांनी पिऊन टाकावा असा वाटतो.

खरोखरच आपला देश कसा आहे हे प्रत्यक्ष बाहेर पडल्या शिवाय समजणार नाही. शेवटी वाटते की, माझ्या देशाच्या वैभवाला माझीच दृष्ट न लागो! त्याचप्रमाणे परकियांची वक्रदृष्टीही भूतकाळा––प्रमाणे भविष्यातही कधी न लागो.

卐 卐

# माझी मातृभाषा मराठी

कु. लतिका देशपांडे
F. Y. B. Com.

२२ फेब्रुवारी १९८१ ! बाहुबली महामस्तकाभिषेक सोहळा ! भारताच्या सांस्कृतिक जीवनाच्या इतिहासातील एक सुवर्ण पर्व ! मराठी भाषेचा प्राचीनतेची साक्ष पटविणारा एक सुदिन ! साऱ्या भारतीयांच्या भावनांना उधाण आणणारा हा आनंदपूर्ण समारंभ मनाला विचारप्रवृत्त केल्याशिवाय रहात नाही. त्या समारंभाच्या स्फूर्तीने माझ्याही मनात दाटलेल्या भावना व्यक्त कराव्याशा वाटतात. मी, माझी आई, माझे वडील, माझे घर, माझा गाव, माझे नातेवाईक, माझा देश असे जे जे आपण आपले म्हणून सांगतो त्या त्या गोष्टीवरील, वस्तूवरील वा व्यक्तीवरील हक्क आपण ठासून सांगत असतो, नव्हे त्या सर्वांबद्दल आपणास आत्मीयता आणि अभिमान वाटत असतो, अस्मिता जागृत होत असते. २२ फेब्रुवारीच्या समारंभाचे वर्णन वाचीत असता मला आठवते ते मराठीतील पहिले वाक्य ! माझ्या मातृभाषेतील पहिले वाक्य ! आताच्या समृद्ध मराठीचे ते पहिले वाक्यरुपी पाऊल !– "श्री चामुंडराये करवियले'– गंगराजे सुत्ताले करवियले.

माझी मातृभाषा मराठी, मराठी भाषेच्या प्राचीनतेचा वारसा कुणालाही अमान्य होणार नाही. तिचे सामर्थ्य ज्ञानेश्वराच्या 'माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुके' परी अमृतातेहि पैजसि जिंके' ......... ह्या ओवीत सांगितले गेले आहे. ज्ञानेश्वरांनीही ज्या भाषेच सामर्थ्य मान्य केले, नव्हे आपल्या ग्रंथरचनेतून ते स्पष्ट करून दाखविले ती मराठी भाषा माझी मातृभाषा आहे. ह्या गोष्टीचा मला फार मोठा अभिमान वाटतो. जनसामान्यांच्या उद्धाराकरिता सर्वसामान्याची भाषा ग्रंथलेखनासाठी वापरून ज्ञानेश्वरांनी फार मौलिक कार्य केलेले आहे.

मानवी जीवनात भाषेला फार महत्वाचे स्थान आहे. विचारांची देवाणघेवाण करण्याचे भाषा हे प्रभावी साधन आहे. भावना व्यक्त करण्याचे ते एक माध्यम आहे. व्यवहाराच्या क्षेत्रातही भाषेला महत्वाचे स्थान आहे. राष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात आणि विकासात भाषा फार मोलाचे कार्य करीत असते. भाषा हे संस्काराचे एक प्रभावी माध्यम समजले जाते. एखादे गुळगुळीत झालेले समीकरण वापरून गणिती पद्धतीने संस्कार होत नसतात किंवा मानवी मन विज्ञानाच्या साच्यात बसवून घडवित' येत नाही. दैनंदिन जीवनातील सारे व्यवहार भाषेतूनच केले जातात. भाषेतूनच चांगले विचार मांडणे शक्य होते. साहित्य आपणास अनेक चांगल्या व्यक्तिचा परिचय करून देते. त्यामुळे आपल्या विचारांची पातळी उंचावते. ध्येयवादी माणसांची चरित्रे आपणास मार्गदर्शक ठरतात. जीवनातील,वातावरणातील सौंदर्य भाषा माध्यमातूनच वर्णिता येते. आणि म्हणूनच मानवी मनाची जडण घडण करणारी, सौंदर्याचा साक्षात्कार घडविणारी, दुःखाला, भावनांना वाचा फोडणारी भाषा म्हणजे

मानवी जीवनाचे एक महत्वाचे अंग आहे. एक व्यक्ता कोणतीही असो. तिची स्वतःची अशी एक भाषा असते. आणि हीच व्यक्तींची भाषा एखाद्या गटाची भाषा बनते. समाजाची भाषा बनते नव्हे राष्ट्राची भाषा बनते. आणि म्हणूणच माणसाच्या जीवनात भाषेला फार महत्वाचे स्थान आहे. ती माणसा–माणसात भावनेचे, प्रेमाचे आणि मायेचे नाते निर्माण करते. बालकाच्या जीवनात आईचे स्थान जेवढे महत्वाचे असते तेवढेच महत्वाचे स्थान त्याच्या मातृभाषेचेही असते. व्यक्ती कितीही मोठी असली किंवा झाली तरी आपली मातृभाषा आणि संस्कृती या दोन्ही दुव्यांशी जखडलेली असते.

भाषा हे व्यक्तीच्या आणि राष्ट्राच्या विकासातील एक महत्वाचे सूत्र आहे. आणि म्हणूनच त्या भाषेची प्राचीनता, त्या भाषेचे व्यापक क्षेत्र, भाषेची सुलभता लक्षात घेणे आवश्यक आहे त्या दृष्टीने विचार करता मराठी ही बहुजन समाजाची भाषा आहे. 'जनसामान्यांची भाषा हीच खरी विकासाची कक्षा' असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. अनेक संतांनी, सांप्रदायिकांनी मराठीतूनच ग्रंथ रचना केलेली आपण पहातो. आणि त्यांचा मुख्य उद्देश मात्र आपण नजरे आड करतो त्यांना सामान्य लोकांचा उद्धार करावयाचा होता, त्या जीवनाशी नाते जोडायचे होते म्हणूनच जे सर्वांना पेलवेल, मानवेल, समजेल असे मराठीचे माध्यम त्यांनी स्विकारले होते. अलीकडील अनेक साहित्यिकांनी मराठी भाषेत समृद्धता आणलेली आहे. श्रेष्ठ असे वाङमय निर्माण केल आहे खर पण ते वाचतांना जी दृष्टी आपल्या ठिकाणी असायला हवी ती मात्र नाही. त्या साहित्यातून आपण काय घ्यायला हवे हे आपणास समजत नाही. विद्यार्थी वर्गाचे तर भाषाविषयाकडे व प्रामुख्याने मराठी भाषेकडे दुर्लक्ष होत असलेले आपण पहातो. वस्तुतः भाषेतूनच आपल्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होत असते. भाषाच आपला खरा पिंड घडवित असते. पण आपल्या हितासाठी सदैव झटणाऱ्या आईची आपण केव्हा केव्हा अवज्ञा करीत असतो. तीच गत आपल्या मातृभाषेची झालेली आहे. आईच्या ममतेचे मोल करायचे नसते. ती ममता, ते प्रेम चिरकाल टिकवायचे असते. तद्वतच मातृभाषेचे व्यावहारिक दृष्ट्या मूल्यमापन करणे म्हणजे आईचे प्रेम आहे. तिची ममता, तिच्या हृदयाची उदात्तता यांची किंमत ठरविण्यासारखे आहे.

महाराष्ट्रासारख्या सुंदर, रमणीय परिसरात मराठी भाषेचे वैभव हे अमूल्य असेच ठरेल. श्री. संत ज्ञानेश्वरांनी प्राकृत भाषेत 'भावार्थ दीपिका' ग्रंथ हा लिहीला आणि पुढे तोच 'ज्ञानेश्वरी' म्हणून अमर झाला. संस्कृत गीतेमधील प्रत्येक अध्यायावर मराठी भाषेत स्पष्टीकरण करतांना मराठी भाषा अधिकाधिक ज्ञानसंपन्न, समृद्ध आणि सुंदर अशी होत गेलेली दिसते. तुकारामांचे अभंग, जनाबाईच्या ओव्या, मोरोपंताच्या आर्या, ज्ञानेश्वरांच्या ओव्या हा अमूल्य ठेवा मराठी माणसांच्या कणाकणात सामावलेला आहे. लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' नावाचा ग्रंथ मराठीतच लिहीला. सावरकरांचा स्वातंत्र्याचा जाज्वल्य अभिमान व्यक्त होतांना 'स्वतंत्र ते भगवती' ह्या मराठी प्रसिद्ध गीतात दिसून येतो. त्याचप्रमाणे सर्व प्रकारचे साहित्य नाटक, कथा, लघुकथा लिहिणारे साहित्य सम्राट न. चि, केळकर, प्रसिद्ध साहित्यिक वि. स- खांडेकर यांनी लिहिलेल्या 'ययाती' या कादंबरीला ज्ञानपीठ पारितोषिकाचा बहुमान मिळाला. ती कादंबरी मराठी भाषेतच लिहीली गेली. मराठी भाषा सर्वांगाने विस्तृत करणारे ग. दि. माडगूळकर यांचे 'गीत रामायण' हे प्रत्येक महाराष्ट्रीयन माणसालाच नव्ह तर कोणालाही लळा लावणारेच ठरेल.

या अशा या प्रतिभासंपन्न, ज्ञानसंपन्न तसेच महान व्यक्तींनी मराठी भाषेचा उत्कर्ष करण्यास अनेक विविध प्रकारचे साहित्य लिहून आपल्या मातृभाषेचे ऋण फेडण्याचा प्रयत्न केला.

आणि म्हणूनच शेवटी असे म्हणावेसे वाटते की आम्हास आमच्या मातृभाषेची थोरवी, समृद्धता,, व्यापकता, समर्थता जाणून घ्यायला हवी. पण आमची गत–

'तुझे 'आहे तुजपाशी !
परि तू जागा चुकलाशी

अशी झालेली आहे.

卐卐

## ' फक्त तिच्यासाठी... '

किशोर कोल्हे
टी. वाय. बी. ए.
(विद्यापीठ प्रतिनिधी)

हे जीवनेश्वरी.........
माझ्या जीवनाची तू एकच आशा आहेस.
ह्या जगात तुझ्याशिवाय माझे जीवन आहे...
एका दोरी तुटलेल्या पतंगासारखे मी एक भावनाशील कोमल मनाचा तरुण आहे.
तुझ्या वाचून मी जगू शकणार नाही.
तु मला फार मोठं वेड लावले आहे.
तुझ्याशिवाय जीवनाचा मार्ग चालणे व्यर्थ आहे.
तू मला हवीच आहे. मी तुला शोधतो आहे.
तुझ्यासाठी सैरावैरा धावतो आहे.
केव्हा सापडणार ? कुठे मिळणार ? हायरे देवा !
ती बघा ती दिसली. तां नाही,

परंतु तिचा पत्ता तरी सापडला आणि न विचारता तिचा पत्ता मी माझ्या हृदयाच्या पोस्ट कार्डवर लिहून घेतला आणि माझे प्रेम पत्र सुंदर अशा पौर्णिमेच्या रात्रीच्या शुभ्र प्रकाशात सुवाच्य अक्षरांत तिला लिहून पाठविले. परंतु तिने कोणताही प्रतिसाद दिला नाही. अनेक वेळा पत्रे लिहिलीत पण अहं ! तिच्या जवळच्या नातेवाईकांनासुद्धा भेटलो. तिच्यासाठी चक्क मी वशिला लावला. पैशांची लाचूच दाखविली. परंतु ती दगडासारखी कठोरच राहिली. 'अर्पिली स्वप्ने तिला मा माझ्या प्रीतीची. परंतु शेवटी दीन मात्र मलाच व्हावे लागले ती एक आधुनिक प्रिया आहे. तिने मला एक भयंकर वेड लावले आहे. मला ती गवसलीच पाहिजे. ती माझ्या जीवनाची प्रभात आहे, जीवनाची ममता आहे. म्हणून माझा प्रयत्न फक्त तिच्यासाठी ! फक्त तिच्यासाठी !! फक्त तिच्यासाठी !!!

"जगविणाऱ्या त्या नोकरीसाठी !
त्या नोकरीसाठी !! त्या नोकरीसाठी !!!

## अनुकरणीय !

सर्व क्षेत्रातील यशस्वी व गुणी विद्यार्थी हेच महाविद्यालयाची प्रमुख संपदा समजली जाते. या महाविद्यालयाचे एक अत्यंत हुषार विद्यार्थी म्हणून श्री. मिलिंद फाटक हे ओळखले जातात. पुणे विद्यापीठाच्या तृतीय-वर्ष वाणिज्य या परीक्षेत विद्यापीठात सर्वप्रथम येऊन त्यांनी सर्वाधिक गुण मिळविण्याचा उच्चांक तर गाठलाच परंतु त्या बरोबरच नुकत्याच झालेल्या I. C. W. A या अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेतही उत्तम दर्जाचे यश मिळवून अवघ्या २१ व्या वर्षी कॉस्ट अकौन्टंट होण्याचा मानही मिळविला. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच महाविद्यालयीन व आंतर महाविद्यालयीन क्रीडा-स्पर्धातही मोठ्या उत्साहाने सहभागी होणारा, सर्व उपक्रमांबद्दल आस्था बाळगणारा, व सर्वार्थाने सरस्वतीच्या उद्यानात मुक्तपणे विहरणारा हा 'मिलिंद' आमच्या महाविद्यालयाचे भूषण ठरलेला आहे.

## अभिनंदनिय !

महाविद्यालयीन अभ्यासक्रमात सांस्कृतिक कार्यक्रमांचे स्थान निःसंशय मोठे असते. पुणे विद्यापीठाच्या विद्यमाने प्रतिवर्षी युवक-महोत्सवाचे आयोजन केले जाते.यंदा संगमनेर येथे झालेल्या युवक महोत्सव प्रसंगी आमच्या महाविद्यालयामार्फत सादर करण्यात आलेल्या, श्री. उत्तम कोळगावकर लिखित 'राजा श्रावण डोलतो' या गीतास समूह-गीत स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. हे गीत स्वरबद्ध केले होते-श्री राजन भावसार, कु. रावेरकर, कु.भारती पाठक, कु. वर्षा कुळकर्णी, विजय बाविस्कर, महेश जोशी, डी. एल. शर्मा, दीपक चांदोरकर व कु. जयश्री वारके, या विद्यार्थ्यांनी- या समूह गीताने मिळविलेले हे यश निश्चितच अभिनंदनीय असे आहे. या विद्यार्थ्यांस प्रा. एस. आर. चिरमाडे यांची प्रेरणा व मार्गदर्शन लाभले.



## छा या जा ल



'शलाका', 'वाङ्मय मंडळ' व 'अभ्यास मंडळ'



एम. एस सी. (मॅथ्स) उद्घाटक–डॉ. गोपालकृष्णन्, अध्यक्ष–डॉ. अण्णासाहेब बेंडाळे



संपादक मंडळ



जिमखाना कार्यकारी मंडळ



आंतर महाविद्यालयीन-वजन उचलणे
चॅम्पियनशिप - विजेता संघ



भोजू धनराळे - वजन उचलणे
प्रथम क्रमांक



नेरीकर- पुणे विद्यापीठ - बास्केट बॉल खेळाडू



आंतर महाविद्यालयीन बुद्धीबळ
विजेता संघ



आंतर महाविद्यालयीन ४x४०० मीटर्स रिले
विजेता संघ



हिमांशु गुप्ते - कुस्ती विजेता



युवक महोत्सव- समूह गीत स्पर्धेत प्रथम पारितोषिक विजेता संघ



डिप्लोमा इन् ऑफीस मॅनेजमेंट : प्राध्यापक व विद्यार्थी



एन. सी. सी. विद्यार्थिनी



एन. सी. सी. रँक होल्डर्स १९८१



आंतरमहाविद्यालयीन सामन्याचे उद्घाटन
प्रमुख पाहुणे - डॉ. अण्णासाहेब बेंडाळे



आंतरविद्यापीठ दक्षिण विभागीय कबड्डी विद्यार्थी स्पर्धा ८०-८१
उद्घाटक- पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राम ताकवले



आंतर विभागीय संघातून खेळलेले विद्यार्थी



जिमखाना वार्षिक पारितोषिक समारंभ
प्रमुख पाहुणे श्री. रमेशचंद्र जैन



टेबल टेनीस– जिल्ह पातळीवर
विजयी संघ (ज्यु. कॉलेज)



सवर्ण संधू– बेस्टस्पोर्ट्समन (१९८०–८१)
४x४०० रिले-ब्रांझ पदक विजेता-राष्ट्रीय पातळी
१०० व २०० मी. धावणे प्रथम व ४०० मी.
धावणे द्वितिय (राज्य पातळी)



सुनिल गगडाणी
सर्वोत्कृष्ठ विद्यार्थी (१९८०–८१)



बायॉलाजी असोसिएशन– कार्यकारिणी



वादविवाद मंडळ– कार्यकारिणी



किशोर कोल्हे–
विद्यापीठ प्रतिनिधी



प्लॅनिंग फोरम- कार्यकारिणी



कु. कल्पना पाटील- XII कला
कॉलेजात सर्वप्रथम



राष्ट्रीय सेवा योजना- शिबिर



राष्ट्रीय सेवा योजना-कार्यकारिणी



आंतर महाविद्यालयीन ४X१०० मीटर रिले
विजयी संघ



सुरेश पाटील
एम्. कॉम- विद्यापिठात तिसरा



कलामंडळ कार्यकारिणी-(ज्यु. कॉलेज)



सुनील काळे- टी. वाय. बी.
एस्. सी.-कॉलेजात सर्वप्रथम



कु. स्मिता भिरुड-XII वाणिज्य
कॉलेजात सर्वप्रथम



वाणिज्य मंडळ कार्यकारिणी- (ज्यु. कॉलेज)



आंतर महाविद्यालयीन सामने
बक्षीस समारंभ प्रसंगी
श्री. सुनील नांवे



शिवाजीराव पाटील-बी. ए.
कॉलेजात सर्वप्रथम



फिजिक्स फोरम– कार्यकारिणी



संजय देशपांडे
सर्वोत्कृष्ठ विद्यार्थी (१९८०–८१)



विलास मेढे– पुणे विद्यापीठ–
गिर्यारोहणात प्रथम



पोहणे व वैयक्तिक स्पर्धा– जिल्हा
पातळीवरील विजयी खेळाडू (ज्यु. कॉलेज)



आंतर महाविद्यालयीन फुटबॉल विजेता संघ



अजित तडवी– पुणे
विद्यापीठ कबड्डी संघात निवड
व सुवर्णपदक विजेता



आंतर महाविद्यालयीन कबड्डी
विजेता संघ



आंतर महाविद्यालयीन वैयक्तिक स्पर्धा
डॉ. बेंडाळे स्पर्धेची ज्योत प्रज्वलीत करीत असतांना



विदुषक कॉलेज–एकांकिका
(ज्यु. कॉ कला व वाणिज्य मंडळ)



मधुमती– समूह नृत्य
(ज्यु. कॉ. कला व वाणिज्य मंडळ)



विद्यापीठ अनुदानमंडळातर्फे
गणित विभागासाठी
आयोजित केलेला सेमिनार



राजिव चौधरी
XII Sc. प्रथम


वसतीगृहातील १९८०–८१ वर्षातील जी एस्. व मेसचे काम पाहणारे विद्यार्थी


कु. सुरेखा छापेकर एम्. ए. प्रथम वर्ग


मिलींद फाटक – तृतीय वर्ष वाणिज्य विद्यापीठांत सर्व प्रथम. सर्वाधिक गुण मिळविण्याचा उच्चांक, I. C. W. A. परिक्षेत उतीर्ण


शाम कोगटा पुणे विद्यापीठ कबड्डी खेळाडू

नित्यानंद पाटील वैयक्तिक स्पर्धेत चॅम्पिअनशिप




आंतर महाविद्यालयीन हॉकी विद्यार्थिनी


अशोक पाटील–वजन उचलणे स्पर्धा–प्रथम


सुभाष पाटील–बेस्ट स्पोर्टस्‌मन ऑफ दी १९८०–८१


आंतर महाविद्यालयीन खो खो


आंतर महाविद्यालयीन हॉकी विद्यार्थी–विजेता संघ


इकबाल मिर्झा–२०० मी. धावणे स्पर्धा–प्रथम क्रमांक

A Life of dedication and devotion to ideals



Homage to the memory of the late

**Prof. A. G. Chiplunkar**

# आजिंठा

## हिंन्दी विभाग

"जो जाति साहित्य के सर्वोत्तम रूप को समझ सकती है, वह मनुष्यता के सर्वोत्तम रूप को समझ सकती है। वही दान कर सकती है, वही पुण्य कर सकती है, वही धर्म-कर्म चला सकती है। यह समझना कि दान-पुण्य कर देना बडी बात है, भूल है। दान-पुण्य बुरी चीज नहीं है, यदि वह समझकर ढंग से किया जाय, परन्तु वह अपने आपमें बडी चीज नही है,। बडी चीज वह है, जो मनुष्य को आहार-निद्राआदि पशु-सामान्य मनो-वृत्तियों सें ऊपर उठाती है, जो उसे देवता बनाती है। साहित्य का कार्य यही है।"

'आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी'

# बरसात की रात

भरतसिंह पी. सिसोदिया
M. A. (Sr.)

सूरज अपनी लालीमा को साथ लिए प्रतिदिन के नुसार–धरती को अन्तिम प्रणाम करते हुए रजनी को धरती की ओर आने का निमंत्रण देते हुए डुब रहा था। रजनी के साथ सारे आसमान को काले बादल अपना कालापन का कवच परिधान कर रहे थे। रजनी और मेघो के संगम से परिवेशमें समय से पूर्व कालिमा पूर्णतः छा जाने से अन्धेरा फैल रहा था। शीतल पवन के झोंके शुरू हो गए थे। पवन का रुप कुछ समय पश्चात तेज हवा मे परिवर्तित हो रहा था। नृत्य की कला दिखाने नर्तकी कला एवं और अनुपम सौन्दर्य को दिखाने के समान बिजली भी नर्तकी के रुप समान एवं सौन्दर्य की चमक दिखा रही थी। साथ में बादल भी अपना कर्कश सगीत का साथ देने का प्रयास कर रहे थे। उसी प्रयास का प्रतिफल वर्षा बिजली को धरती पर लाने का असफल प्रयास कर रहे थे। बादल सफल तो नहीं हुए पर धरती को जल–थल करते हुए भीगा दिया था। मेघो की आवाज अधिक तीव्र हो रही थी। सयोग की धडकन भी अधिक तेज हो रही थी। घबराते हुए वह किशोर से कहता है,– " बस यार अब पढाई बहुत हो गयी, अब मुझे घर जाने दे।" किशोर के काफी रोकने पर भी वह नही रुका। उससे छाता लेते हुए व निकल पडा।

रास्ते से " संयोग " को घनघोर बारिश से संघर्ष करते हुए रास्ता काटना पड रहा था। बादलो की गरजते हुए तीव्र आवाज में एक मधुर सुरेली आवाजने बढते हुए कदमों को एकदम रोक लिया, " जरा सुनिए " सामने देखा तो एक लडकी बसस्टॉप पर खडी थी। उसने परिधान किए हुए वस्त्र पर्याप्त रुप से बदनपर चीपके हुऐ थे। जब उस नवयुवतीने उसे सवाल किया,– " आप कहा जा रहे है ? " तब कही सयोग की दृष्टी भीगे हुए वस्त्र से हटकर चोरी पकडा गये की स्थिती में वह घबराकर बोला– " म–म मुझे, मै आदर्श नगर " जा रहा हूँ। क्या आप मुझे अपने छाते में ले जा सकते हो ? संयोग सोच में पड गया 'हाँ' बोलना या 'नहीं'। आखिर उसने सोचा रात के ठिक नौ बज रहे है, रास्ता एकदम निर्जन बना हुआ है। इस स्थिती में इस युवती को अकेला छोडना अच्छा नहीं। उसे उसकी दया आयी, और वह हाँ के सकेत में छाता उपर उठाते हुए खडा रहता है। तब वह नवयुवती निसंकोच से परिस्थिती को ध्यान में लेते हुए उसके छाते में आ जाती है। और दोनों चलने लगते है।

दोनों खामोशी से आगे बढ रहे थे। अचानक वह युवती को भ्रम हुआ कि उसे कुछ पूछा गया। वह बोलती– " आपने कुछ कहा "। जी मैने...नहीं तो। वह अपनी भूल से थोडी लज्जा जाती है। सकोच में मन ही मन सयोग शरमा कर चूर हो रहा था। क्यों की किसी अजनबी लडकी के साथ रात में और वह भी घरघोर बारिश में ! वह हो कर बारीश में भीग रहा था। जिससे उसका उद्देश्य था, वह युवती अधिक न भीगे। क्योंकि वह इतनी नाजूक कली के समान थी कि बारिश से भीगने से वह काफी सिकूड रही थी। प्रतिक्षण उसे उसके शरीर का स्पर्श हो रहा था। वह लज्जित सा होकर छाते के बाहर निकल पडता था, पर युवती के अनुरोध पर वह फिर छाते का सहारा लेने आ जाता था। युवती को जब उसने चोर दृष्टीसे देखा तो वह अवाक–सा रह गया। शायद पहली बार उसने इतनी सुन्दर युवती देखी हो। अंधेरे में भी उसका

गोरा मुखडा और बदन बिजली सा चमक रहा था। बेबस युवती को ऐसा चोर नजर से देखना वह उचित न समझा और वह दूसरी ओर अपनी दृष्टी को स्थिर करने का असफल प्रयास करने में व्यस्त हुआ। उसी क्षण उस युवती ने पूछा,–"क्या मै आपका शुभ नाम पूछ सकती हूं। Why–not? क्यो नहीं? जी मुझे "संयोग" कहते है। संयोग के पूछने से पहले ही वह अपना नाम बताती है। और मुझे मिलन कहते है। संयोग के मुख से अचानक निकल पडता है, "वाह! क्या प्यारा है आपका नाम। वह कहती है आपके नाम से कम। और वह आगे कहती है- यह कैसा इत्तफाक है कि मेरा नाम मिलन और आपका नाम संयोग? वह भी कुछ समय के लिये दोनो चुप हो गये। वह सोचती है लडका काफी शरीफ घराने का एवं सभ्य युवक लगता है। इधर वह भी सोचता है की इससे मुलाखत कही सपना तो नही। वह सोचता है कि इस लडकी का इतने अल्प समय मे अपो पर इतना विश्वास हो गया है जो ऐसा बर्ताव कर रही जैसा मानो कई वर्षो से परिचय हो। लडकी के पेशा एवं रंग-ढंग से रईस घराने की ही लग रही थी। ऐसा सोच ही रहा था कि उसके विचार श्रृंखला खण्डीत हो गयी क्यों की वह बोल उठी 'Ok' अच्छा अब चलती हूँ, यही मेरा मकान है। जब संयोग मकान के और देखता है कि बहुत बडी कोठी थी, चारो ओर बगीचा था। मिलन ने कहा 'शुक्रिया' अरे हा संयोगजी कल हमारे ओर आईए। वह तो कोठी देखते ही बेहोश होते जा रहा था। और सोच रहा था कि इतनी रईस लडकी बस स्टॉप पर कैसे? ऐसा सोचते हुए इसने मिलन को जबाब भरे आवाज फिर एक बार निगाह भर कर उसे निहारते हुए जाने लगा पर–मिलन की नयन कटार उसे जख्मी कर रहे थे। वह बोला "अच्छा" आपसे मिलना तो मेरे लिए एक सपना, मिलनजी। मिलन कुछ नही समझ सकी, वह वहाँ से चली गयी। संयोग सोचता रहा कहा ये और कहा मै?

दूसरे दिन सबेरे संयोग किशोर की ओर जाने निकला तो वह विचार सागर मे डुबते हुए धीमी गतिसे कदम बढा रहा था, कि सामने से नयी कार उसे मानो कुचलनेके अन्दाज से करिब ब्रेक की तीव्र आवाज के साथ रुक गयी। 'हॅलो मिस्टर संयोग' गाडी मे बैठे बैठे मिलन बोल पडी। हॅलो-आ-आप . . . मिलनजी। बाते बाद मे पहले हमारे घर चलिए पिताजीने आपको याद किया है। मिलन ने हॉ और ना का उत्तर सुने बगैर संयोग को गाडी मे अपने पास बैठने के लिए बाध्य किया। कार फर्राटे लेते हुए आगे बढने लगी। वह बोली–आप बोलते क्यो नही हो, जो चुप बैठे हो। क्या सोच रहे है जी?–जी मै कुछ भी तो नही। छुपाईए मत वह संयोग को तन–मन से निहार रही थी। कितना शरीफ है, सुंदर युवक मे यह शराफत मानो उसे उसका मन कह रहा था–ऐसा लडका खोजनेसे भी नही मिलेगा। दोनो मे प्रेमाकर्षण का तत्व सत्व "सौंदर्य" पर्याप्त रुप मे मौजूद था। उसे लाखो मे एकसा लग रहा था। वह सोच रही थी रात मे अगर संयोग के अलावा और दूसरा होता तो वह मजबुरीका नायजाज लाभ उठाता। पर संयोग तो स्वयं भीगता रहा, शरमाता रहा। अपनी संयोग से मुलाकत किसी सुयोग का ही फल है। संयोग के सदृढ–शरीरगठन, सुचरित्र और मन-मोहक रुप ने तो मिलन की आत्मा एवं मन को घायल कर दिया था। विचार शृंखल। शुरु ही थी कि संयोग बोल पडा देवीजी आप गाडी बहुत तेज चलाती हो, वह अपनी माथे पर की पसीने की बुंदे पोंछते हुए कह उठा। जी . . . आप गाडी को घबरा रहे या . . .। मतलब? मिलन बोली "कुछ नही"। वह और बोली आपसे एक बात कहूँ। "क्या?" पूछिए वह बोला। वह जबाव मे कहती है आपसे मिलकर मै-मै नही हूँ। मेरी आत्मा प्रणय मार्ग पर भटक गयी है।

"जी" देखो देवीजी आपके विचारोका मै अनादर तो नही कर सकता हूँ। पर एक बात मेरी ओर से भी सुन लीजीए कहाँ आप और कहॉ मै? हँस की दोस्ती कौए के साथ शोभन को अशोभन सा है। मतलब मै एक गरीब आदमी हूँ। यही नही तो हम दोनो के दोस्ती के बीच 'समाज' नाम की बहुत बडी दिवार है। जो हमे कभी भी एक नही होने देगी। यह सुनकर मिलन से नही रह गया वह उत्तर में बोलती है "समाज" अमीर और गरीब यही कुछ बाते है जो हमारे देश को नष्ट करने मे सफल हो रही है। उसका दोष हम हमारे पूर्वजो को नही आजके नव युवक और युवतियों को दे तो अनुचित न होगा। इसी कायरताने तो मन चाहे जीवन साथीयो को अपने राह से बिखरा दिया है।

मिलनजी उपदेश देना बहुत सरल होता है, प्रयोग मे लाना सुरज को धरती पर लाने के समान है। आप अपने पिताजी के सामने अपनी इच्छा व्यक्त करोगी तब, जब.ब में मिलेगा "एक भीख मंगा ही तेरे लिए शेष था क्या? इस धरतीपर? नही मिलन यह तुम्हारी विचारधारा समाजरूपी सागर मे कुछ क्षणो मे समा जाएँगी, । संयोग जी मेरी विचार धारा एक मामुली नदी नही जो सागर मे समा जाएगी वह तो एक आसमान के समान विशाल है जो सब सागर, पर्वत, जंगले को समा लेगी। और मै। बस! ब्रेक लगाती है। कोठी के पास दोनो उतरते है। वह भीतर प्रवेश करता है तो सामने की आवाज उसे चमका देती है।– "आओ बेटे बैठो–कल हमारी बेटी की गाडी रास्ते में खराब हो जाने से वह गैरज में डाल दी थी पर टॅसी न मिलने से उसपर क्या बीती जाती पर तुम्हारे जैसे होनहार बेटेने सुरक्षा के साथ हमारी लडकी को घर पहुँचा दिया। मिलन, रात से तुम्हारी ही तारीफ में डुबी हुओ है। बोलती है सयोग ऐसा है, वैसा है–बेटा, (संयोग) तुम क्या करते–हो?" जी पिताजी मै– बी. ए. को हूँ, यह मेरा अन्तीम वर्ष है। पढाई के पश्चात नौकरी के चक्कर में हर हिंदुस्थानी युवको की तरह भटकना होगा।

क्षमा करना पिताजी– कि मै आपको प्रणाम करना ही भूल गया। मिलन के पिताजी बोलते है बेटा "अरे मै समय दूं तब तो तुम प्रमाण करोंगे। यह तो मेरी पुरानी आदत है। कि अपनी ही बाते करता हूँ। देखो बेटा यह अपना ही घर समझकर आया करो। और मिलन ने मुझे सबकुछ बता दिया है। वह तुम्ही ही को अपना साथी बनाना चाहती है और वह उसका अन्तीम फैसला है। वह तो मेरी एकलौती सन्तान है, उसकी खुशी मेरी खुशी है। तुम्हें यहॉ इसलिए बुलाया है "क्या तुम मिलन को स्वीकार करोगे?" संयोग नीचे सर झुका लेता है और सोच मे डुबते हुए कहता है। पिताजी यह तो असम्भव है। क्यों कि मै गरीब लडका हूँ–माँ और पिता का ही बोज हूँ। भोपाल में पिताजी मामुली क्लर्क है। अब तो उनका निवृत्त होने का समय आ गया है। निवृत्त होने के बाद जो हमारी थोडीसी खेती है वह खेती देखेंगे। और रही बात मेरी–मै तो कुछ भी नही हूँ। कुछ लायकी मुझ में है ही नहीं। मै स्वयं ही बोझ हूँ और मिलन जैसी नाजूक फूलों सी कली को मेरे रेगिस्थान रुपी जीवन में लाकर हमेशा के लिए मुरझा देना,। यह मै उचित नहीं समझता हूँ। कृपया आपके साथ जादा बोलने की भूल के लिए क्षमा कर दीजिए।

बेटा तुम इतने नेक सच्चाई के राहपर चलनेवाले शीष्टाचार एवं आदर्श के पुतले हो। इस से बढकर–हमें और कौनसी लायकी चाहिए? तुम शादी के बाद हमारे ओर रहोगे। बेचारे संयोग को अपने संकल्प से हटना पडा। और पिताजी की बातो में स्वीकृती दे दी। यह शुभ घडी को बिजली की कडाकने के समान माँ की आवाज ने दो बादल रुपी दिलो मे दरार गिरा दी। "यह शादी नहीं हो सकती।" मैने सब सुन लिया है। एक भीख माँगे के साथ अपनी एकलौती सन्तान को कोई भी किमत पर सौंप नही सकती। चाहे भगवान क्यों न आजाए हमें मनाने के लिए। यह मेरा अन्तीम फैसला है। लोहे की आवाज में बोलनेवाले मिलन के पिताजी और मिलन मोम की तरह पिघल गये। जो बेचारे अपनी पत्नी के इजाजत के बिना कुछ भी कर नहीं। पाते तो यह कैसा करेंगे।

संयोग– "मिलन मैने तुम्हे पहले ही कह दिया था। हंस के साथ कौवा कैसे? समाज अमीर, गरीब ऊँच–नीच, जाती–पाती इस दिवार को आजतक कोई तोड न सका न कभी भविष्य में तोडेगा।" मिलन अब तक माँ की आवाज से अपने आप में सीमित गयी थी। जब की पिताजी भी लज्जित से खडे होकर मिलन की ओर ताक रहे थे। जो आज

तक माँ की आवाज से ही पसीना पसीना हो जाती थी। वह अब कौनसा फैसला सुनाएगी। और क्या जबाब देगी इस से उसके मन में जिज्ञासा लगी थी। किन्तु संयोग को क्या मालूम कि हिन्दुस्थानी नारी जब क्रोधित होती है और अपनी इच्छा के लिए पहाड से भी टकरा सकती है। वह इन्साफ और सच्चाई की ओर अपने प्यार को कभी भी मिटने नही देती चाहे स्वयं को बली क्यों न देनी पडे।

मिलन, " माँ, यह शादी होगी। अगर तुम इस शादी को राजी नहीं हो तो मै राजी हूँ। क्यों कि यह मेरी जिन्दगी का सवाल है उसे हल करना मेरा परम कर्तव्य है और वह हल करके ही मै दम छोडूंगी।

माँ– बेटी मिलन तुम जानती हो मेरी बात न मानने का परिणाम क्या होता है। अगर तुझे नहीं मानना है तो अभी, इसी वक्त इस घर को, छोडकर जा सकती हो, वह भी यहाँ की फुटी कौडी को न छुते हुए। " समझ लिया " वह माँ की बात के जबाव में जाने के लिए तैयार हो जाती है।

संयोग– मिलन तुम्हारा प्यार देखकर मै आज बहुत खुश हूँ। यह मेरी जिन्दगी का पहला दिन है जो मै इतना खुश हूँ। तुम मेरे लिए इतना त्याग कर सकते हो। प्यार का दूसरा नाम " त्याग " है। प्यार का सच्चा रुप परीक्षा है जिसमें तुम सफल हो। पर तुमसे मेरी एक प्रार्थना है– यह विवाह की बाते माता–पिता की इच्छा के विरूद्ध या उनके आशिर्वाद के बिना करना भारतीय सस्कृति के खिलाफ है। मुझे माँताजी की राय के लिए और एक जन्म प्रतिक्षा क्यों न करनी पडे। मै तुम्हारी और तुम्हारे प्यार की प्रतिक्षा करूँगा। मिलन जो बाते जितनी जल्दी घटीत होती है उतनी जल्दी ही बिखरती है पर हम बिखरने नही देंगे। मै भी कुछ बनकर ही आऊंगा तब तक के लिए मेरा इन्तजार करना। मै जा रहा हूँ पर वह उसके पिताजी और माताजी के प्रणाम करते हुए चल पडता है। उसे जाते हुए सभी देखते है और मिलन की माँ संयोग का आदर्श रुप देख कर बूतसी खडी हा रह जाती है। मिलन की माँ संयोग का आदर्श रुप देख कर बूतसी खडी ही रह जाती है। मिलन केवल अपने आसूओं को रोक नही नही पाती। पर उसे खुशी भी होती है। कि हम दोनो मिलन -।- संयोग के अमर मिलन के लिए इन्तजार करेंगे। मेरा संयोग आखीर मेराही रहेगा।

संयोग एक-एक कदम धरती पर डालते चला जा रहा था। दुपहरे के बारह बज रहे थे पर बादल इतने छाये हुए थे कि दिन मे भी अंधेरे का भ्रम हो रहा था। घनघोर बारिश की वापस सुरुवात हुओ। वह भीगता गया और उसी स्थान तक आया जहाँ वे दोनो पहली बार मिले थे वह बसस्टॉप आज उसे आशाओं का स्टॉप सा महसूस हो रहा था। फिर कुछ दुखमे कुछ सुख मे अपने मनस्थिती को स्थिर करते हुए सोच रहा था कि वह बरसात की रात (प्रिय मिलन) की फिर कब आयेगी जब 'मिलन' और 'संयोग' का अमर मिलन होगा अन्तिम निर्णय लेता है "दोनो का मिलन तो अवश्य ही होगा-अवश्य होगा मिलन अखिर मेरी है मेरी ही रहेगी"। पागल सा बकाता हुआ वह आगे बढता गया। बारिश तेज हो रही थी। संयोग वही बस स्टॉप पर बैठा हुआ भीग रहा था। उसका शरीर भीग रहा था पर मन सुख रहा था।

# उर्वशी के प्रणय में अध्यात्म

**सौ. शकुंतला सुरेश तळेले**
एम्. ए. हिन्दी
( मराठी सिनि. )

"पुराण में किये हये उल्लेख के अनुसार उर्वशी स्वर्ग की अप्सरा, उसे दैत्य पकडकर ले जाता है, पुरुखा राजा अपने पौरुष बल से उर्वशी को छुडाता है। पुरुखा उर्वशी का रुप, उर्वशी पुरुखा का पौरुष देखकर एक दूसरे पर अनुरक्त होते है। इसी प्रेम को दिनकरजी प्रणय से लेकर अध्यात्म तक पहूँचाते है।"

दिनकरजी के 'उर्वशी' को केवल हिंदी साहित्य में ही नही, आधुनिक भारतीय साहित्य में भी सर्वोच्च स्थान मिला है। १९७३ मे भारत का सर्वोच्च स्थान ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त करनेवाली 'उर्वशी' हिन्दी की प्रथम कृति है।

'उर्वशी' में दिनकरजी ने उर्वशी और पुरुखा की पौराणिक कथा के माध्यम से 'काम' का नया दर्शन प्रस्तुत किया है।

"इंद्रिय के मार्ग से अतींद्रिय धरातल का स्पर्श यही प्रेम की अध्यात्मक महिमा है।" इस बात को दिनकरजी ने स्पष्ट किया है, अतः 'उर्वशी' को कामाध्यात्म का महाकाव्य भी कहा जाता है।

नर नारी के परस्पर आकर्षण की परिणति को ही प्रणय कहते हैं। नर में कौनसी भावनाएँ होती है? नारी में कौनसी? इस भावना के बारेमे दिनकरजी कहते हैं "नारी नर को छूकर तृप्त नहीं होती, न नर नारी के आलिंगन मे संतोष मानता है। कोई शक्ति है जो नारी को नर तथा नर को नारी से अलग नहीं रहने देती और जब वे मिल जाते है, तब भी, उनके भीतर किसी ऐसी तृष्णा का सचार होता है जिसकी तृप्ति शरीर के धरातल पर अनुपलब्ध है।

नारी के भीतर एक नारी होती है, जो अगोचर और इन्द्रियातीत है। इस नारी का संधान पुरुष तब पाता है, जब शरीर की धारा उछलते उसे मन के समुद्र में फेंक देती है, जब दैहिक चेतना से परे वह प्रेम दुर्गम समाधी में पहुँचकर निस्पंद हो जाता है।

और पुरुष के भीतर एक और पुरुष है, जो शरीर के धरातल पर नहीं रहता, जिसको मिलने की आकुलता में नारी अंग-सज्ञा के पार पहुँचना चाहती है।

प्रणय का रुप रहस्यात्मक है। नारी और पुरुष एक दूसरे की ओर देखते है खिंच जाते हैं आर्कषित हो जाते हैं। प्रणय का आधार नर नारी के परस्पर रुप का आकर्षण है। 'उर्वशी' में यही होता है। दोनों एक दूसरे को देखते हैं और आर्कषित हो जाते हैं। यह रूप का आकर्षण देह में है या कहीं अन्यत्र? पुरूवा को लगता है यह आकर्षण देह तक सीमित नहीं है। नारी शरीर को पाकर रूप को पकडा नहीं जाता। पुरूवा के मुँह से दिनकरजी कहते है–

" दृष्टी का जो पेय है, वह रक्त का भोजन नहीं है।
रुप की आराधना का मार्ग आलिंगन नहीं है " ॥

नारी को नर का आकर्षण क्यों होता है ? दिनकरजी की ' उर्वशी ' कहती है–

" तू पुरुष तभी तक गरज रहा जब तक भीतर यह वैश्वानल, जब तक यह पावक शेष तभी तक सखा मित्र त्रिभुवन तेरा चलता है भूतल छोड बादलों के उपर स्यंदन तेरा – – – सुरपति तब तक ही सावधान रहते अपनाने को, अप्सरा स्वर्ग से आती है, अधरों का चुंबन पाने को । "

' उर्वशी ' में उर्वशी का कहना है नर में पौरुष की आग ही परस्पर आकर्षण का निर्माण करती है। जो पुरुखा युद्ध में इंद्र का शस्त्र झेल सकता है सिंह से बाँहे मिलाकर खेल सकता है, वह रमणी के नयनबाण से विद्ध होकर, घायल होकर, उसकी सम्मुख हार जाता है। इस हार में भी उसकी जीत है। ' उर्वशी ' भी पुरुखा के प्रति आकर्षित है किन्तु स्त्री स्वभाव के अनुसार उसके मनमें आता है कि, पुरुखा बोल दे जैसे आजकल के लडके गीत गाते है– ' मेरे सपनों की रानी कब आयेगी तू ? ' किन्तु पुरुखा का प्रेम प्रारंभ में इतना सक्रिय नहीं होता, वह उर्वशी के पास नहीं जाता प्रेमालाप नहीं करता, तब वह प्रणयिनी शिकायत करती है– " जो सुख मिलता उन मनस्विनी वामलोचनाओं को, जिन्हें प्रेम से उद्वेलित विक्रमी पुरुष बलशाली रण से लाते जीत था कि बलसहित हरण करते है । "

पुरूखा को जय या कीर्ति से उतना संतोष नहीं होता जितना की ' उर्वशी ' को पाने से हुआ । पुरूखा का तो कहना है कि हार या संकट में भी नारी की ही याद आती है । जीवन संघर्ष से थककर वह नारी के ही वक्ष पर विश्राम करना चाहता है–

" असफलता में उसे जननी का वक्ष याद आता है, संकट में युवती का शय्या कक्ष याद आता है । "

" संघर्षों से श्रमित–श्रांत हो पुरुष खोजता विव्हल, सिर धर कर सोने को, क्षणभर, नारी का वक्षस्थल । आँखों में जब अश्रु उमडते पुरुष चाहता चुंबन, और विपद में रमणी के अंगों का गाढ आलिंगन ॥ "

प्रणय के फलस्वरूप पुरूखा में जो आग जगती है वह ' उर्वशी ' को अर्पित करके संतोष पाना चाहता है । जब तक उसे उर्वशी का प्रेम नहीं मिलता प्रेमाग्नि में जलता रहता है । अपने पौरूष की आग से त्राण पाने के लिए वह आशा है कि सिर पर उर्वशी की शीतल छाया है । एक ही ऐसा सुख है जो उर्वशी के वक्ष से लगने से ही मिल सकता है। उसके मन में आता है " मै उर्वशी के वक्ष से लगा हूँ और उसकी बाँह मेरी ग्रीवा से लिपटी है। " पुरूवा ' उर्वशी ' के प्राणों में शरण पाना चाहता है और प्राणों के गंधलोक से बाहर आना नहीं चाहता । पुरू और उर्वशी की इस प्रणय–क्रीडा में कैसा विलक्षण माधुर्य है ? परस्पर आलिंगन में एक शरीर की उर्मिया दूसरे में संक्रमित होकर मन को उन्मत्त पुलकित तथा विव्हल प्रसन्न मूर्च्छित बना देती है । उर्वशी कहती है–

" कुसुमायीत पर्वत समान तब लगी तुम्हारे तन से मै पुलकित–बिव्हल प्रसन्न मूर्च्छित होने लगती हूँ। " दो प्राण पुरू–उर्वशी प्रणयकेलि में मग्न हो जाते है, वहाँ रस की समाधि लग जाती है। अदृश्य सुख की ज्योति झलकने लगती है ।

रससमाधि उतर जाने के बाद फिर पुरूखा को बेचैनी व्याकुलता, अतृप्ती आ घेरती है और फिर से वह अपने प्रिय व्यक्ति से मिलने को तडपता है ।

' उर्वशी ' मे दिनकरजी ने प्रणय के केवल एकही पक्ष का उल्लेख नहीं किया । प्रणय की विविध छटाएँ तथा प्रणय के मार्ग से ही अध्यात्म तक कैसे पहुँचा जा सकता है इसका विस्तृत विवेचन भी किया है।

' उर्वशी ' का प्रणय वायवी नहीं । वह शरीर के माध्यम से जाना है । वह काल्पनिक–नहीं स्व–सवेंद्य है इसलिए प्रत्यक्ष होता है । प्रणय मनुष्य के मन को कभी भ्रमित नहीं करता । उर्वशी कहती है–

" पढो रक्त की भाषा को, विश्वास करो इस लिपि का यह भाषा, यह लिपि मानस को कभी न भरमायेगी। "

' उर्वशी ' में प्रणय सर्वप्रथम किसी मानवी शरीर को देखकर मन में संचारित हो जाता है, फिर शरीर में संक्रमित और अंत में शरीर के माध्यम से फिर मन के रहस्यलोक में पहुँच जाता है। सीमा से असीम में, रुप से अरुप में, मूर्त से अमूर्त में और व्यक्त शरीर में कोई दिव्य, अव्यक्त सत्ता प्रतीयमान हो जाती है ।

प्रणय शद्ब ही ऐसा है जिसके साथ नैतिकता–अनैकता, पाप–पुण्य का सवाल नित्य उठता है। काम ईश्वर से विमुख करनेवाला, धार्मिक, सामाजिक व्यवस्था में व्याघात उत्पन्न करनेवाला माना जाता है, अतः नर नारी के प्रणय का जीवन में प्रायः संदेश की दृष्टि से देखा गया । ' उर्वशी है' मे प्रणय केवल शारीरिक नहीं अपितु मानसिक एवं अध्या–त्मिक धरातल मे भी संक्रमित हो गया है ।

जब पुरूखा और उर्वशी आत्मिक प्रणय मे बँध जाते है तब प्रणय की अनुभूति ईश्वरीय अनुभूति से भिन्न नहीं होती उस प्रणय मे प्राप्त मुक्तावस्था परम मोक्ष की कोटि की ही होती है ।

" किसने कहा तुम्हें, जो नारी नर को जान चुकी है, उसके लिए अलभ्य ज्ञान हो गया परम सत्ता का। और पुरुष जो बाँध चुका आलिंगन में रमणी को, देश–काल का भेद गगन में उठने योग्य नहीं है ? "

इसप्रकार 'उर्वशी' में प्रथम प्रेम से लेकर उच्च आध्यात्मिक अनुभूतियों का चित्रण दिनकरजीने बडी कुशलतासे अंकित किया है । प्रणय को वासना के स्तर से उठाकर आध्यात्मिक अनुभूतियों के रुप में चित्रित किया है ।

काम जहाँ फलासक्ती से उपर उठ जाता है तो नारी सौंदर्य में मानो अदृश्य सत्ता मूर्तिमान हो जाती है। 'उर्वशी' मे कवि प्रेम को दैहिक भूमि का अतिक्रमण कर आगे बढता है ।

"देह प्रेम की ज मभूमि है पर उसके विचरण की सारीलीला भूमि । नहीं सीमित है रुधिर त्वचामे यहाँ सीमा प्रसरित है मन के गहन-गुहय लोकों मे जहाँ रुप को लिए अरुप की छवि अँका करती है। " उससे भी आगे इस तरह दिनकरजी प्रेम को प्रथम आकर्षण से लेकर (प्रारंभ कर) उदात्त आध्यात्मिक स्तर तक ले गये हैं और यही 'उर्वशी' की सर्वश्रेष्ठ देन है ।

## यार का प्यार


आर. के. व्यास
T. Y. B. Com.


अपनों ने लुटा है मुझे अपना बनाकर
दुश्मनों ने मिटाया है मुझे दोस्त बनाकर ।

ये दोस्त मुझे क्यों मिटाया दुष्मन बनाकर
